नोबेल शांतता पुरस्कारप्राप्त

५०/-

# नाईट

## एली वायझल



अनुवाद आशा कर्दळे

# नाईट

**(मूळ लेखक : एली वायझल )**

**अनुवाद : आशा कर्दळे**


**भारत बुक हाऊस**

नाईट (कादंबरी )
अनुवाद : आशा कर्दळे

■ *प्रकाशक*
**कृपाल गिरीश देशपांडे**
भारत बुक हाऊस
१७८८, सदाशिव पेठ,
देशमुखवाडी, पुणे -३०
फोन नं. ३२५४९०३२/३३
मो. ९८५०७८४२४६/९८५०९६५४७९



तिसरी आवृत्ती : एप्रिल २००८

■ *मुद्रक*
एस्. प्रिंटर्स
सदाशिव पेठ, पुणे.

■ *अक्षरजुळणी*
संतोष मुद्रणालय

■ *मुखपृष्ठ*
घन:श्याम देशमुख

**मूल्य : ५० रुपये**

# एक

लोक त्याला मोशे बीडल असंच म्हणायचे. जणू काही त्याला आयुष्यात कधी आडनाव नव्हतंच. प्रार्थनामंदिरात तो सगळ्या प्रकारची कामं करत असे. सिघेटमधल्या ज्यूंचा तो फार लाडका होता.

ट्रान्सिल्वानियामधील सिघेट हे लहानसं गाव. याच गावात माझं बालपण गेलं. मला आठवतं, मोशे बीडल फार गरीब होता. अतिशय विन्रम वृत्तीनं राहत असे. माझ्या गावातले लोक गरिबांना मदत करत असले, तरी त्यांना गरीब लोक विशेष आवडत नसत. मोशे बीडल मात्र याला अपवाद होता. आपल्यामुळं इतरांना अवघड वाटेल, असं तो कधी वागला नाही. त्याचा कोणाला भार झाला नाही. आपलं अस्तित्व कुणाच्या लक्षातही येणार नाही, अशा तऱ्हेनं वावरण्याच्या कलेत तो चांगलाच प्रवीण होता.

त्याच्या शरीराची ठेवण विदूषकासारखी होती. त्याच्या भित्रेपणाचं लोकांना हसू यायचं. मला त्याचे मोठाले स्वप्नाळू डोळे फार आवडायचे. त्याची दृष्टी दूर कुठंतरी हरवलेली असायची. तो फार कमी बोलायचा. नेहमी गाणं गुणगुणत असायचा. देवत्वाला भोगाव्या लागणाऱ्या यातनांच्या कहाण्या त्याच्या गाण्यांमधून ऐकायला मिळत.

ईश्वर हद्दपार झाला आहे आणि 'कबाला'नुसार मनुष्यांमध्ये तो स्वतःच्या मुक्ततेची वाट बघत आहे, अशी अर्थाची त्याची गाणी असत.

१९४१ च्या शेवटी शेवटी माझी त्याची ओळख झाली. त्यावेळी मी बारा वर्षांचा होतो. माझा देवावर गाढ विश्वास होता. दिवसा मी 'तालमुड'ग्रंथाचा अभ्यास करी आणि रात्री आमच्या आद्य पवित्र देवळाच्या विध्वंसाबद्दल शोक करायला प्रार्थनामंदिरात पळत जाई.

माझ्या कबालाच्या अभ्यासात मार्गदर्शन करण्यासाठी एखादा शिक्षक शोधायला मी वडिलांना सांगितलं.

वडील म्हणाले,

''हे शिकायला तू अजून फार लहान आहेस. वयाच्या तिसाव्या वर्षानंतरच या गूढविद्येचा अभ्यास करावा, असं आपल्या पूर्वजांनी सांगून ठेवलं आहे. हा अभ्यास फार कष्टप्रद आहे. तू आतापासून हा धोका का पत्करतोस? तुझा तो अधिकार नाही. तुझ्या समजशक्तीच्या आवाक्यात प्राथमिक विषयांचाच तू अभ्यास कर.''

माझे वडील सुसंस्कृत आणि बुद्धिवादी होते. घरातदेखील आपल्या भावनांचं प्रदर्शन करायला त्यांना आवडत नसे. स्वतःच्या कुटुंबापेक्षा त्यांना इतरांचीच काळजी अधिक होती. सिघेटमधला ज्यू समाज त्यांच्याकडे आदरानं बघत असे. आमच्या समाजात त्यांना सर्वाधिक मान होता. एखाद्या सार्वजनिक प्रश्नाच्या बाबतीत लोक त्यांचाच सल्ला घेत. इतकंच नव्हे, तर खाजगी प्रश्नदेखील त्यांच्याच सल्ल्याने सोडवत.

आम्ही चौघं भावंडं होतो. हिल्डा सर्वात मोठी बहीण, तिच्यानंतर बिया. मी तिसरा एकुलता एक मुलगा आणि माझ्या पाठची सर्वात लहान बहीण झिपोरा. ते आमच्या कुटुंबातील शेंडेफळ होते.



माझ्या आईवडिलांचं एक लहानसं दुकान होतं. हिल्डा आणि बिया त्यांना दुकानाच्या कामात मदत करायच्या. मी शाळेत जात असे. घरातले सगळेच मला म्हणायचे,

''तुझं स्थान शाळेत.''

सिघेटमध्ये कबालाची गूढविद्या जाणणारं कोणी नाही, असं माझे वडील मला नेहमी म्हणत. त्यांना ते वेड माझ्या डोक्यातून काढून टाकायचं होतं. पण त्यांचे ते प्रयत्न व्यर्थच ठरले. कारण मीच शेवटी माझ्यासाठी गुरु शोधला, मोशे बीडल.

संध्याकाळच्या वेळी एकदा त्यानं मला प्रार्थना करताना पाहिलं.

''तू प्रार्थना म्हणताना रडतोस कशाला?'' त्यानं मला विचारलं. जणू तसं मला तो अनेक दिवसांपासून बघत होता.

''कारण मला माहीत नाही.'' मी उत्तर दिलं.

मी फार अस्वस्थ झालो होतो.

हा प्रश्न माझ्या मनात कधी उद्‌भवलाच नव्हता. मी रडत होतो, कारण... कारण माझ्या आत अशा काही भावना होत्या, ज्यांना अश्रूंची गरज होती. अशी व्यथा, जी अश्रूंशिवाय असूच शकत नाही. बस्स, मला एवढंच माहीत होतं,

क्षणभर थांबून त्यानं विचारलं,

''तू प्रार्थना का करतोस?''

यांचही उत्तर मला देता आलं नाही.

का करतो मी प्रार्थना?

किती विचित्र प्रश्न?

मी का जगतो? मी श्वासोच्छवास का करतो?

''का, ते मला माहीत नाही.''मी म्हणालो, मघापेक्षाही जास्त

अस्वस्थ झालो. त्यानं प्रश्न सहज विचारला, पण मला मात्र वाईट वाटायला लागलं.

त्या दिवसानंतर मी त्याला वारंवार भेटलो. प्रत्येक प्रश्नामध्ये अशी काही शक्ती दडलेली असते, की ती उत्तरात सापडत नाही, हे त्यानं मला आग्रहपूर्वक पुन्हा पुन्हा स्पष्ट करून सांगितलं.

एकाच गोष्टीची पुनरावृत्ती करायला त्याला आवडत असे. तो म्हणाला,

''स्वत:ला अशा तऱ्हेचे प्रश्न विचारूनच मनुष्य देवाच्या जवळ जाऊ शकतो. हाच खरा ईश्वर-मनुष्य संवाद आहे. माणूस देवाला प्रश्न विचारतो आणि देव उत्तर देतो. आपल्याला ती उत्तरं कळत नाहीत. कळू शकणारच नाहीत. कारण ती आत्म्याच्या खोल तळापासून, सामर्थ्यातून आलेली असतात. मरेपर्यंत ही उत्तरं आपल्या आत्म्याच्या जवळच राहतात. तुला खरी उत्तर मिळतील, एलीझर! फक्त तुझ्यातच तुला ती उत्तरं सापडतील.''

''आणि तू का प्रार्थना करतोस, मोशे?''मी त्याला विचारलं.

''माझ्यात असलेल्या देवाला मी प्रार्थना करतो, की त्याला योग्य तो प्रश्न विचारण्यांची शक्ती त्यानं मला द्यावी.''

जवळ जवळ प्रत्येक संध्याकाळी आम्ही असंच काहीतरी बोलत असू, प्रार्थनेसाठी आलेले इतर सगळे लोक निघून गेल्यावरही आम्ही दोघं प्रार्थनामंदिरात थांबत असू. अर्धवट जळालेल्या मेणबत्त्यांच्या थरथरत्या ज्योतींमधून अजूनही मंद प्रकाश येत असायचा. त्या उजेडात आम्ही बराच वेळ बोलत बसायचो.

एकदा मी त्याला सांगितलं, की-

''ज्यूंच्या गुप्त अशा गूढज्ञानाविषयीच्या कबालांच्या ग्रंथांचा अभ्यास करायची मला खूप इच्छा आहे. पण सिघेटमध्ये मला कोणी



गुरू भेटत नसल्यामुळं मी फार उदास आहे.''

तो कौतुकानं मंद हसला. बराच वेळ शांत राहून मग म्हणाला,

''गूढ सत्याच्या प्रदेशात प्रवेश करण्याचे अनेक मार्ग आहेत. अनेक दारं, अनेक मार्ग मनुष्याला त्या सत्याकडे घेऊन जातात. प्रत्येक मनुष्याचा मार्ग त्याचा स्वत:चा स्वतंत्र असतो. दुसऱ्या कोणाच्या तरी दारानं त्या निगूढ प्रांतात शिरायचा आपण प्रयत्न केला, तर ती मोठी चूक ठरेल. असं करणं प्रवेश करणाऱ्याच्या आणि आधीच तिथं पोहोचले, त्यांच्या दोघांच्याही दृष्टीनं हानिकारक आहे. आपण आपला मार्ग निवडावा.''

- आणि मग मोशे बीडल, सिघेटमधला एक दरिद्री, अनवाणी माणूस माझ्याशी तासन् तास बोलत राहिला.

तो बोलला कबालांच्या गूढतेबद्दल, ईश्वरी ज्ञानाबद्दल आणि त्याच्या अनुभवांबद्दल.

त्या ज्ञानाचे पहिले धडे मी त्याच्याकडून घेतले. तोच माझा गुरू झाला.

झोहर ह्या ग्रंथाचं एकच पान आम्ही दोघं मिळून दहा दहा वेळा वाचत असू. पाठ करण्यासाठी नव्हे, तर त्या शब्दांमधला अलौकिक अर्थ, त्यातलं परतत्त्व नीट ग्रहण करता यावं, म्हणून.

प्रत्येक संध्याकाळ अशी भारलेली. त्या काळात मला वाटायचं, नव्हे, माझी खात्रीच पटली होती की, मोशे बीडल मला त्याच्याबरोबर शाश्वत विश्वात घेऊन जाणार. काळाच्या अशा अंशात तो मला नेणार-जिथं प्रश्न आणि उत्तर एक होऊन जाईल.

नंतर एक दिवस सिघेटमधल्या सगळ्या परकीय ज्यूंना सिघेटमधून हद्दपार करण्यात आलं. मोशे बीडल असाच परकीय ज्यू होता.

हंगेरियन पोलिसांनी ज्यूंना गुरांच्या गाडीत कोंबलं, तेव्हा ते ढसढसा रडत होते. आम्ही प्लॅटफॉर्मवर उभं राहून रडत होतो.

गाडी क्षितिजावरून दिसेनाशी झाली. तिनं मागे काहीही शिल्लक ठेवलं नाही. फक्त दाट, काळा, घाणेरडा धूर!

माझ्यामागे उभा असलेला ज्यू उसासा सोडून जड स्वरात म्हणाला,

''युद्ध सुरू झालं आहे. आता आपलं काय होणार?''

आम्ही लवकरच हद्दपार झालेल्यांना विसरून गेलो.

काही दिवसांनी लोक सांगायला लागले, की त्या ज्यूंना गॅलिशियामध्ये नेण्यात आलं आहे. तिथं ते काम करताहेत आणि जसे आहेत, त्यातच त्यांना समाधान आहे.

खूप दिवस निघून गेले. अनेक आठवडे, कितीतरी महिने. जीवन सुरळीत सुरू झालं होतं. आमच्या घरांमधून शांततेचं आणि विश्वासाचं वातावरण निर्माण झालं होतं. व्यापाऱ्यांचा धंदा पुन्हा सुरू झाला. विद्यार्थी अभ्यासाला लागले, पुस्तकांमध्ये गढून गेले. लहान मुलं रस्त्यांवर खेळायला लागली.

एक दिवस मी सहज प्रार्थनामंदिरात जात होतो. दाराजवळच्या बाकावर मला मोशे बीडल बसलेला दिसला!

त्यानं त्याची आणि त्याच्या मित्राची कहाणी मला सांगितली. हद्दपारीसाठी निघालेल्या ज्यूंनी खच्चून भरलेली ती गाडी हंगेरीची सरहद्द ओलांडून पोलंडच्या हद्दीत शिरली, तेव्हा तिचा ताबा गेस्टापोंनी घेतला. तिथं ती थांबली. ज्यूंना गाडीतून उतरवून लॉऱ्यांमध्ये भरण्यात आलं. ती वाहनं एका जंगलाच्या दिशेनं निघाली. पुन्हा ज्यूंना खाली उतरवलं. तिथं त्यांना प्रचंड मोठाली थडगी खोदायला सांगितली. त्यांचं काम संपल्यावर गेस्टापोंनी स्वत:चं काम सुरू केलं. अत्यंत निदर्यपणे, 



जराही न कचरता त्यांनी या कैद्यांची कत्तल केली. काही कैद्यांना फाशीच्या दोरात स्वत:ची मान स्वत:च अडकवून घ्यावी लागली. गेस्टापोंनी लहान मुलांना हवेत उंच फेकलं, आणि मशीनगन्स चालवणाऱ्यांनी हवेतच त्यांचा वेध घेतला. असंख्य मुलं अशा तऱ्हेनं मशीनगन्सची लक्ष्य झाली. हे सगळं त्या कोलोमायजवळच्या गॅलिशियाच्या जंगलात घडलं.

पण मोशे बीडल कसा सुटला? निव्वळ चमत्कारामुळं. त्याच्या पायांना जखमा झाल्यावर तो पडला, गेस्टापोंना वाटलं, तो मेला.

रात्रंदिवस त्या करुण कहाण्या सांगायला तो ज्यूंच्या घराघरात गेला. त्या दीर्घ रात्री आणि लांब दिवस! मोशेनं प्रत्येक ज्यूच्या घरात जाऊन सांगितलेल्या त्या मृत्यूकथा... माल्का नावाची लहान मुलगी...तिला मरायला तीन दिवस लागले. आणि तो बियास शिंपी.. मुलांच्या आधी आपल्याला मारावं, ही त्यानं केलेली याचना!

मोशे खूप बदलला होता. त्याच्या डोळ्यात आनंदाची छटाही शिल्लक नव्हती. आता तो माझ्याशी देव किंवा कबाल याविषयी बोलत नव्हता. त्यानं काय पाहिलं, याचविषयी बोलत होता. लोकांचा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसत नव्हता. इतकंच नव्हे, तर लोक त्याच्या गोष्टी ऐकून घ्यायलाही तयार नव्हते.

लोक म्हणायचे,

''गरीब बिचारा! त्याला वेड लागलं आहे.''

किंवा असंही म्हणायचे,

''आपल्याला त्याची दया यावी, म्हणून सांगतो आहे सगळं, काल्पनिक गोष्टी रचतो आहे. कल्पनाशक्तीही अफाटच आहे त्याची!''

ते ऐकलं, की मोशे रडायचा.

"माझ्या ज्यू बांधवांनो! माझं ऐकून घ्या. मी खोटं बोलत नाहीये. मला तुमचा पैसा, तुमची दया नको आहे. माझ्या बोलण्याकडे तुम्ही लक्ष द्यावं, एवढीच माझी इच्छा आहे."

संध्याकाळच्या प्रार्थनांच्या मधल्या वेळात तो रडायचा. रडून रडून लोकांना विनवायचा, की त्याचं बोलणं असं हसण्यावारी नेऊ नका.

खरं तर, माझाही त्याच्या सांगण्यावर विश्वास बसत नव्हता. जर्मन लोक इतका दुष्टपणा करतील, हे खरं वाटत नव्हतं. तरीही मी रोज संध्याकाळी प्रार्थनेनंतर त्याच्याजवळ बसून त्याच्या करुण दुःखकहाण्या लक्षपूर्वक ऐकत असे. त्याचं पराकोटीचं दुःख समजून घ्यायचा आटोकाट प्रयत्न करत असे. त्या वेळी तरी मला त्याची फक्त दयाच येत होती.

तो हताशपणे म्हणायचा,

"लोकांना कसं पटवून देऊ? लोक मला वेडा समजतात."

मेणबत्तीतून गळणाऱ्या मेणाच्या थेंबांप्रमाणे त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळायचे.

एकदा मी त्याला विचारले,

"तू जे काही सांगतोस, त्यावर लोकांनी विश्वास ठेवावा; असा तुझा आग्रह का? मी तुझ्या जागी असतो, तर ते विश्वास ठेवतात की नाही, याची मी पर्वा केली नसती."

त्यानं डोळे मिटून घेतले. जणू त्याला त्या काळातून स्वतःची सुटका करून घ्यायची होती.

"तुला कळत नाही." तो निराश होऊन म्हणाला, "तुला कळणारही नाही. अगदी चमत्कार, म्हणून मी वाचलो. कसाबसा इथं परत आलो. कुठून ती शक्ती मिळाली मला? तुला माझ्या मरणाची गोष्ट सांगण्यासाठीच मला सिघेटला परत यायचं होतं? तर अजूनही



वेळ आहे. तू तयारीत असावं म्हणून. जगण्यासाठी मी परत आलो का? नाही. मी आता माझ्या आयुष्याला इतकं महत्त्व देतच नाही. यापुढंही देणार नाही. मी एकटाच आहे. मला परत यावंसं वाटत होतं, ते तुला सावध करण्यासाठी आणि बघ, किती विचित्र! कोणीही माझ्याकडे लक्ष द्यायला तयार नाही."

हे सगळं घडलं १९४२ च्या शेवटी.

त्यानंतर जीवन पुन्हा पूर्ववत सुरळीत सुरू झालं. लंडन रेडिओ आम्ही रोज संध्याकाळी नियमितपणे ऐकत असू. धीर देणाऱ्या बातम्या.

जर्मनीचा लंडनवर रोजचा बॉम्बवर्षाव.

स्टालिनग्राड, दुसऱ्या आघाडीची तयारी.

–आणि आम्ही सिघेटमधले ज्यू चांगल्या दिवसांची प्रतिक्षा करत होतो. ते दिवस फार दूर नाहीत, ते लवकरच येतील असं आम्हाला वाटायचं.

मी माझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केलं. दिवसा तालमुडचा अभ्यास, रात्री कबालाचा. माझे वडील त्यांच्या दुकानाच्या आणि ज्यू जमातीविषयीच्या कामात बुडून गेले. नववर्ष साजरं करायला आजोबा आमच्याकडे आले होते. बोर्शे या प्रसिद्ध धर्मगुरूंची प्रवचनं त्यांना ऐकायची होती. हिल्डा–माझी मोठी बहीण आता लग्नाला योग्य झाली होती. आई तिच्यासाठी चांगला मुलगा शोधायला लागली.

अशा तऱ्हेनं १९४३ हेही वर्ष निघून गेलं.

१९४४ चा वसंत ऋतू. रशियन आघाडीवरून चांगल्या बातम्या येत होत्या. जर्मनीचा पराभव होणार, याबद्दल आम्हा ज्यूंच्या मनात कसलीच शंका नव्हती. प्रश्न होता फक्त किती काळ लागेल, याचा! काही महिने किंवा कदाचित काही आठवडेच.

झाडं बहरून आली होती. इतर कोणत्याही वर्षाप्रमाणेच

हेही एक वर्ष होतं. तोच वसंतऋतूचा काळ. वाङ्‌निश्चय, विवाह आणि अपत्यजन्माचं नेहमीप्रमाणेच एक वर्ष.

लोक म्हणायचे,

''रशियन सैन्य प्रचंड मुसंडी मारून पुढं घुसतंय. मनात आणलं, तरी हिटलर आता आपलं काहीच वाईट करू शकणार नाही.''

हिटलरला आमचा समूळ विनाश करायचा आहे, असा संशय आम्हाला आला होता. पण तो असं करू शकणार नाही, अशी आशा मनात जागत होती.

तो खरोखर संपूर्ण जमात नष्ट करणार होता? जगभरातल्या इतक्या देशांमध्ये विखुरलेल्या ज्यूंची तो कत्तल करणार होता? लक्षावधी ज्यू. संख्या काही अगदीच कमी नाही. ती अवघी नष्ट करायला तो कोणती पद्धत अमलात आणील? आणि तेही विसाव्या शतकाच्या मध्यावर!

शिवाय ज्यू लोकांना सगळ्या गोष्टींमध्ये रस होता. राजनीती, लष्करी डावपेच, युद्धशास्त्र, पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचं पुनर्वसन करण्याची चळवळ, वगैरे. त्यांना रस नव्हता, तो फक्त त्यांच्या स्वत:च्या विधिलिखितात.

मोशे बीडलसुद्धा शांत होता. तो बोलून बोलून थकला होता. तो प्रार्थनामंदिरात किंवा रस्त्यावरून भटकायचा. त्याची दृष्टी खाली झुकलेली असे, पाठ वाकलेली लोकांच्या डोळ्याला डोळा देणं तो टाळायचा.

त्यावेळी पॅलेस्टाईनमध्ये जाण्यासाठी देशांतराचा परवाना मिळवणं शक्य होतं. तुम्ही आपली मालमत्ता विकून टाका, व्यवसाय गुंडाळा, आपण हे गाव सोडून जाऊ, असं मी माझ्या वडिलांना सुचवलंही होतं. पण ते म्हणाले होते,



''बेटा, आता मी म्हातारा झालो आहे. नव्यानं पुन्हा आयुष्य सुरू करायची धमक माझ्यात नाही. या वयात इतक्या दूरच्या देशात जायचं, तिथं शून्यातून पुन्हा सगळं उभं करायचं, कसं शक्य आहे?''

एक दिवस बुडापेस्ट रेडिओनं जाहीर केलं, की हंगेरीत फॅसिस्ट पक्ष सत्तेवर आला आहे. सरकार बदललं आहे.

तरीही काळजी करण्यासारखं आम्हाला काही वाटत नव्हतं. अर्थात आम्ही फॅसिस्ट लोकांबद्दल ऐकलं होतं, पण आमच्यासाठी ते अद्यापही कल्पनेतलेच होते. दूरच्या दृश्यासारखे धूसर. आमच्या दृष्टीनं फॅसिस्ट पक्ष सत्तेवर येणं म्हणजे फक्त प्रशासनात झालेला बदल एवढाच अर्थ होता.

पण दुसऱ्याच दिवशी आणखी अस्वस्थ करणारी बातमी आली.

सरकारच्या परवानगीनं जर्मन तुकड्यांनी हंगेरीत प्रवेश केला होता!

ती बातमी ऐकताच जिकडे तिकडे चिंतेचं वातावरण पसरलं. आमचा एक मित्र नुकताच बुडापेस्टला जाऊन आला होता. त्यानं सांगितलं.

''राजधानीतले ज्यू लोक भीतीच्या आणि दहशतीच्या भयंकर दडपणाखाली आहेत. रोज रस्त्यांवर, गाड्यांमध्ये ज्यू लोकांच्या विरोधी घटना घडताहेत. फॅसिस्ट लोक ज्यूंच्या दुकानांवर आणि प्रार्थनामंदिरांवर हल्ले करत आहेत. परिस्थिती फार गंभीर होत चालली आहे.''

ही बातमी सिघेटमध्ये वणव्यासारखी पसरली. प्रत्येकाच्या तोंडी तोच विषय होता. पण फार काळ लोकांनी त्यांची चर्चा केली नाही. कारण लोक आशावादी होते. आपलं काही वाईट होणार नाही, या आशेवर लोक पुन्हा शांत झाले. त्यांना वाटत होतं, जर्मन्स इतक्या

दूर आपल्या गावात येणार नाहीत. ते बुडापेस्टमध्येच राहतील. कारण त्यांचे काही लष्करी डावपेच आणि राजकीय धोरणं आहेत.

तीनच दिवस उलटले. जर्मन लष्कराच्या गाड्या आमच्या लहानशा गावच्या रस्त्यावरून फिरू लागल्या!

पुन्हा आमच्यात घबराट, चिंता. जर्मन सैनिक डोक्यावर पोलादी शिरस्त्राण आणि त्यावरचं ते चिन्ह. ते साक्षात मृत्यूचं मस्तक होतं!

तथापि, आमचं जर्मनांबद्दलचं मत एकदमच काही वाईट झालं नाही. उलट, त्यांचं वागणं आश्वासक वाटत होतं. ज्यूंच्या खाजगी रिकाम्या घरांमध्ये जर्मनांनी आपल्या छावण्या ठोकल्या होत्या. काही जर्मन्स तर ज्यूंच्या घरातच रहात. जर्मन सैनिक आपल्या यजमानांशी दुराव्यानंच, पण तरीही विनम्रपणे वागत असत. कधी त्यांनी भलतीच मागणी केली नाही, न रुचणारी विधानंही केली नाहीत. क्वचित घरमालकिणीकडे बघून ते हसतही. एक जर्मन अधिकारी आमच्या समोरच्याच घरात रहात होता. त्या कुटुंबानं त्याला एक खोली दिली होती. ते लोक सांगत, की तो जर्मन अधिकारी दिसायला तर आकर्षक आहेच, पण स्वभावानंही चांगला आहे. शांत, सुस्वभावी, मनमिळाऊ, त्याला ज्यूंबद्दल सहानुभूती आहे.

काही दिवसांनी त्या जर्मन अधिकाऱ्यानं घरमालकिणीला चॉकलेस्टचा मोठा खोका दिला.

आम्ही आशावादी लोक हरखलो!

आम्ही आपापसांत बोलू लागलो,

''बघा! तुमचा विश्वास बसणार नाही, हे 'आपले'जर्मन्स आहेत. तुम्ही उगाच त्यांच्याबद्दल गैरसमज करून घेत आहात. कुठं आहे त्यांचं ते आपण ऐकलेलं क्रौर्य?''

जर्मन्स गावात आलेच होते, फॅसिस्ट सत्तेवर आलेच होते.



निर्णय आधीच घोषित झाला होता. तरीही सिघेटमधल्या ज्यूंच्या चेहऱ्यांवरचं स्मित मावळलं नव्हतं!

'पासोवर' हा आमचा धार्मिक सण आम्ही साजरा केला.

एक आठवडा गेला. हवा आल्हाददायक होती. माझी आई स्वयंपाकघरात नेहमीची लगबग करीत होती. गेल्या आठवड्याभरात सगळी प्रार्थनामंदिरं मात्र बंद करण्यात आली होती. जर्मनांना डिवचण्यात अर्थ नव्हता, म्हणून आम्ही प्रार्थनेसाठी कुणाच्या तरी घरी जमत होतो. जवळ जवळ प्रत्येक ज्यूंचं घर प्रार्थनामंदिरच झालं होतं.

आम्ही मद्य पीत होतो, खात होतो, गाणी गात होतो. मेजवानीचे हे सात दिवस बायबलनं आम्हाला आनंदानं, हसत खेळत घालवायला दिले होते. पण आमचं मन त्यात लागत नव्हतं. या दिवसात आमची हृदयं जास्त वेगानं धडधडत होती. एकदाची ही मेजवानी लवकर संपावी, म्हणजे आम्हाला हे आनंदाचं नाटक वठवावं लागणार नाही, असं आम्हाला वाटत होतं.

'पासोवर'च्या सातव्या दिवशी वेगळ्याच नाटकाचा पडदा वर गेला. ज्यू जमातीच्या नेत्यांना जर्मनांनी अटक केली.

त्या क्षणापासून पुढच्या गोष्टी भराभर घडत गेल्या. मृत्यूकडे जाण्याची शर्यत सुरू झाली होती.

पहिला हुकूम सुटला.

ज्यूंना येते तीन दिवस आपापली घर सोडून कुठही हलता येणार नाही.

मोशे बीडल धावत आमच्या घरी आला. रडत रडत माझ्या वडिलांना म्हणाला,

''मी तुम्हाला सांगितलं होतं. सावध केलं होतं.''

बस्स, इतकंच बोलून उत्तराची वाटही न बघता तो झपाट्यानं

निघून गेला.

त्याच दिवशी हंगेरियन पोलीस ज्यूंच्या घराघरात घुसले. सोनं, दागिने किंवा इतर कोणतीही मौल्यवान वस्तू आपल्या घरात ठेवायचा अधिकार ज्यूंना उरला नव्हता. सगळ्या मौलिक चीजवस्तू पोलिसांच्या ताब्यात द्याव्या लागल्या.

मृत्यूच्या कळा सुरू झाल्या होत्या!

माझे वडील तळघरात गेले आणि त्यांनी तिथं आमच्याजवळचं सोनंनाणं जे काही थोडं-फार होतं, ते पुरून टाकलं. आयुष्यभर कष्ट करून वाचवलेलं ते धन.

घरी माझी आई स्वत:ला नेहमीप्रमाणे घरकामात गुंतवून घेऊ लागली. मध्येच एखादे वेळी काम करता ती थांबायची आणि आमच्याकडे टक लावून बघायची. एक शब्दही न बोलता.

तीन दिवस संपल्यावर नवा हुकूम जारी झाला.

प्रत्येक ज्यूनं 'पिवळा तारा' धारण केला पाहिजे.

आमच्या समाजातील काही प्रतिष्ठित मंडळी माझ्या वडिलांना भेटायला आली. वडिलांचे हंगेरियन पोलिसांशी फार चांगले संबंध होते. सध्याच्या परिस्थितीबद्दल माझ्या वडिलांना काय वाटतं, ते त्या मंडळींना जाणून घ्यायचं होतं.

वडिलांना परिस्थिती इतकी काही चिंताजनक वाटत नव्हती. कदाचित लोकांचा धीर सुटू नये किंवा त्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखं होऊ नये, म्हणूनही वडील म्हणाले असतील,

"पिवळा तारा? अं! त्यात काय एवढं? त्या ताऱ्यानं तुम्ही मरत तर नाही ना?" (बिचारे माझे वडील! शेवटी पिवळ्या ताऱ्यानंच त्यांना मारलं.)

इकडे एकामागून एक नवे हुकूम सुटतच होते. आमच्या



रेस्टॉरंट किंवा हॉटेलात जाण्यावरही बंदी आली होती. आम्ही प्रार्थनामंदिरात जाऊ शकत नव्हतो, रेल्वेनं प्रवास करू शकत नव्हतो. संध्याकाळी सहानंतर रस्त्यावर जाऊ शकत नव्हतो, घराबाहेर पडू शकत नव्हतो.

त्यानंतर आला घेटो! ज्यूंच्या बंदिस्त वसाहती उभारल्या गेल्या.

सिघेटमध्ये दोन वसाहती उभारल्या होत्या. एक बरीच मोठी, गावाच्या मध्यभागी होती. तिनं चार मोठे रस्ते व्यापले होते. दुसरी लहान वसाहत गावाबाहेरच्या लहान लहान रस्त्यांना धरून उभी राहिली होती. ज्या रस्त्यावर आम्ही रहात होतो, तो रस्ता पहिल्या वसाहतीतच होता. त्यामुळं आम्ही अद्यापही आमच्याच घरात राहात होतो. पण आमचं घर कोपऱ्यावर असल्यामुळं बाहेरच्या रस्त्याकडे उघडणाऱ्या सगळ्या खिडक्या जर्मनांनी बुजवून टाकल्या होत्या. अनेक ज्यूंना आपापली घरं सोडून या घेटोमध्ये येऊन राहावं लागलं होतं. आमचे काही नातलग त्यात होते. त्यांना आम्ही आमच्या घरातल्या काही खोल्या दिल्या.

पुन्हा हळूहळू आमचं आयुष्य पूर्ववत सुरळीत सुरू झालं. वस्तीभोवती काटेरी तारेचं मजबूत कुंपण होतं. पहिल्यांदा त्या कुंपणाची खूप भीती वाटली. मग तीही भीती पुसट होत गेली. आम्ही स्वत:ला सुखवस्तू समजायला लागलो. आम्ही पूर्णत: स्वयंपूर्ण होतो. ज्यूंचं ते एक छोटंसं राज्य होतं. आम्ही ज्यूचं एक मंत्रिमंडळ स्थापन केलं, पोलिसांची नियुक्ती केली. सामाजिक गरजेसाठी कार्यालय, कामगार समिति, आरोग्य विभाग, सगळी सरकारी यंत्रणा उभी केली.

ते बघून प्रत्येकाला आश्चर्य वाटायचं आणि समाधानही, डोळ्यांसमोर जर्मनांचे ते उद्दाम बंडखोर चेहरेही नकोत, आणि त्यांची ती आमच्याविषयीच्या तिरस्कारानं भरलेली दृष्टीही नको. आमच्या

मनातील भीती आणि काळजी आता कमी झाली होती. आम्ही ज्यूंमध्ये राहात होतो, आमच्या भावांमध्ये..

अर्थात याही परिस्थितीत काही कटु क्षण यायचे. रोज जर्मन लोक येत आणि लष्करी गाड्यांमध्ये कोळसा भरण्याच्या कामासाठी ज्यूंना घेऊन जात. अशा प्रकाराचं काम करायला स्वेच्छेनं फारसं कुणी तयार नसे. एवढं एक सोडलं, तर बाकी इतर वातावरण शांततापूर्ण आणि आशादायक होतं.

सर्वसामान्यत: लोकांचं असं मत होतं की, आम्हाला युद्ध संपेपर्यंत किंवा 'रेड आर्मी' येईपर्यंत घेटोमध्येच राहावं लागेल. मग सगळं पूर्वीसारखं होईल.

घेटोवर जर्मनांचं राज्य नव्हतं आणि ज्यूंचंही राज्य नव्हतं! एक प्रकारचा भ्रम आमच्यावर सत्ता गाजवत होता! त्या भ्रमाच्या हाती आम्ही आमची आयुष्यं सोपवून बसलो होतो.

'पासोवर'चा आठवडा उलटून पन्नास दिवस होत आले होते. तो शनिवार होता. 'पेन्टेकॉस्ट'सणाच्या वसंत ऋतूचा सूर्यप्रकाश. आधीचा शनिवार. निश्चिंत आणि बिनधास्त लोक रस्त्यांवर घोळक्या घोळक्यांनी उबदार हवेत भटकत होते. पदपथांवर मुलांचे खेळ रंगात आले होते. मी इझा मलिक गार्डन्समध्ये माझ्या काही मित्रांबरोबर तालमुडवरच्या प्रबंधाचा अभ्यास करत बसलो होतो.

रात्र झाली. आमच्या घराच्या मागच्या अंगणात वीसएक ज्यू जमले होते. वडील त्यांना काही आख्यायिका सांगत होते. माझे वडील गोष्टी फार उत्तम तऱ्हेनं सांगत. सद्य:परिस्थितीविषयी स्वत:ची मतंही ते तपशीलावर सांगत होते.

अचानक दार उघडलं गेलं. पूर्वीचा व्यापारी, पण आता पोलीस असलेल्या एका माणसानं आत येऊन माझ्या वडिलांना बाजूला



घेतलं. उजेड अगदीच अंधूक होता, पण तशा त्या अंधारातही त्या माणसाचं बोलणं ऐकून माझ्या वडिलांचा चेहरा पांढराफटक पडलेला मला दिसला.

"काय झालं?"आम्ही सर्वांनी त्यांना विचारलं.

"मला माहीत नाही. पण मंत्रिमंडळाची तातडीची बैठक आहे आणि त्यासाठी मला हजर राहायचं बोलावणं आलं आहे. नक्कीच काहीतरी घडलं असणार."

ते आम्हाला छानपैकी गोष्टी सांगत होते. ती अर्धवटच राहणार होती!

"मी जातो तिकडे. लवकरात लवकर परत येईन. काय झालं, ते सांगेनच तुम्हाला. तोवर माझी वाट बघा."

वडील निघून गेले.

काही तास वाट बघायची आमची तयारी होती. ऑपरेशन थिएटरमध्ये ऑपरेशन सुरू असावं आणि बाहेरच्या हॉलमध्ये चिंताक्रांत नातलग तिष्ठत बसले असावेत, तसंच स्वरूप त्या अंगणाला आलं होतं. आम्ही फक्त दार उघडण्याची वाट बघत होतो. आकाश उघडण्याची वाट बघणंच होतं ते! एव्हाना त्या 'विशेष बैठकीची' बातमी सर्वत्र पसरली होती आणि इतर शेजारीही आमच्या अंगणात जमले होते. लोक वरचेवर त्यांच्या घड्याळांकडे बघत होते. वेळ फार सावकाश जात होता. बैठक इतकी लांबते आहे, याचा अर्थ काय?

"मला संकटाची चाहूल लागली होती,"माझी आई म्हणाली, "आज दुपारीच मला घेटोमध्ये काही नवे चेहरे दिसले. मला वाटतं, ते गेस्टापोचे दोन जर्मन अधिकारी होते. आपण घेटोत आल्यापासून आजवर एकही जर्मन अधिकारी कधीच आला नव्हता."

मध्यरात्र व्हायला आली होती. आपापल्या घरी जाऊन

झोपावं, असं कुणालाच वाटत नव्हतं. सारं काही ठीक आहे, एवढी खात्री करून घेण्यासाठी काही फक्त थोड्या वेळासाठी झटकन घरी जाऊन आले. थोडे लोक घरी गेले. पण वडील आल्याबरोबर आम्हाला बोलवायला या, असं बजावून गेले.

अखेर दार उघडलं. वडील आले. ते पार निस्तेज झाले होते. त्यांना बघताच सर्वांनी त्यांच्याभोवती कोंडाळं केलं. लोकांची उत्कंठा शिगेला पोहोचली होती.

"काय झालं?आम्हाला सांगा, काय झालं,ते. काहीतरी बोला."

त्याक्षणी आम्ही सारे किती उतावीळ होतो -वडिलांचा विश्वासाचा फक्त एकच शब्द ऐकण्यासाठी.

"घाबरू नका, सारं ठीक आहे. भिण्यासारखं काही नाही. बैठक नेहमीचीच होती. समाजकल्याणाचे आणि आरोग्याचे काही प्रश्न-बस, तेवढीच चर्चा झाली."

असंच काहीतरी आम्हाला वडिलांकडून ऐकायचं होतं. पण वडिलांच्या भयभीत चेहऱ्याकडे नुसतं पाहिलं आणि आम्हाला समजायचं, ते समजलं.

"फार भयंकर बातमी आहे."ते म्हणाले.

शेवटी त्यांनी कसाबसा तो शब्द उच्चारला.

"हद्दपारी!"

या घेटोचं संपूर्णपणे उच्चाटन होणार होतं. उद्या दिवस उजाडल्यापासून आम्हाला एकेक रस्ता रिकामा करावा लागणार होता.

आम्हाला सगळं काही जाणून घ्यायचं होतं. संकट भयानक होतं. पण आम्ही तो कडू घोट गिळायला तयार होतो. आम्हाला सगळा तपशील हवा होता. त्या बातमीनं प्रत्येक जण हादरला होता.



तरीही-

"आपल्याला कुठं नेलं जाईल?"

प्रत्येकाच्या मनातला प्रश्न. पण ते ठिकाण गुप्त होतं. ते फक्त एकाच व्यक्तीला माहीत होतं - ज्यू मंत्रिमंडळाच्या अध्यक्षाला. पण ते तो सांगणार नव्हता, सांगू शकतच नव्हता. त्यानं ते सांगितलं, तर त्याला गोळ्या घालून ठार केलं जाईल, अशी गेस्टापोनं त्याला धमकी दिली होती.

"तऱ्हेतऱ्हेच्या अफवा पसरल्या आहेत..."माझे वडील अगदी निराशेच्या खचलेल्या स्वरात म्हणाले,"कुणी म्हणतात, विटांच्या कारखान्यात काम करायला आपल्याला हंगेरीतच कुठंतरी नेलं जाणार आहे.युद्धाची आघाडी इथून अगदी जवळ आहे."

काही क्षण शांत राहून ते म्हणाले,

"प्रत्येक माणसाला फक्त त्याचं स्वत:चंच सामान नेता येणार आहे. पाठीवर एक पिशवी..तीत थोडंसं अन्न आणि कपडे. याखेरीज दुसर काही नाही."

पुन्हा जड शांतता.

"आपल्या शेजाऱ्यांना उठवा. म्हणजे त्यांना तयार राहता येईल."

माझ्या आजूबाजूला माणसं नव्हतीच, जणू सावल्या होत्या! दीर्घ निद्रेतून त्या जाग्या झाल्या होत्या. शांतपणे चहू दिशांनी त्या निघून गेल्या.

क्षणभर आम्ही एकटे उरलो. अचानक आमच्या घरातच रहात असलेला आमचा एक नातलग तिथं आला. घाईघाईनं त्यानं सांगितलं,

"रस्त्याची बाजूची जी खिडकी बुजवली आहे, त्या

खिडकीवर कुणीतरी थापा मारतंय्.''

थापा मारणारी ती व्यक्ती कोणी होती, हे मला युद्ध संपल्यावर कळलं!

तो हंगेरियन पोलीस इन्स्पेक्टर होता. माझ्या वडिलांचा मित्र. आम्ही घेटोमध्ये जाण्यापूर्वी तो माझ्या वडिलांना म्हणाला होता,

''काळजी करू नका. तुमच्यावर काही संकट आलंच, तर मी तुम्हाला सावध करीन.''

त्या रात्री आम्ही त्याच्याशी बोलू शकलो असतो, तर! कदाचित आम्ही कसंही करून तिथून पळून जाऊ शकलो असतो. ती बुजवलेली खिडकी उघडेपर्यंत फार उशीर झाला होता. बाहेर कुणीही नव्हतं.

सगळा घेटो जागा झाला. एकामागे एक खिडक्यांमधून दिव्यांचा उजेड दिसायला लागला.

मी वडिलांच्या एका मित्राच्या घरी गेलो. त्यांना उठवलं. त्यांची दाढी पांढरी होती आणि डोळे स्वप्नाळू होते. ते पाठीत वाकले होते.

''उठा, काका! तयारी करा. आपल्याला प्रवासाला निघायचं आहे. उद्या सकाळीच तुम्हाला तुमच्या कुटुंबासह इथून हाकलून दिलं जाणार आहे. आपण सगळेच ज्यू इथून जाणार आहोत.कुठं? ते मला विचारू नका. मला कोणताही प्रश्न विचारू नका. तुमच्या प्रश्नांची उत्तर फक्त देवच देऊ शकेल. आता चटकन उठा आणि तयारीला लागा.''

मी बोललो, त्यातला एक शब्दही त्यांना कळला नाही. त्यांना कदाचित वाटलं असेल, मी वेडा झालो आहे आणि काहीतरी बडबडतो आहे.

''हा काय प्रकार आहे? कसला प्रवास?''



अद्यापही ते पूर्ण जागे झाले नव्हते. गाढ झोपेतून उठल्यामुळं ते माझ्याकडे फक्त भीतीनं गोठलेल्या नजरेनं बघत होते.. जणू त्यांची अपेक्षा होती, की मी जोरात हसेन आणि म्हणेन,

''निजा आपल्या गादीवर. आरामात झोपा. चांगली स्वप्न बघा. काहीही झालेलं नाही. मी तुमची गंमत केली.''

माझा घसा कोरडा पडला होता. शब्द घशात घुसमटलेले होते. माझे ओठ लुळे पडले होते. मी जास्त काहीच बोलूच शकलो नाही.

मग त्यांना कळलं, ते बिछान्यातून बाहेर आले. यांत्रिकपणे कपडे करू लागले. नंतर हळूहळू चालत ते, त्यांची पत्नी झोपली होती, त्या पलंगाजवळ गेले. त्यांनी तिच्या कपाळाला अतीव प्रेमानं हलकेच स्पर्श केला. तिने डोळे उघडले. पतीला पाहून तिच्या ओठावर हसू उमटलं. नंतर ते मुलांना उठवायला गेले. मुलांना त्यांच्या स्वप्नांमधून ओढून काढायला.

मी तिथून पळालो.

वेळ कसा भराभर गेला. पहाटेचे चार वाजले होते. माझ्या वडिलांची इकडे तिकडे धावपळ चालू होती. ते थकले होते, तरीही मित्रांना दिलासा देत ते सतत इकडून तिकडे फिरत होते. मध्येच ते ज्यू कौन्सिलमध्ये जाऊन बघत. कदाचित दरम्यानच्या काळात आमच्या हद्दपारीचा तो हुकूम रद्द झाला असेल, ही त्यांना आशा होती. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत आशेचा एक किडा आमच्या सर्वांच्या मनात वळवळत होता.

स्त्रिया अंडी उकडत होत्या, मांस शिजवत होत्या, केक्स भाजत होत्या. सर्व खाद्यपदार्थ ठेवून खांद्यावर अडकवता येतील, अशा पिशव्या तयार करत होत्या. लहान मुलं नुसतीच इकडून तिकडे फिरत होती.

नेमकं काय करावं, ते त्यांना सुचत नव्हतं. कुठं जावं, म्हणजे मोठ्या माणसांच्या मध्ये मध्ये होणार नाही, तेही त्यांना कळत नव्हतं. आमच्या मागच्या अंगणाला अक्षरशः बाजाराचं स्वरूप आलं होत. घरातल्या मौल्यवान चीजवस्तू, किमती गालिचे, नक्षीदार शमादानं, प्रार्थनांची पुस्तकं, बायबलसह इतर धार्मिक ग्रंथ, इतर सारं सामान अंगणातल्या धुळीत विखरून पडलं होतं. कधीच कुणाच्या मालकीच्या नसल्यामुळे त्या वस्तू केविलवाण्या दिसत होत्या. वर निळंभोर आकाश होतं. त्या आकाशाखाली बेवारस होऊन पडलेलं ते सामान...

सकाळचे आठ वाजले. आम्ही सुचेल, ते काहीबाही करत होतो. पण आमच्या नसांमध्ये, मेंदूमध्ये, अवयवांमध्ये वितळवलेल्या शिशाप्रमाणे शीण पसरायला लागला होता. रस्त्यांवर अचानक आरडाओरडा ऐकू आला, की मी भराभर सकाळच्या प्रार्थना म्हणायला लागत असे.

मी एकाएकी प्रार्थना थांबवली आणि खिडकीकडे पळालो. हंगेरियन पोलीस घेटोमध्ये शिरले होते. शेजारच्या रस्त्यावर ते ओरडत होते–

''सगळे ज्यू बाहेर जा. लवकर!''

काही ज्यू पोलीस घरांमध्ये शिरत होते आणि विदीर्ण स्वरात म्हणत होते,

''ती वेळ आली आहे... तुम्हाला हे सर्व सोडावं लागणार आहे.''

हंगेरियन पोलीस त्यांच्या हातातल्या दंडुक्यानं आणि बंदुकीच्या दस्त्यानं जो वाटेत येईल, त्याच्या डोक्यावर प्रहार करत होते. कारणाशिवायच त्यांचे हात चौफेर चालत होते आणि ते लोकांना मारत होते. लहान मुलं, वृद्ध, अपंग–कुणीही त्यांच्या दंडुक्याच्या



तावडीतून सुटत नव्हतं.

एकामागून एक घरं रिकामी झाली. माणसं रस्त्यावर आली. माणसांनी आणि बोचक्या–गाठोड्यांनी रस्ते भरून गेले. पोलिसांनी सर्वांची नावं पुकारून हजेरी घेतली. एकदा, दोनदा, वीस वेळा. रस्त्यांवर भयंकर ऊन होतं. सगळ्यांचे चेहरे घामानं ओले चिकट झाले होते. शरीरांमधून घाम पाझरत होता.

मुलं पाण्यासाठी रडत होती.

पाणी?भरपूर पाणी होतं. हाताच्या अंतरावरच, घरांमध्ये, अंगणांमध्ये पाणी होतं. पण ज्यूंना रांग मोडण्याची सक्त मनाई होती.

''मम्मी!पाणी!'' मुलं रडतच होती.

घेटोतल्या काही ज्यू पोलिसांनी गुपचूप पाण्याची भांडी भरून आणली. माझा आणि माझ्या बहिणीचा नंबर शेवटच्या तुकडीत होता; आम्ही अजूनही इकडे तिकडे फिरू शकत होतो; त्यामुळे आम्ही तहानलेल्यांना पाणी देण्यासाठी जेवढी करता येईल, तेवढी मदत केली.

शेवटी दुपारी एक वाजता ज्यूंना रस्त्यांमधून हलवण्याचा इशारा मिळाला.

ज्यू आनंदले. होय, आनंदच झाला त्यांना. बोचकी घेऊन भर रस्त्यात तळपत्या उन्हात बसायचं, यापेक्षा अधिक तापदायक काय असणार? देवानं नरकासाठीसुद्धा इतकी कठोर शिक्षा ठेवली नसेल. या दिव्यातून एकदाची सुटका झाली, या विचारानं ज्यू आनंदले. याखेरीज दुसरा कुठलाही छळ त्यांना त्यावेळी तरी मान्य होता. ज्यू रांगेनं पुढं सरकत होते. त्यांचा प्रवास सुरू झाला होता. त्यांनी एकदाही मागे वळून त्या सोडलेल्या घरांकडे, रस्त्यांकडे पाहिलं नाही! मागे टाकलेले रस्ते, रिकामी मृत घरं, बागा आणि थडग्यांचे दगड! प्रत्येकाच्या पाठीवर माफक ओझं होतं. प्रत्येकाच्या डोळ्यांमध्ये अश्रूंत बुडालेले दुःखभोग होते!

हळूहळू, जडपणे ती मिरवणूक घेटोतून बाहेरचा मार्ग आक्रमू लागली.

– आणि मी उभा होतो पदपथावर. काही सुद्धा हालचाल करवत नव्हती. करावीशी वाटत नव्हती. माझ्यासमोरून आमचे धर्मगुरू गेले. त्यांचा चेहरा स्वच्छ, पाठ वाकलेली, पाठीवर त्यांच्या सामानाचं ओझं. हद्दपार होणाऱ्या त्या ज्यूंच्या समूहात त्यांचं फक्त अस्तित्वसुद्धा त्या दृश्याला उदात्ततेचा स्पर्श करत होतं. एखाद्या गोष्टींच्या पुस्तकातलं किंवा बॅबिलॉनच्या बंदिवासाविषयीच्या ऐतिहासिक कादंबरीचं फाटलेलं जणू पानच– असं ते दृश्य दिसत होतं.

माझ्या समोरून एक एक ज्यू रांगेत पुढे निघून गेला.

शेवट कुठं, ते माहीत नसलेली ती 'मिरवणूक' हळूहळू दिसेनाशी झाली, तीत माझे शिक्षक होते, मित्र होते, नातलग होते, ओळखीचे होते. त्यांच्यापैकी कोणाला तर मी भीत होतो, कोणाची तरी मी चेष्टा केली होती. ती सगळी माणसं...त्यांच्यात मी अनेक वर्षं राहिलो होतो. ती सगळी निघून गेली. मोडून पडलेली, कशीतरी पाय ओढत, स्वत:बरोबर आयुष्यं ओढत. घरादाराचा त्याग करून ती निघाली होती. त्यांनी मागे सोडलेली त्यांच्या बालपणाची, तारुण्याची वर्षे पेकाटात दगड बसलेल्या कुत्र्याप्रमाणे विव्हळत होती.

माझ्याकडे एक कटाक्षही न टाकता सारे पुढं गेले. त्यांना नक्कीच माझा हेवा वाटला असणार.

रस्त्याच्या कोपऱ्यावरून ती शिस्तीत पुढं जाणारी मिरवणूक दिसेनाशी झाली. आणखी काही पावलं चालल्यावर ते लोक घेटोच्या दारापाशी जातील. मग आत भिंतीच्या पलीकडे.

अचानक निर्मनुष्य झालेल्या बाजाराप्रमाणे रस्ते दिसत होते. निघून गेलेल्या माणसांचं सर्व सामान रस्त्यांवर पडलं होतं. सूटकेसेस्,



सुऱ्या, प्लेटस्, नोटा, कागद, काही जुनाट चित्रं. हे आपण बरोबर नेऊ शकू, असं लोकांना वाटलं होतं. पण त्यांना ते तिथंच टाकून द्यावं लागलं होतं. त्या सामानाला आता काहीच किंमत उरली नव्हती.

घरांच्या खोल्या सताड उघड्या होत्या. दारं आणि खिडक्या तोंड वासून निर्माण झालेल्या रिक्तपणा बघत होत्या. कुणाच्याच मालकीची नसलेली घरं, रस्त्यावर पडलेलं सामान– सर्व काही कुणाहीसाठी मुक्त होतं.

उघडं थडगं.

उन्हाळ्यातला तळपता सूर्य.

आम्ही उरलेला सगळा दिवस काही खाल्लंच नाही. पण आम्हाला भूकही लागली नव्हती. आम्ही फार शिणलो होतो.

हद्दपारीला निघालेल्या त्या लोकांबरोबर माझे वडील घेटोच्या दारापर्यंत गेले.सगळ्या लोकांना प्रथम एका भव्य प्रार्थनामंदिरातून पुढं नेलं. त्या प्रार्थनामंदिरातून जाताना प्रत्येकाची कसून तपासणी करण्यात आली. कुणी आपल्याबरोबर सोनं, चांदी किंवा इतर मौल्यवान वस्तू तर नेत नाही ना, हे बघण्यासाठी. त्यावेळी हंगेरियन पोलीस तर अंगात संचारल्यासारखंच वागले. त्यांनी उगाचच त्या निरपराध लोकांना दंडुक्यांनी बडवून काढलं.

''आपली पाळी केव्हा येणार?'' मी माझ्या वडिलांना विचारलं

''परवा. एकदम काहीतरी वेगळं घडलं, तर... कदाचित..... काही चमत्कार घडला, तरच ते टळू शकेल.''

इथून नेलेल्या लोकांचं पुढं काय करणार आहेत? कुठ नेणार आहेत त्यांना? कोणाला तरी माहिती आहे का त्याबद्दल?

नाही, ते अगदी गुप्त ठेवण्यात आलं होतं.

रात्र झाली. आम्ही लवकरच झोपायला गेलो.

माझे वडील म्हणाले,

"नीट झोपा, मुलांनो, आपल्याला अजून अवकाश आहे. परवा... मंगळवारपर्यंत."

उन्हाळ्यातल्या लहानशा ढगाप्रमाणे सोमवार निघून गेला. दिवसा पडणाऱ्या स्वप्नाप्रमाणे.

आम्ही सगळे पाठीवर घ्यायचं सामान तयार करण्यात, ब्रेड आणि केक्स भाजण्यात मग्न होतो. आम्ही इतर कशाचाच विचार करत नव्हतो. आमच्याही हद्दपारीचा हुकूम निघाला होता.

सोमवारच्या रात्रीही आईनं आम्हाला लवकर बिछान्यात पिटाळलं. ती म्हणाली,

"अंगातली शक्ती जपून ठेवायला पाहिजे."

आमच्या घरातली ती शेवटची रात्र होती.

मंगळवारी मी पहाटेच जागा झालो. इथून हद्दपार होण्यापूर्वी मला प्रार्थना करायला वेळ हवा होता.

वडीलही लवकरच उठले होते आणि माहिती काढायला गेले होते. ते आठ वाजता परत आले. त्यांनी चांगली बातमी आणली- आम्ही आज फक्त एका घेटोत जाणार होतो. आजच आम्हाला आमचं गाव सोडायचं नव्हतं. घेटोत आम्ही वाट बघणार होतो, आम्हाला कुठंतरी घेऊन जाणाऱ्या गाडीची. आमचा नंबर शेवटचा होता. तेवढंच...

रविवारसारखे दृश्य आजही नऊ वाजता सुरू झालं. सगळीकडे तसंच. लाठ्या बडवत ओरडणारे पोलीस-

"ज्यू सगळे... बाहेर निघा!"

आम्ही तयारच होतो. रांगेत पहिला नंबर माझा होता. मला



माझ्या आईवडिलांच्या चेहऱ्यांकडे बघायचं धैर्य नव्हतं, म्हणून मीच पुढं गेलो. मला एकदम रडू कोसळायलाही नको होतं. परवा जशी माणसं रस्त्यात बसली होती, तसेच आम्हीही बसलो. तसाच भयानक उष्मा होता. भाजून काढणारा. तीच तहान. पण आज आम्हाला पाणी आणून देणारं कोणी नव्हतं.

मी वळून आमच्या घराकडे पाहिले. ते घर-जिथं मी देवाच्या शोधात इतकी वर्षे काढली. मसीहा लवकर भेटावा, म्हणून उपवास केले होते. माझं पुढचं आयुष्य कसं असेल, याची अनेक कल्पनाचित्र रंगवली होती. हद्दपारीची कल्पना मी केली नव्हती. करू शकलोच नव्हतो.

मला वाईट वाटलं. मग कोणताच विचार न करता बसून राहिलो.

सणकन एक हुकूम सुटला.

"उभे रहा! आकडे मोजा."

आम्ही उभे. मग संख्यामोजणी. पुन्हा खाली बसणं. पुन्हा उभं राहणं. दुसऱ्यांदा मोजणी. ते संपतच नव्हतं. आम्हाला आता इथून हालवून कुठंतरी नेलं जावं, म्हणून आम्ही अधीर झालो होतो. कशासाठी थांबले होते ते?

शेवटी हुकूम सुटला-

"रांगेत चालायला लागा!"

माझे वडील रडत होते. मी प्रथम त्यांना रडताना बघत होतो. ते रडतील, असं मला वाटलंच नव्हतं.

आई मात्र मुकाट्यानं चालत होती. तिच्या चेहऱ्यावर एकच कष्टी भाव होता. ती काहीच बोलत नव्हती. विचारात बुडून गेली होती ती.

मी माझ्या लहान बहिणीकडे– झिपोराकडे पाहिलं.

तिचे सुंदर मुलायम केस. छान विंचरलेले. खांद्यावर लाल कोट. सात वर्षांची ती मुलगी. तिच्या पाठीवरचं ओझं तिला फार होतं. तिच्या मानानं जास्तच. ती ओठ आवळून ते पेलत होती. तक्रार करण्यात अर्थ नाही, हे तिला एव्हाना कळून चुकलं होतं.

मधून मधून पोलिसांच्या लाठ्यांचे तडाखे सर्वांनाच मिळत होते.

"लवकर चला!" ते ओरडत होते.

माझ्यात काही त्राणच शिल्लक उरलं नव्हतं. प्रवास तर आत्ताशी कुठं सुरू झाला होता; आणि मला इतकं गळल्यासारखं वाटत होतं..

"भराभर पावलं उचला, आळशी डुकरांनो!"हंगेरियन पोलीस ओरडत होते.

त्या क्षणापासून मला त्यांचा तिरस्कार वाटू लागला.

आजही हा तिरस्कार हाच त्यांच्या-माझ्यातला एकमेव दुवा आहे. आमचा छळ करणारे तेच पहिले होते. नरक आणि मृत्यू यांचे मला दिसलेले पहिले चेहरे तेच होते.

आम्हाला पळायचा हुकूम सुटला. आम्ही दुप्पट वेगानं पुढं सरकू लागलो. आमच्यात इतकी शक्ती आहे, हे कोणाला तरी खरं वाटलं असतं का? आम्ही पळत होतो. आपल्या खिडक्यांमधून, झडपांमधून आमचे देशबांधव आमच्याकडे बघत होते.

अखेर आमच्या मुक्कामाचं ठिकाण आलं. पाठीवरच्या पिशव्या जमिनीवर फेकून आम्ही खाली बसकण मारली.

"हे देवा! तू विश्वाचा स्वामी आहेस. तुझी करुणा अपार आहे. आमची दया येऊ दे." माझ्या मनात प्रार्थना उमटत होती.



लहानसा घेटो. तीन दिवसांपूर्वी काही लोक तिथं राहून गेले होते. त्यांनी वापरलेल्या वस्तू आता आम्ही वापरणार होतो. ते आता हद्दपार झाले होते. आम्ही त्यांना पूर्णपणे विसरूनही गेलो होतो.

मोठ्या घेटोपेक्षा इथं सगळाच गोंधळ होता.कमालीची अव्यवस्था. इथूनही लोकांना अनपेक्षितपणेच बाहेर काढलं असावं. माझ्या काकांचं कुटुंब ज्या खोलीत राहिलं होतं,ती खोली बघायला मी गेलो. टेबलावर एक वाडगा होता. त्यात अर्धवट संपलेलं सूप तसंच राहिलं होतं. मांसाचे तुकडे ओव्हनमध्ये भाजण्यासाठी ठेवले होते, पण भाजायला वेळच मिळाला नसावा. फरशीवर पुस्तकं इतस्ततः पसरली होती.ती पुस्तकं बरोबर न्यायचं माझ्या काकाचं स्वप्न असावं का?

या ठिकाणी आम्ही स्थिरावलो.( काय शब्द आहे!) मी काही लाकडं गोळा करून आणली. माझ्या बहिणीनं विस्तव पेटवला. आई अतिशय खिन्न होती, तरी ती स्वयंपाकाच्या तयारीला लागली.

"स्वस्थ बसून कसं चालेल?"असं ती पुन्हा पुन्हा म्हणत होती.

लोकांचं मनोधैर्य अगदीच खचलेलं नव्हतं. आम्ही याही परिस्थितीशी जुळवून घ्यायला लागलो. काहीतरी चांगलं घडेल, अशी आशा लोकांच्या बोलण्यातून डोकवायला लागली. लोक म्हणत होते, की आपल्याला हद्दपार करायला जर्मनांना वेळच मिळणार नाही. आधीच जे हद्दपार झाले, ते फार वाईट झालं. आणखी माणसांना ते असं हाकलणार नाहीत. युद्ध संपेपर्यंत कदाचित आपल्याला असंच इथं घेटोमध्ये हलाखीचं जीवन जगावं लागेल. पण हरकत नाही. युद्ध संपलं, की आपली घरं...

घेटोवर पहारा नव्हता. कुणाला कुठंही हिंडता फिरता येत होतं. आमची जुनी नोकराणी मार्था आम्हाला भेटायला आली. ती

म्हातारी झाली होती. आमची अवस्था बघून ती ढसढसा रडली. दहा वेळा कळवळून विनवत होती, की

''तुम्ही माझ्या गावी, माझ्या घरी चला. तिथं मी तुम्हाला सुरक्षित आसरा देईन.''

माझे वडील मात्र ऐकायला तयारच नव्हते. ते मला आणि माझ्या मोठ्या बहिणीला उद्देशून म्हणाले,

''तुला आणि तिला जायचं असेल, तर जा. मी तुझ्या आईबरोबर झिपोराला घेऊन इथंच राहीन.''

साहजिकच आम्ही एकमेकांपासून दूर व्हायला नकार दिला.

रात्र झाली. कोणीही प्रार्थना केली नाही. तारे म्हणजे आम्हाला गिळंकृत करायला टपलेल्या आगीच्या ठिणग्या वाटत होत्या. तो अग्नि ज्या दिवशी विझेल, त्या दिवशी आकाशात काहीच उरणार नाही. मृत तारे आणि मेलेले डोळे.

आम्हाला करण्यासारखं काहीच काम नव्हतं. म्हणून आम्ही अंथरुणावर पडलो. इथून निघून गेलेल्यांची अंथरुणं. बस्स, पडून राहायचं, शक्य तेवढी विश्रांती घ्यायची आणि शक्ती वाचवायची.

सकाळ झाली, तेव्हा तर कालपासून मनावर असलेलं दुःखांचं, काळजीचं सावटही कमी झालं. आम्हाला वाटलं, आम्ही इथं चार दिवस सुट्टी घालवायला आलो आहोत.

लोक म्हणत होते,

''कुणी सांगावं? कदाचित आपल्या भल्यासाठीच आपल्याला हद्दपार केलं जात असेल. इथून युद्धाची आघाडी काही फार दूर नाही. लवकरचं आपल्याला बंदुकांचे आवाजही ऐकू येतील. अशा वेळी नागरी लोकांना गावातून हलवणंच योग्य आहे.''

''कदाचित आपण गोरिलांना मदत करू. अशी जर्मनांना



भीती वाटली असेल, म्हणून आपल्याला हद्दपार केलं जात असेल.''

''मला तर वाटतं, हद्दपारीचं हे सगळं नाटक रचलं आहे. खरं सांगतो. हसू नका. जर्मनांना आपले दागिने चोरायचे होते. आपण ते पुरून ठेवले आहेत, हे त्यांना माहीत होतं. आपल्याला गावाबाहेरचं पाठवलं, म्हणजे त्यांचं काम सोपं होणार.''

सारी आशावादी बोलणी. कोणाचाच त्यावर विश्वास नव्हता, पण वेळ जायला चांगली होती.

आम्ही थोडे दिवस घेटोमध्ये होतो. तसे मजेत राहिलो आणि दिवस शांततेत गेले. लोक एकमेकांशी अतिशय मिळून मिसळून वागत होते. सामाजिक, आर्थिक किंवा प्रतिष्ठेचा– कोणताच भेदभाव त्यांच्या वागण्यात दिसत नव्हता. अद्यापही अज्ञात असलेल्या दैवाला मात्र सगळे जण शिव्याशाप देत होते.

शनिवारचा विश्रांतीचा दिवस आमच्या हद्दपारीसाठी निवडण्यात आला.

आदल्या रात्री शुक्रवारी आम्ही नेहमीप्रमाणे जेवण केलं. आम्हाला मिळालेल्या अन्नासाठी आम्ही आमच्या प्रथेप्रमाणे देवाचे आभार मानले आणि काहीही न बोलता अन्न गिळलं. असं वाटत होतं, जेवणाच्या निमित्ताने आमच्या कुटुंबाचं हे शेवटचंच एकत्र येणं. रात्री मला झोप लागलीच नाही. आठवणी आणि विचारांच्या चक्रात मी भरकटत होतो.

सकाळी आम्ही पुन्हा रस्त्यावर आलो. कुठंतरी निघायच्या तयारीत. या वेळी आमच्यावर डाफरणारे हंगेरियन पोलीस नव्हते. ज्यू कौन्सिलशी झालेल्या करारानुसार त्यांनीच पुढची सर्व व्यवस्था बघावी, असं ठरलं होतं.

आमचा सुरक्षा मार्गदर्शक प्रार्थनामंदिरात गेला. ते

प्रार्थनामंदिर एखाद्या भव्य रेल्वे स्टेशनाप्रमाणे होतं. आमचं थोडसं सामान आणि खूप सारे अश्रू. त्या प्रार्थनामंदिराच्या भिंती उघड्याबोडक्या होत्या, भिंतीवरची चित्रं फाटून खाली पडली होती. वेदींची मोडतोड झाली होती.

आम्ही इतकी माणसं-कोंबल्यासारखी दाटीवाटीनं तिथं उभी होती. श्वास घेणंही अवघड जात होतं, इतकी गर्दी. आम्ही त्या ठिकाणी अत्यंत भयानक असे चोवीस तास काढले. खालच्या मजल्यावर पुरुष आणि वरच्या मजल्यावर बायका. तो शनिवार होता. आम्ही जणू प्रार्थना करायला बसलो होतो. कोणालाही बाहेर जायची परवानगी नव्हती. त्यामुळे लोक कोपऱ्यातच आपल्या शरीराचे विधी उरकत होते.

दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी सकाळी आम्ही स्टेशनकडे निघालो. तिथं गुरांसाठी असलेले रेल्वेचे डबे होते. यावेळी हंगेरियन पोलिसांनी आम्हाला डब्यामध्ये शिरायला सांगितले. एका डब्यात ऐंशी माणसं. डब्यांमध्ये आमच्यासाठी मोठे पाव आणि पाण्याच्या बादल्या भरून ठेवल्या होत्या. खिडक्यांच्या गजांची तपासणी झाली. सैल असले, तर लोक पळून जायचे! नंतर डबे सीलबंद करण्यात आले. प्रत्येक डब्यात एक पोलीस देखरेखीसाठी होता. कोणी पळून गेलं तर, त्याला गोळी घालण्यात येणार होती.

प्लॅटफॉर्मवर दोन गेस्टपो अधिकारी फेऱ्या मारत होते. सगळं काही ठीक झालं, असं समाधानाचं हसू त्यांच्या चेहऱ्यावर होतं.

बराच वेळ वाजत राहिलेली कर्णकर्कश् शिटी हवेला चिरत गेली. अजस्र चाकं करकरत सुरू झाली. आम्ही वाटेला लागलो होतो.

■ ■ ■



# दोन

त्या डब्यामध्ये निजणं तर शक्यच नव्हतं. जागाच नव्हती. आम्ही आळीपाळीनं बसायचं ठरवलं. हवा यायलाही जागा नव्हती. फार कोंदट वाटत होतं. जे खिडकीपाशी होते, ते खरंच सुदैवी, खिडकीतून त्यांना बाहेर पसरलेला गावाबाहेरचा निसर्गरम्य, बहरलेला भूप्रदेश दिसत होता.

दोन दिवस आमचा प्रवासच सुरू होता. आम्ही कुठं जातोय, हे आम्हालाही माहीत नव्हतं.

दोन दिवसानंतर आमचा जीव तहानेनं व्याकूळ व्हायला लागला. उष्णता असह्य व्हायला लागली.

सगळ्या सामाजिक बंधनांपासून मुक्त झाल्यामुळं तरुण लोकांनी त्यांच्या नैसर्गिक प्रेरणा पूर्ण करून घेतल्या. अंधाराचा फायदा घेऊन गर्दीमध्येच तरुण-तरुणींनी लैगिंक सुख भोगून घेतलं. त्यांना आजूबाजूच्या कोणाचीच पर्वा नव्हती. जणू जगात ते एकटेच होते. बाकीच्यांनीही आपण काहीच पाहिलं नसल्याचं ढोंग केलं.

आमच्याजवळ अजूनही थोडे अन्नपदार्थ शिल्लक होते. पण आम्ही पोटभर कधी खाल्लंच नाही. उद्यासाठी शिल्लक ठेवायचं, हा

आमचा नियम होता. कदाचित येणारा दिवस आणखी वाईट असेल. आणखी त्रासाचा.

झेकोस्लाव्हाकियाच्या सरहद्दीवरच्या कॅशॉऊ या लहान गावी गाडी थांबली. त्याचवेळी आमच्या लक्षात आलं, की आम्ही हंगेरीत राहणार नाही आहोत. आमचे डोळे उघडले, पण फार उशीरा!

आमच्या डब्याचं दार उघडलं गेलं. एक जर्मन ऑफिसर दिसला. त्यांच्याबरोबर एक हंगेरियन लेफ्टनंट होता. तो दुभाष्याचं काम करीत होता. जर्मन अधिकारी आमच्या पुढ्यात येऊन उभा राहिला. त्याने स्वत:ची ओळख करून दिली. मग तो म्हणाला,

''या क्षणापासून तुम्ही जर्मन सेनेच्या अधिकाराखाली आहात. तुमच्यापैकी कोणाहीजवळ अजूनही सोनं, चांदी आणि घड्याळ वगैरे काही असेल, तर ते आत्ताच काढून ठेवा. यानंतर मात्र कोणीही जवळ एखादी मौल्यवान वस्तू बाळगताना आढळलं, तर त्या व्यक्तीला तत्क्षणीच गोळ्या घालून ठार केलं जाईल. दुसरं म्हणजे, कोणी आजारी असेल, बरं वाटत नसेल, तर गाडीला जोडलेल्या हॉस्पिटलच्या डब्यात जा. बस्स, इतकंच सांगायचं आहे.''

हंगेरियन लेफ्टनंट एक टोपली घेऊन आमच्यातून फिरला आणि त्यानं लोकांजवळच्या उरल्यासुरल्या शेवटच्या वस्तूही गोळ्या केल्या. लोकांनीही होतं नव्हतं ते त्या टोपलीत टाकून दिलं. कारण त्यांना दहशतीची आणखी कडवट चव घ्यायची नव्हती.

जर्मन ऑफिसर म्हणाला,

''या डब्यात तुम्ही एकूण ऐंशी जण आहात. त्यातला



एक जण जरी कमी झाला, तरी तुम्ही सगळेच्या सगळे गोळ्या घालून मारले जाल...कुत्र्यासारखे.''

दोघं निघून गेले. डब्याची दारं पुन्हा बंद झाली. आम्ही पुरते सापळ्यात अडकलो होतो. अगदी गळ्यापर्यंत. दारं मोठाले खिळे ठोकून बंद करण्यात आली. मागे परतायचा आमचा मार्ग आता पूर्णपणे तोडला गेला होता. जग म्हणजे, आता फक्त गुरांचा डबा होता! हवाबंद, सील ठोकलेला डबा.

आमच्या डब्यात एक स्त्री होती. तिचं नाव सॅश्तर. ती पन्नाशीच्या जवळ आलेली होती. तिचा दहा वर्षांचा मुलगाही तिच्याबरोबरच होता. तो घाबरून कोपऱ्यात दबून बसला होता. तिचा नवरा आणि दोन मोठी मुलं चुकून पहिल्या गाडीनं हद्दपार झाले होते. पतीची आणि मुलांची झालेली ही ताटातूट तिला सहन होत नव्हती. ती अक्षरश: खचून गेली होती.

ती माझ्या चांगली ओळखीची होती. स्वभावानं अतिशय शांत; पण डोळे विलक्षण तेजस्वी. जणू दोन जळते निखारेच. ती आमच्या घरी नेहमी यायची. तिचा नवरा धार्मिक प्रवृत्तीचा होता. तो रात्रंदिवस वाचन आणि अभ्यास करत असायचा. तीच काम करून कुटुंबाचं पालनपोषण करायची.

पण या सगळ्या प्रकारामुळे सॅश्तरच्या मनाचा तोल पूर्णपणे ढासळला होता. प्रवासाच्या पहिल्या दिवशी तर तिनं रडून रडून आकांत केला. सतत विचारत होती.

''मला माझ्या कुटुंबापासून अलग का केलं?''

पुढं पुढं तर तिचं रडणं वेडाच्या झटक्यासारखं व्हायला लागलं.

तिसऱ्या रात्री आम्ही एकमेकांवर रेलून बसल्या बसल्याच

झोपलो होतो. काही जण उभेच होते. एकाएकी तीक्ष्ण किंकाळी हवेला भेदून गेली.

''आग,आग! मला आग लागलेली दिसते आहे!''

क्षणभर सगळीकडे घबराट पसरली. आम्ही खडबडून जागे झालो.

कुठं होती आग? कोण एवढ्या जोरात किंचाळत होतं?

सॅश्तरच होती ती. डब्याच्या मध्यभागी ती उभी होती. खिडकीतून क्षीण, फिकट उजेड तिच्यावर पडला होता. त्या उजेडात ती शेतातल्या वाळलेल्या झाडासारखी दिसत होती. खिडकीच्या दिशेनं हात दाखवून ती पुन्हा ओरडली,

''तिकडे बघा. भयानक आग लागली आहे. कुणीतरी वाचवा या आगीपासून!''

काही पुरुष खिडकीतून बाहेर बघण्यासाठी गजांना लोंबकळले. पण बाहेर काहीच नव्हतं. फक्त अंधार.

भयंकर दचकून आम्ही सगळे झोपेतून जागे झालो होतो. तो धक्का अजूनही ओसरला नव्हता. हृदयातली धडधड आणि शरीराची थरथर अजूनही थांबली नव्हती. रुळांवर धावणाऱ्या अवजड चाकांच्या प्रत्येक खडखडाटाबरोबर आम्हाला वाटत होतं, आता आमच्या शरीराखाली भयानक खोल विवराचं तोंड उघडणार आहे. आमचं स्वत:चंच दु:ख शमवायला आम्ही असमर्थ हातो.

''वेडी झाली आहे. बिचारी!''कुणीतरी म्हणालं.

एकानं तिला शांत करण्यासाठी तिच्या कपाळावर ओलं फडकं ठेवलं. पण तिच्या किंकाळ्या सुरूच होत्या.

तिचा लहानसा मुलगा तळतळून रडत होता. तिच्या स्कर्टला बिलगून तिचे हात पकडायचा प्रयत्न करत होता. म्हणत होता,



''ममी, शांत हो. खाली बैस. आग वगैरे काही नाही आहे.''

आईच्या करुण किंकाळ्यापेक्षांही त्या लहान मुलाच्या बोलण्यानं मी हेलावून गेलो. काही स्त्रियांनी तिला शांत करण्याचा प्रयत्न केला.

''तुझा पति आणि मुलं लवकरच तुला भेटतील. काही दिवसांनी. रडू नकोस.''

पण श्वासही न घेता तिचं किंचाळणं सुरूच होतं. तिचा आवाज पार पिचून फाटून गेला होता.

''ज्यूंनो! माझं ऐका. मला आग दिसते आहे. प्रचंड मोठ्या ज्वाला आहेत. भट्टी पेटली आहे.''

असं वाटत होतं, कोणत्या तरी अदृश्य शक्तीनं तिला झपाटलं होतं आणि तिच्या तोंडून ती शक्तीच भवितव्य बोलत होती.

आम्ही ते शब्द मनातून झटकून टाकायचा प्रयत्न केला. तिचं सांत्वन करण्यापेक्षा आम्ही आमचेच भीतीनं गुदमरणारे श्वास सुरळीत करण्याचा प्रयत्न करत होतो. मनात भीती इतकी दाटली होती की, ती आता डब्याच्या दोन्ही बाजू फोडून बाहेर पडेल की काय, असं वाटत होतं. ओढून ताणून आणलेलं आमचं मनोधैर्य पुरतं खचलं होतं. मनावरचा ताण असह्य होत होता. आमची शरीरं भीती आणि घृणेच्या भावनेनं भरून गेली होती. कोलमडण्याच्या अवस्थेला आम्ही आलो होतो. त्या वेडाची पकड आमच्यावरही हळूहळू घट्ट होत होती.

खरोखरच आम्ही सगळे वेडे झालो, तर?

आम्हाला ते सगळं सहन होत नव्हतं.

काही तरुण मुलांनी सॅश्तरला जबदरस्तीनं खाली बसवलं. दोरीनं तिला बांधून टाकलं आणि तिच्या तोंडात बोळा कोंबला.

मग भीषण शांतता. तिचा लहान मुलगा रडत रडत

तिच्याजवळ खाली बसला. माझा श्वास पुन्हा सुरळीत सुरू झाला. रात्रीच्या काळोखातून धावणाऱ्या त्या गाडीच्या चाकांचा होणारा तोच तो कंटाळवाणा कठोर खडखडाट एकाच तालात वातावरण घुसळून काढत होता. फक्त तेवढाच आवाज आम्हाला ऐकू येत होता. आम्ही त्या तालावर पुन्हा श्वास घ्यायला लागलो. बसल्या बसल्याच डुलक्या घ्यायला लागलो. तीच आमची विश्रांती. त्या तशा झोपेतही स्वप्नं पडत होती.

असे एक-दोन तास गेले असतील. पुन्हा काळीज भेदून टाकणारी किंकाळी उठली! सॅश्तरने स्वत:ची बंधनातून सुटका करून घेतली होती आणि ती पहिल्यापेक्षाही मोठ्यांदा रडत ओरडत होती.

''ज्वाळा!सगळीकडे ज्वाळाच ज्वाळा दिसताहेत.''

पुन्हा त्या तरुण मुलांनी तिच्या तोंडात बोळा कोंबला. काहींनी तर तिला मारलंसुद्धा. इतरांनी त्यांना प्रोत्साहनं दिलं-

''असंच गप्प करा तिला. ती वेडी झाली आहे. इथं दुःख सोसणारी काही ती एकटीच नाही आहे. तिला साधं गप्पही राहता येत नाही का?''

त्यांनी तिला खूप मारलं. डोक्यावर असे काही प्रहार केले, की त्यामुळं कदाचित ती मरूनही गेली असती. तिचा लहान मुलगा तिला बिलगला. तो आता रडत सुद्धा नव्हता. त्याचे अश्रू आटून गेले होते. त्यानं एक शब्दही उच्चारला नाही.

अंतहीन रात्र. पहाट होता होता सॅश्तर शांत झाली. तिच्या कोपऱ्यात ती अंगाचं मुटकुळं करून बसली होती. तिची भकास दृष्टी रिती आणि भावहीन दिसत होती. तिला आम्ही कोणीच दिसत नव्हतो. संपूर्ण दिवसभर ती त्याच अवस्थेत होती. मुकी, आमच्यात असूनही



एकटी, कुठंतरी हरवलेली.

रात्र होताच ती पुन्हा ओरडायला लागली. ती आकाशात एका विशिष्ट जागेकडे बोट दाखवत होती. ती जागा दरवेळी एकच असे. लोकांना तिला मारायचाही कंटाळा आला. ते मारून थकले. पण ती ओरडून थकली नाही. असह्य उष्णता, तहान, अतिशय घाण वास, जीव गुदमरून टाकणारी कोंदट हवा या सगळ्या प्रतिकूल गोष्टी तिच्या किंकाळण्याच्या तुलनेत काहीच तापदायक वाटत नव्हत्या. तिच्या सततच्या किंकाळ्यांमुळे आम्ही अगदी विदीर्ण झालो होतो. आम्हाला वाटलं, तिच्या सहवासात आम्ही आणखी काही दिवस राहिलो, तर आम्हीही असंच किंचाळायला लागू.

पण सुदैवानं एक स्टेशन आलं. जे खिडकीच्या जवळ होते, त्यांनी नाव सांगितलं :

'ऑशवित्झ.'

ते नाव कधीच कोणी ऐकलं नव्हतं.

गाडी पुन्हा सुरू झाली नाही.

दुपार हळूहळू उलटली.

काही वेळानं डब्याचं दार उघडलं गेलं. पाणी आणण्यासाठी फक्त दोन जणांना खाली सोडण्यात आलं.

दोघं परत आले. त्यांनी आम्हाला सांगितलं, की हा शेवटचा थांबा आहे. त्यांना ही माहिती कुठून मिळाली, कोण जाणे, पण ती मिळविण्यासाठी एकाला त्याचं सोन्याचं घड्याळ गमवावं लागलं होतं! आम्हाला कोणतीही माहिती मोलाची वाटत होती. आम्हाला या ठिकाणी डब्याबाहेर काढणार होते. या गावात एक श्रमछावणी होती. तिथली परिस्थिती चांगली होती, म्हणे. इथं कुटुंबाची ताटातूट होणार

नव्हती. फक्त तरुण लोकांनीच कारखान्यात कामाला जायचं होतं. म्हाताऱ्या माणसांना आणि अपंगांना शेतावर काहीतरी हलकंसं काम दिलं जाणार होतं.

आमच्यातल्या आशेला, विश्वासाला पुन्हा धुमारा फुटला! मागच्या सगळ्या रात्रीचं मनावर चढलेलं प्रचंड ओझं एकदम दूर झालं. या भयाण रात्रीच्या दहशतीपासून अखेर सुटका झाली होती. आम्ही देवाचे आभार मानले.

सॅश्तर तशीच कोपऱ्यात बसून राहिली. दगडासारखी. मुकी, कोमेजलेली. इतरांच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासाबद्दल उदासीन. तिच्या लहानशा मुलानं तिला जोरात हलवलं.

संध्याकाळ झाली, तसा डब्यात अंधार दाटून आला. आम्ही आमच्याजवळ असलेले खाद्यपदार्थ खायला लागलो. जवळच्या अन्नाचा तो शेवटचा वाटा.

रात्रीचे दहा वाजले, तेव्हा प्रत्येक जण थोडीशी झोप मिळवण्यासाठी त्यातल्या त्यात आरामदायक अवस्थेत बसण्याचा प्रयत्न करत होता.

जरा झोप लागली, तो अचानक-

''आग! ती बघा भट्टी पेटली आहे!''

पुन्हा आमचं दचकून जागं होणं. धडपडत आम्ही खिडकीपाशी धावलो. क्षणभर का होईना. आम्ही पुन्हा तिच्या ओरडण्यावर विश्वास ठेवून फसलो!

बाहेर काहीही नव्हतं. फक्त रात्रीचा किट्ट अंधार होता.

मनातल्या मनात चरफडत आम्ही आपापल्या जागी परत आलो. भीती आम्हाला पोखरून काढत होती.

आमच्या डब्याचा ताबा ज्या माणसाकडे होता, त्यानं



प्लॅटफॉर्मवरून जाणाऱ्या एका जर्मन अधिकाऱ्याला जवळ बोलावून घेतलं आणि विचारलं,

''या बाईला हॉस्पिटलच्या डब्यात नेता येईल का?''

अधिकारी उत्तरला,

''तुम्ही सगळे शांत रहा. लवकरच तिला तिथं नेलं जाईल.''

रात्री अकरा वाजता गाडी चालू झाली. हळूहळू पुढं सरकायला लागली. आम्ही खिडकीतून बाहेरं बघायला धावलो. गाडीतला आम्हा माणसांचा मोठा तांडा गाडीबरोबर पुढं जात होता.

पंधरा-वीस मिनिटांनी गाडीचा वेग अगदीच कमी झाला. खिडकीतून आम्हाला काटेरी तारा दिसल्या. हीच ती छावणी असावी, याची आम्हाला खात्री पटली.

आम्ही सॅश्तरचं अस्तित्व विसरून गेलो होतो. पण ती अखेरचं अर्थपूर्ण ओरडली,

''ज्यूंनो! बघा खिडकीतून. त्या बघा ज्वाळा!''

गाडी थांबली. यावेळी आम्हाला खरोखरच ज्वाला दिसल्या! एका उंच धुराड्यातून वेगानं बाहेर निघणाऱ्या ज्वालांच्या लवलवत्या जिभा काळ्या आकाशाला चाटत होत्या!

यावेशी सॅश्तर स्वत:च शांत झाली. सुन्न होऊन तिच्या कोपऱ्यात परत गेली.

आम्ही अंधारात त्या ज्वालांकडे बघितलं. हवेत भयंकर असह्य दुर्गंधी पसरली होती.

एकाएकी आमच्या डब्याची दारं उघडली गेली. विचित्र दिसणारी काही माणसं पटापट उड्या मारून डब्यात घुसली. त्यांनी पट्ट्यांपट्ट्यांचे शर्ट आणि काळ्या विजारी घातल्या होत्या. हातात

टॉर्च आणि दंडुके. हातातले दंडुके आडवेतिडवे फिरवत, पुढ्यात येईल, त्याच्यावर प्रहार करत त्यांनी ओरडा सुरू केला,

"चला, डब्याच्या बाहेर निघा, लवकर!"

आम्ही भराभर बाहेर उड्या मारल्या. मी सॅश्तरकडे शेवटचा दृष्टीक्षेप टाकला. तिच्या मुलानं तिचा हात घट्ट धरला होता.

आमच्या समोर ज्वाळा होत्या. हवेत जळणाऱ्या मांसाची दुर्गंधी दाटलेली. मध्यरात्रीचा सुमार असावा.

आम्ही मर्कनौला पोहोचलो होतो - ऑशवित्झ तुरुंगाचं प्रवेशद्वार. छळछावणीचं पहिलं दर्शन!

■ ■ ■



# तीन

आम्ही उराशी बाळगलेली आशादायक चित्रं इथवर जतन करून आणली. पण इथं उतरल्यावर मात्र ती आशा, तो विश्वास आम्ही डब्यातच सोडून दिला. त्या विश्वासाबरोबरच आम्हाला आमचा सुखद भ्रमही सोडून द्यावा लागला!

दर दोन यार्डावर नाझी पोलीस आमच्यावर बंदुका रोखून उभे होते. आम्ही हातात हात घालून गर्दीच्या मागोमाग गेलो.

एक नाझी अधिकारी आमच्या समोर आला. दंडुका आपटत त्यानं हुकूम सोडला,

"सगळे पुरुष डावीकडे आणि स्त्रिया उजवीकडे व्हा!"

ते सात-आठ शब्द तो अत्यंत शांतपणे बोलला. निर्विकार थंडपणे, त्यात कोणतीही भावना नव्हती. फक्त सात साधे शब्द. पण त्या शब्दांनी मला माझ्या आईपासून अलग केलं. मला विचार करायलाही वेळ नव्हता. पण त्याआधीच माझ्या हातात असलेल्या माझ्या वडिलांच्या हाताची पकड घट्ट झालेली मला जाणवली. आम्ही एकटे पडलो होतो. क्षणार्धात मला दिसलं, माझी आई आणि माझ्या बहिणी उजवीकडे जात होत्या. झिपोरानं आईचा हात घट्ट पकडला होता. दूर अंतरावर त्या

दिसेनाशा होताना मी बघत होतो. माझी आई झिपोराच्या मुलायम केसांवर सारखी थोपटत होती. जणू ती झिपोराचं रक्षण करीत होती.मीही माझ्या वडिलांबरोबर आणि इतर पुरुषांबरोबर पुढं सरकत होतो. त्या ठिकाणी, त्या क्षणी माझ्या लक्षातही आलं नाही, की मी माझ्या आईपासून आणि बहिणींपासून कायमचा दूर जात आहे! मी पुढं चालत राहिलो. वडिलांनी माझ्या हाताला धरलं होतं.

माझ्या मागे एक म्हातारा होता. चालता चालता तो पडला. माझा हात नकळत माझ्या वडिलांच्या दंडाभोवती आवळला होता. मला त्यांना घट्ट धरून ठेवायचं हातं. त्यांची आणि माझी ताटातूट होऊ नये, हा एकच विचार त्यावेळी माझ्या मनात होता.

नाझी अधिकाऱ्यांचा पुढचा हुकूम सुटला.

''पाच पाचच्या रांगा करा.''

पुन्हा लोकांची पळापळ आणि गोंधळ. वाटेल ते करून मी आणि वडील एकत्र राहिले पाहिजे.

याच तुरुंगातला एक कैदी मला विचारत होता,

''ए!ए मुला! तुझं वय काय?''

''पंधरा. खरं तर अजून पंधराही नाही.''

''नाही. तुझं वय अठरा. समजलं?''

''पण मी अद्याप पंधराचाही नाही.''

''मूर्ख! मी म्हणतो, ते ऐकं.तसंच सांग.''

मग त्यानं वडिलांना तोच प्रश्न विचारला.

''पन्नास''वडील म्हणाले.

''नाही! चाळीस. कळलं? अठरा आणि चाळीस.''

तो रात्रीच्या अंधारात दिसेनासा झाला.

दुसरा माणूस आला. रागानं आमच्या पुढ्यात पचकन



थुंकला. म्हणाला,

''कुत्र्यांची औलाद! कशाला आला आहात तुम्ही इथं? काय करणार आहात. माहीत आहे?''

आम्ही गप्प होतो. पण आमच्यातल्या एकानं उत्तर द्यायची हिंमत केली.

''कशाला म्हणजे? तुम्हाला काय वाटलं? आम्ही इथं मजा करायला आलो आहोत? आम्हाला इथं आणा, असं काही आम्ही म्हटलं नव्हतं!''

हे उत्तर आणखी लांबलं असतं, तर त्या माणसानं नक्कीचं त्याला ठार केलं असतं. तो माणूस मोठ्यांदा ओरडला,

''गटारीतल्या किड्या, तुझं घाणेरडं थोबाड बंद कर. नाही तर आत्ताच्या आता तुला मारून टाकीन. इथं येण्यापेक्षा तुम्ही लोकांनी गळफास का नाही लावून घेतला स्वत:ला? ऑशवित्झमध्ये काय आहे, काय होतं, हे तुम्हाला माहीत नाही? तुम्ही ऐकलं नाही त्याबद्दल?१९४४ मध्ये?''

नाही, आम्ही ऐकलं नव्हतं. आम्हाला कुणी सांगितलंच नव्हतं.

तो माणूस बोलायला लागला. बोलता बोलता त्याच्या आवाजात कमालीचं क्रौर्य वाढत गेलं.

''तुम्हाला ती धुरांडी दिसताहेत? बघितली? त्या ज्वाळा पाहिल्या?( होय, त्या ज्वाळा गाडी थांबल्याबरोबरच आम्हाला दिसल्या होत्या.) त्या तिथं तुम्हाला नेलं जाणार आहे. तिथं तुमचं थडगं आहे. अजूनही तुमच्या लक्षात आलं नाही ते? मठ्ठ जनावरं आहात तुम्ही. काहीही कळत नाही तुम्हाला. तुम्हाला जाळून मारणार आहेत. राख होईल तुमची.''

रागाच्या भरात तो भ्रमिष्टासारखा करायला लागला. तो त्या

छावणीतला एक जुना कैदी होता. छळानं त्याला भ्रमिष्ट केलं होतं. मला त्याचा चेहरा दिसत नव्हता; पण त्याचा आवाज दुःखानं फाटून गेला होता.

त्याचं बोलणं ऐकून आम्ही सुन्न, स्तब्ध उभे राहिलो. भीतीनं दगड झालो होतो. खरोखरच हे रात्रीचं भयानक स्वप्न होतं का? कल्पनाही करता येणार नाही, असं भयंकर स्वप्न?

माझ्या भोवताली आमच्या लोकांची कुजबूज सुरू झाली.

''आपण काहीतरी करायलाच पाहिजे. आपण अशा तऱ्हेनं ठार मारले जाता कामा नये. कत्तलखान्याकडे निघालेले पशू आहोत आपण? आपण बंड करायला हवं.''

आमच्यात काही धट्टेकट्टे तगडे तरुण होते. त्यांच्याजवळ चाकू-सुरे होते. थोडच्या अंतरावर उभ्या असलेल्या सशस्त्र पहारेकऱ्यांवर आपण तुटून पडू, असं त्या तरुणांनी इतरांना सुचवलं. त्यांनी सर्वांना उद्युक्त करायचा प्रयत्न केला.

एक तरुण ओरडला,

''सर्व जगाला कळू द्या या ऑशवित्झबद्दल. प्रत्येकाला इथली दुष्ट कृत्यं ऐकू द्या. अजूनही लोक सुटू शकतील. पळून जाऊ शकतील इथून.''

पण म्हाताऱ्या माणसांनी गयावया करून प्रक्षुब्ध तरुणांना शांत केलं. प्रत्येकानं आपापल्या मुलांना सांगितलं, की असला वेडेपणा करू नकोस.

म्हातारे म्हणाले,

''डोक्यावर टांगती तलवार असली, तरी माणसानं देवावरची श्रद्धा ढळू देऊ नये. आपल्या पूर्वजांची हीच शिकवण आहे.''

पेटू बघणारी बंडाची ठिणगी विझून गेली. मधल्या मोठ्या



चौकाकडे आमच्या रांगा चालायला लागल्या. मध्यभागी डॉक्टर मेंगेल उभे होते.

खास नाझी ऑफीसर, क्रूर चेहरा, पण बुद्धिमान. त्यानं एकाच डोळ्याचा चष्मा घातला होता. त्याच्या हातात छडी होतीच आणि सर्वांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तो ती छडी अखंडपणे उजव्या- डाव्या बाजूला फिरवत होता.

मी त्याच्या एकदम पुढ्यातच जाऊन उभा राहिलो.

''वय काय तुझं?''त्यानं विचारलं. त्यानं आवाजात प्रेमळपणा आणण्याचा प्रयत्न केला.

''अठरा.''माझा आवाज कापरा झाला होता.

''तुझी तब्येत चांगली आहे?''

''हो.''

''तू काय काम करतोस?''

सांगावं का, मी अजून विद्यार्थीच आहे, म्हणून?

''शेतकरी आहे मी.''माझ्याही नकळत उत्तर निसटून गेलं.

आमचं हे संभाषण काही क्षणच चाललं असेल, पण मला वाटलं, अनंत काळापासून ते चालू आहे. चिरकाल.

त्यानं हातातली छडी डाव्या बाजूला धरली. तो मला त्या बाजूला जायचा इशारा होता. मी जेमतेम एक पाऊल पुढं टाकलं. थांबलो. माझे वडील कुठल्या बाजूला जातात. ते मला बघायचं होतं. जर ते उजव्या बाजूला गेले, तर मीही तिकडेच जाईन. त्यांच्या मागे

छडीचं टोकं पुन्हा एकदा डाव्याच बाजूला गेलं. माझ्या वडिलांसाठी. ते माझ्याच बाजूला आले होते. माझ्या हृदयावरचं केवढं तरी ओझं उतरलं!

कोणती बाजू चांगली डावी, की उजवी, ते आम्हाला

अजूनपर्यंत तरी कळलं नव्हतं. कोणती वाट तुरुंगाकडे जात होती; आणि कोणती दफनभूमीकडे, आम्हाला माहीत नव्हतं. पण त्या क्षणी मी सुखी होतो. कारण माझ्याजवळ माझे वडील होते.

आमच्या रांगा पुढं निघाल्या.

दुसरा एक कैदी आमच्याजवळ आला.

''झालं समाधान?''त्यानं विचारलं.

''होय.''आमच्यातल्या कुणीतरी उत्तर दिलं.

''मूर्ख, बावळट सैतानांनो! तुम्ही स्मशानाकडे निघाला आहात.''

तो खरं बोलत असावा. आमच्यापासून थोड्याच अंतरावर एका मोठ्या चरातून प्रचंड ज्वाळा उसळत होत्या. काहीतरी जळत होतं तिथं. काही क्षणातच तिथं एक लॉरी येऊन थांबली. लॉरीतला माल खाली उतरवला गेला. ती तान्ही अर्भकं होती! छोटी छोटी बाळं. हो, मी ते पाहिलं. माझ्या स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलं. ती लहान बालकं...त्या आगीत...

(त्या रात्री मी झोपू शकलो नाही. कुणीच झोपू शकलं नाही. डोळ्यांतली झोप उडूनच गेली होती.)

तर आम्ही तिकडे जात होतो! आणखी थोडं पुढं मोठ्या माणसांना जाळायला वेगळा चर होता. आकारानं बराच मोठा खणलेला.

मी माझ्या गालांना चिमटा घेतला.

मी अद्याप जिवंत आहे? जागा आहे?

माझाच विश्वास बसत नव्हता. लहान मुलांना जाळायचं, लोकांना जाळायचं आणि वर पुन्हा बाहेरच्या जगाला गप्प ठेवायचं, हे सारं त्यांना कसं साधतं? हे खरं नसणारच. हे फक्त रात्रीचं दुष्ट स्वप्न असणार. लवकरच



मी स्वप्न संपताच दचकून जागा होईन. माझं हृदय धडधडत असेल. मी जागा होईन, तेव्हा माझ्या बालपणातल्या घरातच असेन. माझ्या खोलीत.. माझ्या पुस्तकांच्या सोबतीत.

माझ्या वडिलांच्या आवाजानं माझ्या विचारांची साखळी तुटली.

''फार वाईट झालं. तू तुझ्या आईबरोबर जाऊ शकला नाहीस, हे फार वाईट झालं. तुझ्या वयाच्या कितीतरी मुलांना मी त्यांच्या आयांबरोबर जाताना पाहिलं.''

त्यांचा आवाज कमालीचा कष्टी होता. माझे इथे होणारे हाल त्यांना बघवणार नाहीत, हे मला त्यांच्या बोलण्यावरून जाणवलं. आपला एकुलता एक मुलगा डोळ्यांदेखत जाळला जातोय, हे त्यांना बघवणं शक्यच नव्हतं.

माझ्या कपाळावरून थंडगार घाम पाझरत होता. आजच्या काळात माणसांना कुणी जाळणार नाही, अशी मला खात्री वाटत होती. मी वडिलांना तसं सांगितलं. मी म्हटलं,

''मानवता हे कधीही सहन करणार नाही.''

''मानवता? आपल्याशी काहीही संबंध नाही मानवतेचा. आजच्या घडीला काहीही अशक्य नाही. काहीही करायला परवानगी आहे त्यांना. बघितलंस हे समोरचं स्मशान?''

त्यांचा गळा दाटून आला.

मी म्हणालो,

''असंच असेल, तर मी वाट बघत इथं उभा राहणार नाही. धावत जाऊन त्या विजेच्या तारांवर पडेन. आगीत सावकाश तडफडत जळण्यापेक्षा ते बरं.''

त्यांनी उत्तर दिलं नाही. ते रडत होते. त्यांचं सारं शरीर थरथर

कापत होतं.

आमच्या भोवताली प्रत्येक जण रडत होता. काहींनी मृतांसाठी असलेल्या प्रार्थना म्हणायला सुरुवात केली. मरणोत्तर प्रार्थना स्वत:च्या जिवंतपणी स्वत:लाच म्हणाव्या लागल्या, असं ज्यूंच्या प्रदीर्घ इतिहासात यापूर्वी कधी घडलं असेल की नाही, मला माहीत नाही.

''देवा, तू अगाध आहेस. तुझ्या नावाचा जयजयकार असो.'' माझे वडील पुटपुटले.

प्रथमच माझ्या मनात एक विद्रोह जागा होतो आहे, असं मला जाणवलं. कशासाठी मी त्या देवाच्या नावाचा जयजयकार करावा? तो विश्वाचा स्वामी, शाश्वत, सर्वशक्तिमान आणि दुष्टांचा संहारक असा देव या वेळी शांत होता. मी त्याचा का विचार करू?

आम्ही पुढं सरकतच होतो. त्या चराच्या निकट जात होतो. आता आम्हाला ती नरकप्राय धगही जाणवू लागली. अजूनही वीस पावलं चालायचं होतं. मला जर माझा मृत्यू ओढवून घ्यावा, असं वाटत होतं, तर हाच क्षण होता. मी माझे ओठ दातांखाली गच्च आवळून धरले. माझे कडकडणारे दात वडिलांना ऐकू येऊ नयेत, म्हणून. पंधराच पावलं राहिली होती. दहा, आठ, सात, आम्ही सावकाश चालत होतो. जणू स्वत:च्याच प्रेतयात्रेला निघालो होतो.

अखेर तो चर आमच्या अगदी पुढ्यात आला. माझ्यात जी काही उरलीसुरली शक्ती होती, ती मी गोळा केली. माझी रांग मोडून स्वत:ला विजेचा काटेरी तारांवर झोकून देण्यासाठी बळ हवं होतं. अगदी अंतर्हृदयात मी माझ्या वडिलांचा, सगळ्या जगाचा अखेरचा निरोप घेतला. मलाही न जुमानता माझ्या ओठांवर शब्द तयार झाले.

''देवा, तू अगाध आहेस! तुझ्या नावाचा जयजयकार



असो.''

माझं हृदय फुटत होतं. तो क्षण आला होता. मी आणि मृत्यूचा देवदूत अगदी समोरासमोर उभे ठाकले.

पण नाही. त्या खड्ड्यापासून दोनच पावलं उरली असताना आम्हाला डावीकडे वळून बराकींमध्ये जायचा हुकूम सुटाला.

मी माझ्या वडिलांचा हात घट्ट दाबला.

ते म्हणाले,

''तुला गाडीतली मादाम सॅश्तर आठवते?''

कधीच विसरणार नाही, मी ती रात्र! छळछावणीतली ती पहिली रात्र. त्या रात्रीनं माझं सारं आयुष्यच एक प्रदीर्घ रात्र करून टाकलं. दसपट शापित आणि दसपट घुसमटलेलं. तो धूरही मी कधी विसरणार नाही. कोवळ्या मुलांचे ते चेहरे, त्यांची इवलीशी शरीरं विशाल निळ्या आभाळाखाली धुराचा लोट बनून गेली होती.यातलं काहीच मी विसरू शकणार नाही.

माझ्यातली श्रद्धा ज्यांनी भस्मसात करून टाकली, त्या ज्वाळाही मी विसरणार नाही. माझी जगण्याची इच्छाच नष्ट करणाऱ्या त्या भयाण रात्रीची शांतता विसरणं शक्य नाही. ज्य। क्षणांनी माझ्या देवाचा आणि माझ्या आत्म्याचा मुडदा पाडला, माझ्या स्वप्नांची धूळधाण केली, त्या क्षणांना विसरता येणं शक्य तरी आहे का? जगण्याची शिक्षा मला जोवर भोगावी लागते आहे, तोवर ह्या सगळ्या गोष्टी मी विसरणार नाही. मला देवाइतकंच जगायला मिळालं, तरीही नाही.

ज्या बराकींमध्ये आम्हाला पाठवलं, त्या खूप लांब होत्या. उजेड येण्यासाठी छताला निळसर काचा बसवल्या होत्या. नरकाची मागची लहान खोली अशीच दिसत असावी! नरकाची छोटी प्रतिकृती

ती अशीच असायला हवी. कितीतरी पिसाट माणसं, किती लोकांचं अनावर रडणं आणि केवढं तरी पाशवी क्रौर्य!

आमचं स्वागत करणारे डझनावारी कैदी. हातात दंडुके. कारण नसताना कुणावरही निदर्य प्रहार करत त्यांचं हुकूम सोडणं–

''अंगावरचे सगळे कपडे उतरवून नग्न व्हा! तुमचे पट्टे आणि बूट हातात धरा.''

बराकीच्या एका टोकाला आम्हाला आमचे कपडे काढून फेकावे लागले. त्या ठिकाणी कोपऱ्यात आधीच कपड्यांचा एक ढीग होता. नवे कपडे, जुने कपडे, फाटके कोट, चिंध्या. आमच्यासाठी ही खरी समानता होती–नग्नता. सारेच नग्न. थंडीनं कुडकुडणारे.

काही नाझी अधिकारी आमच्या खोलीत शिरले,. प्रकृतीनं ठणठणीत कोण कोण आहे, ते त्यांना बघायचं होतं. त्यांच्या समोरून जाताना ताठ छाती काढून तंदुरुस्त म्हणून जावं का? माझ्या वडिलांना उलट वाटत होतं. त्यांना स्वतःकडे कुणाचंही लक्ष वेधलं जायला नको होतं. मग आमचं नशीब इतरांसारखाचं होईल. ( वडिलांचंच बरोबर होतं, हे नंतर कळलं. त्या दिवशी ज्या लोकांची निवड झाली, त्यातून स्मशानात काम करणाऱ्या कमांडो पथकाची यादी तयार झाली. आम्ही इथं आलो, त्याच्या एक आठवडा आधी पहिल्या गाडीनं आमच्याच गावातल्या एक व्यापारी आला होता. त्यानं आमची मोठ्या शिताफीनं गाठ घेतली. त्यानं सांगितलं, की तोही असाच शक्तिमान म्हणून निवडला गेला– आणि त्याला स्वतःच्या हातांनी वडिलांचं शरीर स्मशानाच्या भट्टीत टाकावं लागलं होतं.)

हुकूम सुटतच होते.

''न्हाव्याच्या समोर जाऊन बसा!''

हातात पट्टा आणि बूट घेऊन कसेतरी पाय ओढत मी



न्हाव्यासमोर जाऊन बसलो. न्हाव्यांनी आमचे सगळे केस कात्री-वस्तऱ्यानं भादरले. केस आमच्या अंगावर पडले.

माझ्या डोक्यात सतत एकच विचाराचा भुंगा चालू होता– वडिलांची आणि माझी ताटातूट होऊ नये.

न्हाव्यांच्या तावडीतून सुटका झाल्यावरही आम्ही बराकीत इतस्ततः भटकायला सुरुवात केली. गर्दीत कुणी कुणी परिचित भेटत होते. त्या भेटीनं आम्हाला कमालीचा आनंद होत होता. होय, विलक्षण आनंद!

''तू अद्याप जिवंत आहेस!''

पण इतर लोक रडत होते. आपली उरलेली शक्ती ते रडण्यात घालवत होते.

आम्ही इथं का आलो? यायलाच नको होतं. त्यापेक्षा घरीच आपापल्या बिछान्यात मरून गेलो असतो, तर चांगलं झालं असतं.

हुंदके देऊन, आक्रोश करून त्यांचा आवाज बसून गेला होता.

अचानक कोणीतरी माझ्या गळ्याभोवती हात टाकून मिठी मारली, तो सिघेटच्या धर्मगुरुंचा भाऊ येशील होता. तो हमसून हमसून रडत होता. मला वाटलं, आपण अजूनही जिवंत आहोत, म्हणून तो आनंदानं रडत असावा.

मी त्याला म्हटलं,

''रडू नकोस, येशील, तुझे अश्रू वाया घालवू नकोस.''

''रडू नको? आपण सगळे मृत्यूच्या दारात उभे आहोत. तुला कळतं, की नाही?''

मी छताकडे पाहिलं. निळसर काचांच्या तुकड्यांमधून मला दिसलं,

रात्रीचा गडद अंधार फिकट होत चालला होता.

मला भीती वाटायचं थांबलं होतं.

आणि नंतर माझ्यावर अमानुष थकवा पसरला. त्या भयानक थकव्यानं माझा ताबा घेतला.

जे तिथं दिसत नव्हते, त्यांचं आम्हाला दुरूनही स्मरण झालं नाही. तरीही आम्ही त्यांच्याबद्दल बोललो.

''त्यांचं काय झालं असेल, कुणास ठाऊक.''

- पण त्यांच्या नशिबाशी आम्हाला काहीही देणं-घेणं नव्हतं. दुसऱ्या कशाचाही, कोणाचाही विचार करण्याचं त्राण आमच्यात नव्हतं. आमच्या संवेदना बोथट झाल्या होत्या. धुक्यात सगळं धूसर दिसावं, तसं झालं होतं. काहीही आकलन होणं यापुढं शक्य नव्हतं. स्वाभिमानाची, स्वतःच्या सरंक्षणाची, आत्मरक्षणाची प्रेरणा-सगळं आम्हाला सोडून गेलं होतं. एका स्वच्छ बोधाच्या क्षणी मला अशी प्रचिती आली, की आम्ही अर्ध्या जगात भटकणारे तिरस्करणीय आत्मे आहोत. आम्हाला अवकाशात भटकण्याची शिक्षा मिळाली होती. माणसांच्या पिढ्यांचा अंत होईपर्यंत आम्हाला असंच भटकावं लागणार होतं. मुक्ती मिळण्याची कोणतीही आशा नव्हती; पण मुक्तीच्या शोधात हे आत्मे असेच भटकत राहणार होते.

पहाटेचे पाच वाजले. आम्हाला बराकींच्या बाहेर काढण्यात आलं. नाझी पोलिसांनी आम्हाला पुन्हा एकदा बदडून काढलं. पण त्या दणक्यांमुळं आता मला कोणत्याही वेदना होत नव्हत्या. वेदना बंद झाली होती. बर्फासारखे गार बोचरे वारे आमच्या आजूबाजूला घोंघावत होते. आम्ही अजूनही विवस्त्रच होतो. बधिर.

आज्ञा झाली.

''धावा!''



- आणि आम्ही धावू लागलो. थोडं धावल्यावर नवीन बराकी लागल्या.

प्रवेशाजवळच पेट्रोलचा पिंप होता. निर्जंतुक करण्यासाठी प्रत्येकाला त्यात भिजवून काढलं. नंतर गरम पाण्याच्या शॉवरखाली आंघोळ, खूप वेगानं अंगावर आदळणारं पाणी.

आंघोळ झाल्यावर आम्हाला बाहेर नेण्यात आलं. पुन्हा पळणं. मग नवी बराक. ती सामान ठेवण्यासाठीच होती. लांब लांब आणि कैद्यांच्या कपड्यांचे ढीग. आम्ही पळतच होतो. पळता पळता अंगावर विजारी, जाकिटं, शर्टस् आणि मोजे फेकले जात होते.

काही क्षणानंतर आम्ही माणसं उरलो नाही. ज्या परिस्थितीत आम्ही सापडलो होतो,ती परिस्थिती शोकात्म होती म्हणून, नाहीतर एरवी आमची ध्यानं बघून आम्ही पोटं दुखेपर्यंत हसलो असतो, काय ते आडमाप कपडे! एक माणूस चांगलाच आडदांड होता. त्याला लहान मुलांची पॅन्ट मिळाली होती आणि दुसरा एक किरकोळ लहानखुरा माणूस होता, त्याला असलं जाकीट मिळालं होतं,की त्यात तो पूर्णचं झाकला जात होता. अर्थात आम्ही लगेच त्यातल्या त्यात मापाचे मिळतील, अशा तऱ्हेनं आपापसात कपड्यांची अदलाबदल केली.

मी माझ्या वडिलांकडे पाहिलं. ते किती बदलून गेले होते! त्यांचे डोळे निस्तेज झाले होते. मला त्यांच्याशी बोलावंसं वाटत होतं. पण काय बोलावं, तेच कळत नव्हतं.

रात्र संपली होती. पहाटेचा तारा आकाशात चमकत होता. मीही पूर्णपणे वेगळीच व्यक्ती झालो होतो. तालमुडचा अभ्यास करणारा एक विद्यार्थी, लहानसा मुलगा ज्वालांनी केव्हाच गिळून टाकला होता. फक्त एक शरीर होतं. माझ्यासारखा दिसणारा एक आकार शिल्लक

उरला होता. धूर ओकणाऱ्या काळ्याभोर ज्वाळेनं माझ्या आत्म्यात प्रवेश केला होता आणि तिनं अधाशीपणानं त्यालाही गिळंकृत करून टाकलं होतं.

काही तासांमध्येच इतकं काही घडलं होतं, की मला काळाचं काहीही भान उरलं नाही.

आम्ही आमचं घर केव्हा सोडलं होतं? आणि घेटो? आणि गाडी? फक्त एकच आठवडा झाला होता? एक रात्र फक्त एकच रात्र?

किती वेळापासून आम्ही असे बर्फाळ गार वाऱ्यात उभे होतो? एक तास? फक्त साठ मिनिटं?

नक्कीच ते स्वप्न असलं पाहिजे.

थोड्याच अंतरावर काही कैदी काम करत हेते. काही खड्डे खणत होते. इतर वाळू वाहून नेत होते. त्यांच्यापैकी कुणीही आमच्याकडे पाहिलं नाही. भर वाळवंटात आम्ही कितीतरी वाळलेली झाडं होतो! माझ्या मागे काही लोक बोलत होते. ते लोक काय बोलताहेत, ते जाणून घ्यायची जराही इच्छा माझ्यात उरली नव्हती. आसपास कुणी पहारेकरी नव्हता, तरी लोक कुजबुजत होते. मोठ्यानं बोलायची कोणाची हिंमत नव्हती. कदाचित आजूबाजूच्या दाट विषारी धुरांमुळं यांचे घसे बसले असावेत.

पाचांची रांग करून आम्हाला नव्या बराकींमध्ये जायला सांगितलं. तो 'जिप्सी कॅम्प'होता.

''आहात, तिथंच उभे राहा!'' आज्ञा झाली.

त्या बराकीला फरशीच नव्हती. फक्त चार भिंती आणि छप्पर. आमचे पाय चिखलात बुडाले होते.

प्रतीक्षेचा आणखी एक कालखंड सुरू झाला. उभ्या उभ्याच मी झोपी गेलो. मला स्वप्न पडलं, की मी एका बिछान्यावर आहे, माझी



आई मला प्रेमानं कुरवाळते आहे. आणि मी जागा झालो. चिखलात पाय रुतलेले. काही लोक खाली कोसळले आणि होते त्याच जागी आडवे पडून राहिले. काही त्यांच्यावर ओरडले,

''तुम्हाला वेड लागलं आहे का? आपल्याला उभं राहायचा हुकूम होता. आपल्या सर्वांसाठी आणखी त्रास ओढवून घ्यायचा आहे का?''

जगातला होता नव्हता तेवढा त्रास जर आधीच आमच्या डोक्यावर येऊन आदळला होता! आणखी काय शिल्लक उरलं होतं? हळूहळू आम्ही सगळेच खाली चिखलात बसलो. पण आम्हाला वरचेवर उडी मारून उठावं लागत होतं. कारण कापो पुन्हा पुन्हा येऊन आमच्यापैकी कुणाजवळ नवे बूट आहेत का, ते बघत होता, असतील, तर ते त्याला देऊन टाकावे लागणार होते. त्याला विरोध करण्यात अर्थच नव्हता. डोक्यात दंडुक्याचे प्रहार करून त्यानं घेतलेच असते.

माझ्याजवळ नवे बूट होते. पण ते चिखलानं इतके बरबटले होते, की कुणाच्या लक्षातच आले नाहीत. मी देवाचे आभार मानले. प्रार्थना सुधारून म्हटली.

''या अमर्याद आणि अद्‌भूत विश्वात चिखल निर्माण केल्याबद्दल, देवा, मी तुझे आभार मानतो!''

एकाएकी भयप्रद शांतता पसरली. नाझी पोलीस अधिकारी आत आला होता. त्याच्याबरोबर मृत्यूच्या दूताचा दर्पही आला. आम्ही त्याच्या जाड ओठांकडे टक लावून बघत होता. बराकीच्या मध्यभागी येऊन आमची खरडपट्टी काढणारं भाषण सुरू केलं–

''तुम्ही ऑशवित्झच्या तुरुंगात आहात.''

तो थांबला. आपल्या शब्दांचा आमच्यावर काय परिणाम झाला, ते त्याला आजमवायचं होतं. त्याचा चेहरा माझ्या स्मरणात

त्यावेळी इतका पक्का ठसला, की तो आजही मला आठवतो. तो तिशीचा उंच माणूस होता. त्याच्या भुवयांमध्ये आणि डोळ्यांच्या बाहुल्यांमध्ये क्रौर्य खोदून भरलं होतं. आम्ही म्हणजे जणू आपापल्या आयुष्यांना लोंबकळणाऱ्या महारोगी कुत्र्यांचा समुदाय होतो, अशा तऱ्हेने तो आमच्याकडे बघत होता.

तो पुढं बोलायला लागला,

''एक गोष्ट नीट, कायमची लक्षात ठेवा. मनात पक्की खोदून ठेवा. तुम्ही ऑशवित्झमध्ये आहात.. .आणि ऑशवित्झ म्हणजे दुखण्यातून उठलेल्या माणसांना विश्रांती घेण्याचं घर नाही. हा राजकीय कैद्यांचा तुरुंग आहे. इथं तुम्हाला काम करावंच लागेल. काम केलं नाही, तर तुमची रवानगी सरळ पेटलेल्या भट्टीत किंवा थडग्यात. काम, की मरण–निवड तुम्ही करायची.''

त्या रात्री आम्ही इतकं भोगलं होतं, की आम्हाला काहीच भिववू शकत नव्हतं. पण त्याचे कापल्यासारखे शब्द ऐकून मात्र आम्ही खरंच घाबरलो. थरथर कापायला लागलो. इथं 'भट्टी' हा काही पोकळ अर्थाचा शब्द नव्हता. तो शब्द आम्ही इथं यायच्या आतच आम्हाला भेटला होता. त्याचा अर्थ धुरात मिसळून सतत हवेवर तरंगतच होता. किंबहुना खरा अर्थ असणारा तो एकमेव शब्द तिथं होता.

नाझी पोलीस अधिकारी निघून गेला.

कापो आला. तो किंचाळला–

''सगळे कुशल कामगार घड्याळ, कुलपं दुरुस्त करणारे, इलेक्ट्रिशियन्स पुढं या.''

असे लोक पुढं झाले. बाकीच्या आम्हाला दुसऱ्या एका बराकीत पाठवण्यात आलं. ती दगडांची बांधलेली होती. आम्हाला बसायची परवानगी मिळाली होती. आमचा ताबा एका जिप्सीकडे



दिला होता.

माझ्या वडिलांच्या पोटात एकाएकी तीव्र वेदना सुरू झाल्या. ते उठले. त्या जिप्सीच्या जवळ गेले. विनम्रपणे त्यांनी जर्मन भाषेत विचारलं,

''माफ करा. शौचालय कुठं आहे, सांगाल का?''

त्या जिप्सीनं माझ्या वडिलांकडे वरपासून खालपर्यंत सावकाशपणे पाहिलं. आपल्याशी बोलणारा माणूस हाडा–मासांचा बनलेला, शरीर आणि पोट असलेला जिवंत प्राणी आहे, याची त्याला जणू खात्री करून घ्यायची होती. नंतर अचानक गाढ झोपेतून जागा झाल्याप्रमाणे तो उठला आणि त्यानं माझ्या वडिलांना इतक्या जोरात ठोकारलं, की वडील फरशीवर भेलकांडत स्वत:च्या जागेवर येऊन पडले.

मी जागचा हललो नाही.

मला काय झालं होतं? माझ्या वडिलांना त्यानं माझ्या डोळ्यांदेखत तुडवलं होतं आणि माझ्या डोळ्यांची पापणीही हलली नव्हती. मी बघत होतो, पण काहीच बोललो नाही. काल मी गुन्हेगाराची चामडी लोळवली असती, आज मी इतका थंड झालो? इतक्या लवकर बदललो मी?

माझी विचारशक्ती मला बोचू लागली.

मी या लोकांना कधीही माफ करणार नाही.

माझ्या वडिलांना माझ्या भावनांचा अंदाज आला असावा. ते माझ्या कानात कुजबुजले,

''मला काही लागलं नाही.''

त्यांच्या गालावर त्या जिप्सीच्या बोटांचे वळ उठलेले मला दिसले.

''सगळ्यांनी बाहेर व्हा!''

त्या एका जिप्सीच्या जोडीला दहा जिप्सी आणखी आले होते.चाबकाचे आणि दंडुक्याचे फटकारे माझ्या शरीरावर फुटत होते. त्या तडाख्यांनी न कळवळता माझे पाय पळण्याचं काम चोख बजावत होते. मी इतरांच्या मागे लपून मार चुकवायचा प्रयत्न करत होतो. वसंत ऋतूतला सूर्य-प्रकाश सर्वत्र पसरला होता.

आम्ही पाचांच्या रांगेनं आगेकूच करत होतो. दारं उघडली आणि बंद केली जात होती. विजेच्या तारांमधून आम्ही पुढं पळत होतो. प्रत्येक पावलावर धोक्याची अक्षरं लिहिलेला पांढरा फलक होता. त्यावरची कवटी आमच्या चेहऱ्यांकडे टक लावून बघत होती. खाली लिहिलं होतं,

''सावधान..मृत्यू धोका!''

केवढा उपहास! इथं एक तरी जागा अशी होती का, की जिथं मृत्यूचा धोका नव्हता?

दुसऱ्या बराकींपाशी आम्ही पोहोचल्यावर जिप्सी थांबले. मग आमचा ताबा नाझी पोलीस अधिकाऱ्यांनी घेतला, आम्हाला त्यांनी वेढलं. त्यांच्याजवळ रिव्हॉल्व्हर्स, मशीनगन्स आणि पोलिसी कुत्री होती.

पुन्हा आमची परेड चालू झाली. अर्धा तास आम्ही चालत होतो. मी माझ्या आजूबाजूला बघितलं, तेव्हा माझ्या लक्षात आलं की, विजेच्या तारा मागे पडल्या होत्या. याचा अर्थ आम्ही तुरुंग सोडून बरेच दूर आलो होतो.

एप्रिल महिन्यातला सुंदर दिवस होता तो. वसंत ऋतूचा सुगंध हवेत भरला होता. सूर्य पश्चिमेकडे मावळत होता.

पण आम्ही आणखी थोडं पुढं गेलो, तेव्हा आम्हाला दुसऱ्या एका तुरुंगाच्या काटेरी विजेच्या तारांचे कुंपण दिसलं. भलं मोठं लोखंडी



दार. त्यावर शब्द कोरलेले.

''श्रम हेच स्वातंत्र्य आहे!''

ऑशवित्झ.

प्रथमदर्शनी माझं या तुरुंगाबद्दल बरं मत झालं.

हा तुरुंग बर्कनौपेक्षा चांगला होता. इथं लाकडी बराकी नव्हत्या, तर दुमजली क्रॉंकीटच्या इमारती होत्या. ठिकठिकाणी लहान लहान बागा होत्या. एका इमारतीकडे आम्हाला नेण्यात आलं. तुरुंगाच्या कोठड्या. इमारतीच्या प्रवेशद्वारापाशी बसून आम्ही तिष्ठत वाट बघण्याचं काम सुरू केलं. थोड्या थोड्या वेळानं एकेकाला आत सोडलं जायचं.या तुरुंगाबाबतीत एक गोष्ट समान होती. कुठही प्रवेश करताना शॉवरखाली आंघोळ करावीच लागे. दिवसांतून दहा वेळा जरी तुम्ही फक्त एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात गेलात, तरी आंघोळ प्रत्येक वेळी आवश्यकच.

गरम पाण्याखालून बाहेर येऊन आम्ही रात्रीच्या हवेत कुडकुडत उभे राहिलो. आमचे सगळे कपडे आधीच्या इमारतीत काढून घेतले होते आणि दुसरे कपडे मिळतील, असं आम्हाला आश्वासन दिलं होतं.

मध्यरात्री आम्हाला पळायला सांगितलं.

''जोरात धावा!''आमचे पहारेकरी ओरडत होते, ''जितक्या वेगात पळाल, तितक्या लवकर तुम्हाला झोपायला मिळेल.''

काही मिनिटांच्या या मूर्ख शर्यतीनंतर आम्ही पुन्हा एका वेगळ्याच इमारतीपाशी आलो. तुरुंगाचा प्रमुख आमची वाट बघत होता. तो एक तरुण पोलीस होता आणि आमच्याकडे बघून हसत होता. त्यानं बोलायला सुरुवात केली. आम्ही कमालीचे थकलो असूनही शांतपणे त्याचं बोलणं ऐकायला लागलो.

''बंधूंनो! तुम्ही ऑशवित्झच्या राजकीय तुरुंगात आहात. यापुढं तुम्हाला बराच काळ खूप कष्ट सोसायचे आहेत. पण धीर सोडू नका. सर्वात भयंकर धोक्यातून तुम्ही आधीच सुटला आहात. तेव्हा आता तुमची शक्ती वाढवा. नाउमेद होऊ नका. आपण सगळे मुक्तीचा, स्वातंत्र्याचा दिवस बघणार आहोत. जीवनावर श्रद्धा ठेवा. श्रद्धा महत्त्वाची. नैराश्य झटकून टाका. त्यामुळं तुम्ही मृत्यूला तुमच्यापासून दूर ठेवू शकाल. नरकवास काही शाश्वत नसतो. शेवटी तुम्हाला एक विनंती करायची आहे. एक सल्ला. आपापसात बंधुभाव असू द्या. आपण सगळे भाऊ भाऊ आहोत आणि नशिबाचे सारखेच भोग भोगत आहोत. आपल्या सर्वांच्या डोक्यावर एकाच संकटाची सावली आहे. म्हणून एकमेकांना मदत करा. जिवंत राहण्याचा हा एकच मार्ग आहे. बरंच बोललो मी. तुम्ही सगळे थकला आहात. लक्षात ठेवा, तुम्ही सतरा नंबरच्या इमारतीत आहात. इथं शिस्त राखण्याची जबाबदारी माझी आहे. कोणाची कोणाही विरुद्ध काही तक्रार असेल, तर त्यानं माझ्याकडं यावं, ठीक आहे. आता तुम्ही झोपायला जा. एका फळीवर दोन माणसं, गुड नाईट.''

प्रथमच ऐकलेलं माणसासारखं बोलणं.

आम्ही आपापल्या बर्थवर चढलो. तिथं शिरताक्षणीच आम्हाला गाढ, अगदी गाढ झोप लागली.

दुसऱ्या सकाळी. 'अनुभवी'कैद्यांनी आम्हाला मुळीच क्रूरतेनं वागवलं नाही. आम्ही आंघोळीच्या जागी गेलो. आम्हाला नवीन कपडे मिळाले. ब्लॅक कॉफी मिळाली.

आमच्या सतरा नंबरच्या इमारतीतून आम्हाला दहा वाजता बाहेर काढण्यात आलं. इमारत स्वच्छ करायची होती. बाहेर सूर्याच्या उबेत बरं वाटत होतं. आमच्यात बराच धीर आला होता. जे लोक



दिसेनासे झाले होते, त्यांच्याबद्दल सोडून आम्ही इतर सर्व बोललो. एकूण बोलण्यातून सर्वांचं असं मत दिसलं, की लवकरच युद्ध संपणार आहे.

दुपारी आम्हाला सूप मिळालं. प्रत्येकाला वाडगं भरून दाट सूप. माझ्या पोटात भुकेचा डोंब उसळला होता. तरीही त्या वाडग्याला मी हातही लावला नही. तसा मी अजूनही लाडावलेला मुलगाच होतो. घरचं चविष्ट अन्न खायची सवय. हे कसं घशाखाली उतरणार? शेवटी वडिलांनीच माझ्या वाट्याचं सूप पिऊन टाकलं.

इमारतीच्या सावलीत आम्ही दुपारची थोडी डुलकी काढली. त्यावेळी असं वाटलं, त्या चिखलानं भरलेल्या बराकीत जर्मन पोलीस अधिकारी जे गुरकावून बोलला, ते खोटंच असलं पाहिजे. ऑशवित्झचा हा तुरुंग हा विश्रामगृहच वाटत होता!

दुपारनंतर आम्हाला रांगा तयार करायला सांगितलं. तीन कैद्यांनी एक टेबल आणि काही वैद्यकीय उपकरणं आणली. आमच्यापैकी प्रत्येक जण डाव्या दंडावरची बाही वर करून टेबलासमोर जाऊ लागला. तीन 'अनुभवी'कैद्यांच्या हातात सुया होत्या. त्यांनी आमच्या दंडावर नंबर गोंदला. मी A 7713 झालो! त्यानंतर मला दुसरं कुठलंही नाव नव्हतं.

संध्याकाळच्या वेळी आमची हजेरी घेतली होती. कामावर गेलेले कैदी परत आले. दारापाशी बॅन्ड लष्करी धून वाजवत होता. दहा हजार कैदी रांगेत उभे राहिले. जर्मन पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांचे नंबर तपासले.

या हजेरीनंतर सगळ्या इमारतीमध्ये कैदी इकडे-तिकडे पांगले. शेवटच्या तुकडीबरोबर आपले कुणी मित्र, नातलग, परिचित आलेत का, ते त्यांना बघायचं होतं.

दिवस जात होते. सकाळी ब्लॅक कॉफी, दुपारी सूप(दोन दिवस उपाशी राहिल्यावर तिसऱ्या दिवसापासून मी वाटेल त्या चवीचं सूप अधाशासारखं प्यायला लागलो.)संध्याकाळी सहा वाजता हजेरी. नंतर पाव आणि त्याच्याबरोबर काहीतरी. नऊ वाजता बिछान्यावर.

ऑशवित्झला येऊन आठ दिवस होऊन गेले होते. नेहमीप्रमाणे हजेरीसाठी आम्ही उभे होतो. बस्स, नेहमीप्रमाणे हजेरी संपल्याची घंटा व्हायचीच आम्ही वाट बघत होतो.

आणखी वेगळं काय घडणार होतं?

पण त्या दिवशी घडलं. अचानक आमच्या रांगांमधून कुणीतरी जोरजोरात विचारत गेलं.

''तुमच्यापैकी सिघेटमध्ये राहणारे वायझल नावाचे गृहस्थ कोण आहेत?''

विचारणारा माणूस ठेंगणा होता. त्यानं चश्मा घातला होता, त्याचा चेहरा शुष्क आणि सुरकुतलेला होता. वडिलांनी त्याला उत्तर दिलं,

''मीच आहे सिघेटचा वायझल.''

त्या माणसानं बराच वेळ माझ्या वडिलांकडे टक लावून पाहिलं. डोळे बारीक करून तो बघत होता. मग म्हणाला,

''तुम्ही मला ओळखलं नाही? मी तुमचा नातलग... स्टाइन. तुम्ही मला विसरलात? मी स्टाइन!अॅन्टवर्पचा. रीझेलचा नवरा. तुमची बायको म्हणजे रीझेलची काकू. ती आम्हाला नेहमी पत्र लिहायची. केवढाली पत्रे!''

माझ्या वडिलांनी त्याला ओळखलं नव्हतं. वडील त्याला ओळखत असण्याची शक्यता कमीच होती. कारण ते ज्यू जमातीच्या कामात इतके आकंठ बुडून गेले होते! कौटुंबिक गोष्टींची त्यांना काही



माहितीच नसायची. घरात असले, तरी ते स्वतःच्या विचारांमध्ये हरवलेलेच असायचे. त्यांचं चित्त दुसरीकडे असायचं. (एकदा आमच्या सिघेटच्या घरी माझी चुलत बहीण आम्हाला भेटायला आली. ती पंधरा दिवस आमच्यात राहिली, आमच्या बरोबरीनं जेवली, पण वडिलांचं तिच्याकडे लक्ष नव्हतं. पंधराव्या दिवशी त्यांचं पहिल्यांदा लक्ष गेलं.)

त्यांनी स्टाइनला ओळखलंच नव्हतं. मी मात्र ताबडतोब ओळखलं. मला त्याची पत्नी रीझेलही चांगलीच आठवत होती.

त्यानं सांगितलं,

''मला १९४२ मध्येच हद्दपार करण्यात आलं. तुमच्या भागातल्या लोकांना घेऊन गाडी आली आहे, असं कळताच मी तुम्हाला शोधायला आलो. मला वाटलं, कदाचित तुम्हाला माझ्या लहान मुलांची, माझ्या पत्नीची माहिती असेल. मी निघून गेल्यावर दोघं अॅन्टपर्वमध्येच होते. त्यांचं काय झालं असेल..''

मला त्याच्या मुलांची व पत्नीची काहीही बातमी नव्हती. १९४० पासून माझ्या आईला रीझेलकडून एकही पत्र आलं नव्हतं. पण मी खोटंच सांगितलं,

''होय, माझ्या आईला पत्रातून तुमच्या कुटुंबाची खुशाली कळली होती. रीझेल आणि तुमची मुलं मजेत आहेत.''

तो आनंदानं रडला. आमच्याजवळ उभं राहून आणखी बोलणं त्याला आवडलं असतं. आपल्या प्रियजनांबद्दल आणखी तपशीलवार जाणून घ्यायलाही त्याला आवडलं असतं. पण जर्मन पोलीस ऑफीसर येताना दिसला आणि त्याला जावंच लागलं. जाता जाता तो म्हणाला,

''उद्या पुन्हा भेटेन.''

घंटा वाजली. आम्हाला पांगण्याचा इशारा मिळाला. आम्ही आमचं संध्याकाळचं जेवण ब्रेड आणि मार्गारिन घ्यायला गेलो. मला सपाटून भूक लागली होती. क्षणात मी माझ्या वाट्याच्या अन्नाचा फडशा पाडला.

माझे वडील म्हणाले,

''असं एकदम सगळं काय खाऊन टाकलंस? उद्याचा दिवस वेगळा असेल. उद्या काही नाही मिळालं, तर? थोडं वाचवून ठेवायला हवं.''

माझ्या हाती काहीच शिल्लक नाही, असं पाहून त्यांनी त्यांच्या वाटणीचं अन्न तसंच ठेवून दिलं. म्हणाले,

''मला भूक नाही.''

आम्ही ऑशवित्झमध्ये तीन आठवडे होतो. आम्हाला काहीच काम नव्हतं. आम्ही दुपारी व रात्री भरपूर झोप काढत असू. इथून आम्हाला आणखी कुठं हलवलं जाऊ नये, जास्तीत जास्त काळ इथंच रहायला मिळावं, हीच आम्हा सर्वांची इच्छा होती. ते तसं काही विशेष कठीण नव्हतं. आपण कुशल कामगार आहोत, हे कधी दाखवलं नाही, म्हणजे झालं. नुसतेच श्रम करणाऱ्या कामकऱ्याला शेवटपर्यंत तिथंच ठेवून घेतलं होतं.

तिसरा आठवडा सुरू झाला, तेव्हा आमच्या इमारतीतल्या कैद्यांवर देखरेख ठेवणाऱ्या अधिकाऱ्याचं ते काम काढून घेण्यात आलं. तो फारच माणुसकीनं वागणारा होता, म्हणून!

दुसरा अधिकारी आला. तो खरा रानटी आणि क्रूर होता. त्याचे सहकारी म्हणजे राक्षस होते. तो आला आणि आमचे चांगले दिवस संपले. मग आम्हाला असं वाटायला लागलं, आम्हाला इथून कुठंतरी हलवलं, तर बरं होईल.



ॲन्टवर्पचा आमचा तो नातलग स्टाइन मधून मधून आम्हाला येऊन भेटत होता. वेळोवेळी तो जास्तीचं अन्न, पाव घेऊन यायचा.

''घे, एलीझर, हे तुझ्यासाठी.''

दरवेळी तो यायचा, तेव्हा त्याच्या डोळ्यांतून अश्रू ओळघत असायचे. गालांवर वाळून सुकलेले असायचे. तो माझ्या वडिलांना नेहमी म्हणायचा.

''तुमच्या मुलाची काळजी घ्या. तो फार अशक्त झाला आहे. वाळलाही आहे. अशा दुबळ्या माणसांना मरायला भट्टीत पाठवतात, माहीत आहे ना? भरपूर खा.जेव्हा मिळेल, तेव्हा, जे मिळेल, ते, शक्य असेल, तितकं खा. अशक्त लोक फार काळ इथं राहतच नाहीत.''

तो स्वत:च इतका दुर्बल, अशक्त व बारीक झाला होता!

तो म्हणायचा,

''माझी मुलं आणि रीझेल अद्यापही जिवंत आहेत. या एकाच विचारानं मीही जीव धरून आहे. त्यांच्यासाठीच मी कसाबसा जगतो आहे.''

एक दिवस तो धावतच आमच्याकडे आला. त्याचा चेहरा आनंदानं फुलला होता.

''ॲन्टवर्पहून नुकतीच एक गाडी आली आहे माणसं भरून. मला नक्कीच उद्या माझी मुलं आणि पत्नी दिसेल... निदान त्यांच्याबद्दल काही बातमी तरी कळेल.''

तो धावतच निघून गेला.

आम्हाला तो पुन्हा कधीच दिसला नाही. त्याला बातमी कळली होती. खरी बातमी.

रात्री आपापल्या बिछान्यात पडल्यावर आम्ही जुनी भक्तिपर गाणी म्हणण्याचा प्रयत्न करत असू. अकिबा त्याच्या शांत, गोड

आवाजानं आमची हृदय हेलावून सोडत असे. अकिबा ड्रम वाजवत असे.

काही जण देवाविषयी आणि त्याच्या गूढ मार्गाविषयी बोलत. ज्यू लोकांची पापं आणि त्यांच्या भविष्यातल्या मोक्ष-मुक्तीविषयी बोलत. मी प्रार्थना करणं सोडूनच दिलं होतं. मी देवाचं अस्तित्व नाकारत नव्हतो, पण त्याच्या निर्विवाद न्यायाबद्दल माझ्या मनात संशय निर्माण झाला होता.

अकिबा म्हणाला,

''देव आपली परीक्षा पाहतो आहे. आपल्यातल्या आदिम प्रेरणांवर ताबा मिळवून आपण आपल्यातल्या सैतानाला मारू शकतो, की नाही, ते देवाला जाणून घ्यायचं आहे. निराश व्हायचा आपल्याला काहीच अधिकार नाही. देव जर आपल्याला कठोर शिक्षा देत असेल, तर याचाच अर्थ त्याचं आपल्यावर सर्वात जास्त प्रेम आहे.''

त्या बोलण्यानं भोळ्या ज्यूंना धीर यायचा. हर्श गेनुदला कबालाचं चांगलंच ज्ञान होतं. तो जगाच्या अंताबद्दल बोलायचा, मसीहाबद्दल बोलायचा.

अशा तऱ्हेचं संभाषण चालू असलं, की माझ्या मनात विचार डोकवायचा,

''या क्षणी माझी आई कुठं असेल? आणि झिपोरा?''

एकदा माझे वडील म्हणाले,

''ती अद्याप तरुण स्त्री आहे. तिला बहुतेक श्रम-छावणीतच ठेवलं असावं. झिपोराही आता काही अगदी लहान नाही. काम करू शकते. तीही तिथंच असेल, होय, की नाही?''

आम्हाला असले तर्क करायला आवडायचं. आमचा त्यावर



विश्वासही बसायचा. असले विश्वास, ते खरे मानण्याचं ढोंग करणं हाच तर आमचा आधार होता.

सगळ्या कुशल कामगारांची रवानगी आधीच दुसऱ्या छावणीत झाली होती. आम्ही शंभर एक अकुशल सामान्य मजूर तेवढे तिथं उरलो होतो.

एक दिवस आमच्या गटाचा सेक्रेटरी म्हणाला,

''तुम्ही सारे पुढच्या गाडीनं जाणार आहात.''

दहा वाजता आम्हाला नेहमीचं पावाचं जेवण मिळालं. आमच्या भोवताली दहा जर्मन पोलीस अधिकाऱ्यांचं कडं होतं. दारावर अक्षरं खोदली होती. 'काम हेच स्वातंत्र्य'आमची मोजणी झाली; आणि आम्ही रस्त्यावर आलो. आभाळात तुरळक पांढरे ढग होते. सूर्य प्रखरपणे तळपत होता.

आम्ही हळूहळू चालत होतो. रक्षकही फारसे घाईत नव्हते. आम्हाला याचा आनंद वाटत होता. वाटेत खेडी लागत होती. खेड्यांमधून आमच्या रांगा जायच्या. लोक आमच्याकडे टक लावून बघायचे. त्यांच्या दृष्टीने आश्चर्य नसायचं. त्यांनी कदाचित अशा रांगा याआधीच बरेचदा बघितल्या असाव्यात.

रस्त्यात आम्हाला काही तरुण जर्मन मुली भेटल्या. रक्षक त्यांची चेष्टामस्करी करायला लागले. मुलींना बरं वाटलं. त्या खिदळून हसल्या.. .त्यांनी रक्षकांना चुंबनं घेऊ दिली. गुदगुल्या करू दिल्या आणि त्या आणखीनच जोरात हसायला लागल्या. रक्षकही सगळे हसत होते. आपापसात विनोद करत होते. मुली दिसल्या, की ओरडून अनुनय करत होते.

आमचा बराच मार्ग असाच संपला. तेवढ्या काळापुरता तरी आम्हाला रक्षकांच्या शिव्या किंवा बंदुकीच्या दस्त्याचा मार खावा

लागला नाही.

चार तासांच्या आमच्या पायपिटीनंतर आम्ही आमच्या नव्या तुरुंगापाशी पोहोचलो.

बुना.

आम्ही आत शिरलो आणि आमच्या मागे लोखंडी दार बंद झालं.

■ ■ ■



# चार

तुरुंग अगदीच रिकामा, उजाड आणि मृतप्राय दिसत होता. एखाद्या जीवघेण्या रोगाची मोठी साथ येऊन गेल्यासारखा. चांगले कपडे घातलेले कैदी बराकींच्या मधून हिंडत होते.

शिरस्त्याप्रमाणे आधी आम्हाला आंघोळ करावी लागली. या तुरुंगाचा प्रमुख त्याचवेळी आला.

जाड ओठ, बैलासारखी भरदार मान, दाट कुरळे केस. तो चेहऱ्यावरून तरी प्रेमळ वाटत होता. त्याच्या फिक्या निळसर डोळ्यात वरचेवर हसू डोकावत होतं. आमच्या गटात काही दहा आणि बारा वर्षांची मुलं होती. त्या अधिकाऱ्यानं मुलांसाठी खाद्यपदार्थ आणण्याचा हुकूम दिला.

आम्हाला नवे कपडे मिळाले. दोन तंबूंमध्ये आमची तात्पुरती व्यवस्था झाली. मजुरांच्या तुकडीत आमची नावं समाविष्ट होईपर्यंत आम्हाला तंबूतच थांबायचं होतं, नंतर आम्हाला बराकीत जायला मिळणार होतं.

मजुरांच्या तुकड्या संध्याकाळी कामावरून परतल्या. त्यांची हजेरी झाली. आम्ही त्यांच्यात काही ओळखीचे चेहरे दिसतात का, ते बघायला लागलो. आम्हाला कितीतरी प्रश्न विचारायचे होते त्यांना,

माहिती हवी होती. कारण ते अनुभवी होते. त्यातल्या त्यात कोणत्या कामावर मजुरी करणं चांगलं, कोणत्या इमारतीत राहिलं, म्हणजे कमी त्रास होईल? अर्थात सगळ्या कैद्यांनी कबूल केलं, की बुनाचा हा तुरुंग चांगला होता. सुसह्य होता. कैद्यांनी असंही सांगितलं, की बांधकामाच्या मजुरीवर जाऊ नका.

जणू काही कामाची निवड आमच्याच हाती होती!

आमच्या तंबूचा प्रमुख जर्मन होता. त्याचा चेहरा मारेकऱ्यासारखा. मांसल ओठ, लांडग्याच्या पंज्यासारखे हात. तो इतका गलेलठ्ठ होता, की त्याला लवकर हलताच येत नसे. त्यालाही लहान मुलं आवडत. आम्ही तंबूत गेल्याबरोबर त्यानं मुलांसाठी ब्रेड, सूप आणि मार्गारिन मागवलं. (नंतर कळलं, की त्याचं प्रेम अगदी निरपेक्ष नव्हतं. त्याच्यासारख्या समलिंगी संभोग करणाऱ्यांना या लहान मुलांचा भरपूर पुरवठा होत असे.)

तंबूचा मुख्य कापो आम्हाला म्हणाला,

''रोगसंसर्ग प्रतिबंधक उपाय म्हणून तुम्हाला तीन दिवस या तंबूत राहावं लागणार आहे. क्वारंटाईन. तुमच्यापैकी कोणाला साथीचा रोग नाही, याची खात्री पटल्यावरच कामावर पाठवलं जाईल. उद्या तुमची वैद्यकीय तपासणी होईल.''

त्याच्या सहकाऱ्यांपैकी एक कठोर चेहऱ्याचा आणि मवाल्यासारखे डोळे असलेला होता. तो माझ्याजवळ आला. त्यानं विचारलं,

''तुला चांगल्या विभागात काम मिळावं, असं वाटत नाही का?''

''हो निश्चित वाटतं. पण माझी एकच अट आहे. मला माझ्या वडिलांबरोबरच राहायचं आहे.''



''ठीक आहे. मी ती व्यवस्था करतो. पण एका वस्तूच्या मोबदल्यात...तुझे बूट मला दे. मी तुला दुसरे देईन.''

मी माझे बूट त्याला द्यायला तयार नव्हतो. मी सरळ नकार दिला. कारण तेवढी एकच चांगली वस्तू माझ्याजवळ उरली होती.

तो म्हणाला,

''मी तुला ब्रेड आणि मार्गारिनचा जास्तीचा वाटा देईन''

माझे बूट त्याच्या मनात फारच भरले होते. ते मिळविण्यासाठी तो धडपडत होता. पण मी ते त्याला जाम दिले नाहीत.( नंतर मात्र काही दिवसांनी ते माझ्याकडून हिसकावून घेतले गेले. त्यांच्या मोबदल्यात मला काहीच मिळालं नाही.)

पहाटेच्या वेळी उघड्या हवेवर, बाकावर बसलेल्या तीन डॉक्टरांनी आमची वैद्यकीय तपासणी केली.

पहिल्या डॉक्टरांनी तपासलं असं नाहीच. फक्त एकच प्रश्न विचारला,

''तुझी प्रकृती चांगली आहे ना?''

नाही म्हणण्याची कोणाची प्राज्ञा होती?

याउलट, दंतवैद्य मात्र फारच चिकित्साखोर आणि संशयी होता. त्यानं आम्हाला तोंड वासून मोठा आ करायला सांगितला. खरं तर, तो किडलेले दात बघतच नव्हता. कोणाच्या तोंडात सोन्याचे दात आहेत, तेच बघत होता. ज्या कुणाच्या तोंडात असं सोनं होतं, त्याचं नाव वेगळ्या यादीत जात होतं. माझ्या एका दातात सोनं भरलेलं होतं.

पहिले तीन दिवस झपाट्याने निघून गेले.

चौथ्या दिवशी पहाटे आम्ही आमच्या तंबूसमोर उभे होतो. काही जर्मन सैनिक आले आणि त्यांनी त्यांना योग्य वाटतील, ती

माणसं निवडायला सुरुवात केली.

''तू...तू...तू आणि तू''एकेकाकडे बोट दाखवत त्यांनी पुकारलं. जणू काही ते जनावरं किंवा विकायला ठेवलेला मालच निवडत होते.

आम्ही आमच्या सैनिकाच्या मागोमाग निघालो. तुरुंगाच्या दारापाशी पहिल्या इमारतीच्या प्रवेशद्वाराबाहेरच त्यानं आम्हाला थांबवलं. तो ऑर्केस्ट्रा विभाग होता. 'जा आत' त्यानं हुकूम सोडला. आम्हाला कळेना, संगीताशी आमचं काय काम होतं?

बँडवर लष्करी संचलनाची धून वाजत होती. नेहमी असतं, तसंच संगीत. त्याच्या तालावर पावलं टाकत डझनवारी तुकड्या कामाच्या जागेकडे निघाल्या. त्या सैनिकानं ठेका धरला.

''लेफ्ट राइट, लेफ्ट राइट!''

काही जर्मन पोलीस अधिकारी वाटेत हातात कागद-पेन घेऊन उभे होते. त्यांच्या समोरून जाणाऱ्या तुकडीतली माणसं त्यांनी मोजली. शेवटची तुकडी जाईपर्यंत बँडवर तेच मार्चिंग साँग सुरू होतं. नंतर ऑर्केस्ट्रा संचालकाच्या हातातली छडी स्तब्ध झाली. बँड एकदम मेल्यासारखा शांत झाला. जर्मन सैनिक त्या शांत पार्श्वभूमीवर मोठ्यांदा ओरडले,

''पाचा-पाचांच्या रांगा करा!''

आम्ही शांततेतच तुरुंगाच्या बाहेर पडलो. आमच्या बरोबरच चालणाऱ्या ऑर्केस्ट्रा कलाकारांशी आम्ही बोलायला लागलो. ते बहुतेक सगळे ज्यू होते. त्यातला एक ज्युलीक. पोलंडचा राहणारा, चष्मा लावणारा. त्याचा चेहरा फिकट आणि चेहऱ्यावर विषण्ण स्मित.लुई व्हायोलिन वाजवायचा. तो हॉलंडचा. त्याला बीथोवनच्या रचना वाजवू देत नाहीत, त्याची तक्रार होती. ज्यूंना जर्मन संगीत वाजवण्याची परवानगी



नव्हती. हॅन्स बर्लिनचा युवक होता. ऑर्केस्ट्राचा संचालक फ्रॅनेक वॉर्साचा विद्यार्थी होता.

ज्युलीकनं मला सगळं स्पष्ट करून सांगितलं. तो म्हणाला,

''इथून जवळच विजेचं सामान ठेवायचं गुदाम आहे. तिथं आम्ही काम करतो. ते काम मुळीच कठीण नाही आणि धोक्यांचही नाही. फक्त कापोला मधून मधून वेडाचे झटके येतात. अशा वेळी त्यांच्यापासून दूर राहणचं चांगलं.''

हॅन्स त्याला हसून म्हणाला,

''तू नशीबवान आहेस, लेका! चांगल्या विभागात काम मिळालं.''

दहा मिनिटांनी आम्ही गुदामापाशी येऊन पोहोचलो. एक जर्मन मुलकी अधिकारी आमच्यासमोर आला. जुन्या-पुराण्या चिंध्या विकत घेणारा व्यापारी आलेल्या मालाकडे जेवढं लक्ष देईल, तेवढचं त्यानं आमच्याकडं दिलं!

आमच्या साथीदारांनी बरोबरच सांगितलं होतं. इथलं कामं फारसं कठीण नव्हतं. जमिनीवर बसून आम्हाला कड्या, खिळे, बल्ब आणि विजेची इतर लहान उपकरणं मोजायची होती. कापोनं मोठ्या आवेशानं आमच्या कामाचं प्रचंड महत्त्व आम्हाला स्पष्ट करून सांगितलं. कोणीही कामात कामचुकारपणा केला, तर त्याला कडक शिक्षा केली जाईल, अशी त्यानं आम्हाला तंबी दिली. माझ्या नवीन मित्रांनी मला पुन्हा धीर आला.

''घाबरण्यासारखं काहीच नाही त्यात. त्या मुलकी अधिकाऱ्यामुळं त्याला तसं बोलावं लागतं.''

या भागात पोलिश नागरिक पुष्कळ होते, आणि काही फ्रेंच स्त्रिया. त्या स्त्रिया ऑर्केस्ट्रा-वादकांकडे स्नेहपूर्ण दृष्टीनं बघत होत्या.

फ्रॅनेक वॉर्साचा तरुण विद्यार्थी होता. इथं कामगारांवर देखरेख करणारा मुकादम होता. त्यानं मला एका कोपऱ्यात नेलं आणि तो म्हणाला,

''कामापायी स्वत:चं मरण ओढवून घेऊ नकोस. काम होत राहील. फक्त जर्मन पोलीस अधिकारी तुला रिकामं बसलेलं पकडणार नाहीत, याची काळजी घे, म्हणजे झालं.''

''मला माझ्या वडिलांपासून दूर जायचं नाही.'' मी पुन्हा पुन्हा कळवळून म्हणत होतो,

''तुझे वडील इथंच तुझ्याजवळच काम करतील.''

आम्ही भाग्यवान होतो.

आमच्या गटात दोन मुलं होती. दोघांचा झिओनिस्ट(ज्यू पुनर्वसनवादी) युथ ऑर्गनायझेशनशी जवळचा संबंध होता. त्यामुळं त्यांना असंख्य हिब्रू प्रार्थना येत होत्या. आम्ही नेहमी ते स्वर गुणगुणत असू. त्या क्षणी आमच्या जॉर्डन नदीचं संथ शांत पात्र आणि जेरुसलेमचं भव्योदत्त पावित्र्य आमच्या मनात जिवंत होत असे. आम्ही सतत पॅलेस्टाईनबद्दल बोलत असू. दोघांच्या आईवडिलांजवळ आपल्या मातीशी असलेले सगळे पाश तोडून देशांतर करण्याइतक धैर्य नव्हतं. वेळ येऊन ठेपण्यापूर्वी ते ही गोष्ट करू शकले असते, पण धैर्य कमी पडलं. माझ्या आईवडिलांचंही असंच झालं. घटनांचा सुगावा लागताच आम्ही आमचा देश सोडून पळून जायला हवं होतं.

आमची इथून मुक्तता होईपर्यंत जर सुदैवाने आम्हाला आयुष्य लाभलं, तर युरोपात पुन्हा कधीही राहायचं नाही, असं आम्ही ठरवून टाकलं. हैफाला जाणारी पहिलीच बोट आम्ही पकडणार होतो!

ऑर्केस्ट्रात ड्रम वाजावणारा अकिबा अद्याप कबालांच्या जगातच हरवून बसला होता. त्याला बायबलमधल्या एका वचनाचा



शोध लागला होता. संख्याशास्त्राच्या अनुसार त्याचा अर्थ लावला, तर आमची येत्या काही आठवड्यात सुटका होण्याची शक्यता होती. तसं भविष्यही त्यानं वर्तवलं.

आम्ही तंबूत निघून वादकांच्या इमारतीत राहायला गेलो. तिथं आम्हाला प्रत्येकाला एकेक ब्लँकेट, तोंड-हात धुवायला मोठं पसरट भांडं आणि साबणाची वडी इतकं सामान मिळालं. आमच्या गटाचा प्रमुख एक जर्मन ज्यू होता.

ज्यूच्या हाताखाली काम करायला चांगलं वाटत होतं. त्याचं नाव अल्फोन्से होतं. तो तसा तरुण होता, पण त्याचा चेहरा कमालीचा वयस्कर दिसत होता. आम्हा कैद्याशी तो माणुसकीनं वागायचा. जेव्हा जेव्हा त्याला शक्य होई, तेव्हा तेव्हा तो आमच्या गटातल्या अशक्त आणि म्हाताऱ्या माणसांसाठी कढईभर गरमागरम सूप आणायची व्यवस्था करायचा. ज्यांना स्वातंत्र्यापेक्षा आणखी वाटीभर जास्त सुपाचं मोल अधिक होतं, त्यांच्यासाठी तो ते करत होता!

एक दिवस आम्ही नुकतंच गुदामातलं काम संपवून परतलो होतो. मला सचिवाचं बोलावणं आलं.

''A 7713?''

''होय मीच तो.''

''जेवण झालं, की तुला दाताच्या डॉक्टरांकडे जायचं आहे.''

''पण मला दातांचा काहीच त्रास नाही.''

''जेवण झालं, की न विसरता जायचं.''

मी हॉस्पिटलच्या इमारतीत गेलो. दारासमोर सुमारे वीस कैदी रांगेत वाट बघत उभे होते. आम्हाला ताबडतोब का बोलावणं आलं, ते कळायला मला वेळ लागला नाही. आमचे सोन्याचे दात त्यांना उपटायचे होते.

दाताचे डॉक्टर झेकोस्लोव्हियन ज्यू होते. त्यांचा चेहरा म्हणजे जणू मृत्यूचा मुखवटाच. जेव्हा त्यांनी बोलायला तोंड उघडलं, तेव्हा त्यांच्या तोंडातल्या किडक्या-पिवळ्या विद्रूप दाताचं दर्शन मला झालं. मी खुर्चीत बसलो. अतिशय विनम्रपणे त्यांना विचारलं,

''तुम्ही आता काय करणार आहात?''

''काही नाही. फक्त तुझा सोन्याचा दात उपटणार.''

माझ्या मनात एकदम कल्पना चमकली. आजारी पडल्याचं ढोंग करावं.

''डॉक्टर, प्लीज! तुम्ही काही दिवस थांबू शकणार नाही का? मला बरं नाही. ताप आहे.''

त्यांनी भुवया संकुचित केल्या.कपाळाला आठी पाडून क्षणभर विचार केला. माझी नाडी तपासली.

''ठीक आहे. मुला... तुला बरं वाटेल, तेव्हा परत ये; आणि मला भेट. पण नक्की ये मात्र. मी बोलवायची वाट बघू नकोस.''

एका आठवड्यानंतर मी पुन्हा त्यांना भेटायला गेलो. पण याही वेळी मी तोच बहाणा केला. म्हटलं, की मला अजूनही बरं वाटत नाही. त्यांना आश्चर्य वाटलेलं दिसलं नाही. त्यांचा माझ्यावर विश्वास बसत होता, की काय, मला माहीत नाही.कदाचित मी कबूल केल्याप्रमाणे आपण होऊन परत आल्यामुळं त्यांना आनंद झाला असेल, याही वेळी मी सुटलो. त्यांनी मला आणखी मुदत दिली.

या माझ्या भेटीनंतर त्यांचा दवाखानाच बंद झाल्याचं मला कळलं. जर्मनांनी त्यांना तुरुंगात टाकलं होतं. त्यांना फाशी देणार असल्याचंही मला कळलं. कैद्यांचे सोन्याचे दात बळकावून ते स्वत:चा व्यवसाय चालवत होते, असा त्यांच्यावर आरोप होता.

मला त्यांची दया आली नाही. मी माझा दात वाचवला.



याचाच मला आनंद झाला. कदाचित तो दात मला पुढं केव्हातरी उपयोगी पडेल-पाव किंवा आयुष्य विकत घ्यायला!

आता मला माझं रोजचं वाडगाभर सूप आणि शिळ्या पावांची चळत याखेरीज कशातच रस वाटेनासा झाला. सूप आणि पाव हेच माझं संपूर्ण आयुष्य होतं. मी म्हणजे फक्त शरीर होतो. किंवा त्याहूनही कमी-एक उपासमार झालेलं पोट. काळाची क्रमणा फक्त त्या पोटालाच कळत होती!

गुदामामध्ये माझ्या शेजारी नेहमी एक फ्रेंच मुलगी काम करायची. आम्ही दोघं कधी एकमेकांशी बोललो नाही. कारण तिला जर्मन येत नव्हतं आणि मला फ्रेंच. इथं तिनं आर्यन म्हणून प्रवेश घेतला असला, तरी ती ज्यू असावी, असं वाटत होतं. तिला हद्दपार करून जबरदस्तीनं कामगार म्हणून इथं आणलं होतं.

एक दिवस आमचा कापो इडेक याला त्याचा नेहमीचा उन्मादक झटका आला आणि त्यात मी सापडलो. त्यानं जंगली जनावराप्रमाणे माझ्यावर झडप घातली. माझ्या छातीवर, डोक्यावर ठोसे मारले. मला खाली आदळलं. वर उचललं, पुन्हा खाली फेकलं. त्याचे ठोसे अधिकाधिक जोरदार होत होते. मी रक्तबंबाळ झालो. वेदना सहन न होऊन माझ्या तोंडून किंकाळी बाहेर पडू नये, म्हणून मी माझे ओठ दातांखाली घट्ट आवळून धरले होते. माझं ते गप्प राहाणं त्याला आवडलं नाही. त्याला वाटलं, मी त्याला उलट आव्हानच करतो आहे.

त्यानं मला आणखी जोरात मारायला सुरुवात केली.

एकाएकी तो शांत झाला. जणू काहीच घडलं नव्हतं. त्यानं मला कामावर परत पाठवलं. काही वेळापूर्वी घडलं, ते जणू नाटक होतं. आम्ही दोघांनी त्यात भाग घेतला होता व आपापल्या भूमिका

केल्या होत्या.

मी एका कोपऱ्यात विव्हळत बसलो. माझं सर्वांग भयंकर ठणकत होतं. एकाएकी मला शीतल स्पर्श जाणवला. एक थंड हात माझ्या रक्ताळलेल्या कपाळावरच्या जखमांचं रक्त पुसत होता. तीच ती फ्रेंच मुलगी होती. ती माझ्याकडे पाहून हसली; पण त्या हसण्यात कमालीचं दुःख होतं. तिनं माझ्या हातात पावाचा तुकडा कोंबला, माझ्या डोळ्यात पाहिलं. मला वाटलं, तिला काहीतरी बोलायचं आहे. पण भीतीनं ती गोठून गेली होती. काही क्षण ती याच अवस्थेत होती. नंतर तिचा चेहरा निवळला व ती शुद्ध जर्मन भाषेत म्हणाली,

''तू माझा छोटा भाऊ आहेस, रडू नकोस. रडू आवरण्यासाठी तू ओठ आवळून घे. तुझा संताप आणि तिरस्कार असाच राखून ठेवः पुढं केव्हा तरी तो दिवस येईल. पण आत्ता नाही. आता फक्त वाट बघ. दात-ओठ चाव आणि वाट बघ.''

त्यानंतर अनेक वर्षांनी मी पॅरिसमधल्या मेट्रोत माझा निबंध वाचत होतो. माझ्यासमोरच काळ्याभोर केसांची आणि स्वप्नांळू डोळ्यांची एक सुंदर स्त्री बसली होती. मी ते डोळे फार पूर्वी कुठेतरी पाहिले होते. ती तीच होती. मी तिला विचारलं,

''मला ओळखलं नाही?''

''नाही.''

''१९४४ मध्ये तुम्ही देखील जर्मनीत होतात. बुना इथं. आठवतं?''

''होय.''

''तुम्ही विजेच्या गुदामात काम करत होतात.''

''हो.'' ती म्हणाली. ती काहीशी अस्वस्थ झाली. मग क्षणभर शांत राहून म्हणाली, ''थांबा, मला आठवतंय्.''



''इडेक... कापो.... तो लहान ज्यू मुलगा...त्याला बसलेला मार... तुमचे प्रेमळ शब्द...''

आम्ही दोघे मेट्रोतून बरोबरच बाहेर पडलो. एका कॅफेच्या गच्चीवर जाऊन बसलो.

ती संध्याकाळ आम्ही त्या जुन्या दिवसांच्या आठवणींची उजळणी करण्यात घालवली.

तिचा निरोप घेताना मी तिला म्हटलं,

''तुम्हाला एक प्रश्न विचारू का?''

''मला माहीत आहे, तो प्रश्न कोणता असेल.''

''कोणता?''

''मी ज्यू आहे का? होय, मी ज्यूच आहे. माझं कुटुंब अतिशय धार्मिक प्रवृत्तीचं. मी नोकरी करत असताना बनावट कागदपत्रं मिळवली आणि आर्यन म्हणून वावरायला लागले. त्यामुळं माझं नाव जबरदस्तीनं वेठीला धरलेल्या कामगारांच्या यादीत गेलं. मला हद्दपार करून जर्मनीत पाठवण्यात आलं. मी छळछावणीतून निसटले. पळून गेले. मला जर्मन येतं, हे त्या गुदामात कोणालाच माहीत नव्हतं. नाहीतर आणखीनच संशय निर्माण झाला असता. त्या दिवशी तुमच्याशी मी ते शब्द बोलले खरे, पण त्यात केवढा धोका होता! पण मला माहीत होतं, तुम्ही कोणाला सांगणार नाही.''

एकदा जर्मन सैनिकांच्या देखरेखीसाठी आम्हाला रेल्वेगाड्यांमध्ये डीझेल इंजिन्स चढवण्याचं काम मिळालं होतं. इडेक मोठ्या मुश्की लीनं स्वतःवर ताबा ठेवत असला, तरी त्याच्या चेहऱ्यावर कळत होतं, की कुठल्याही क्षणी त्याला रागाचा झटका येणार. तसा तो आलाच आणि या वेळी त्यांच्या भयंकर उन्मादाच्या झटक्याला बळी पडले माझे वडील.

इडेक संतापानं पिसाट होऊन ओरडायला लागला,

''ए आळशी म्हाताऱ्या! सैताना, तुला नीट काम करायचं आहे, की नाही?''

– आणि त्यानं वडिलांना लोखंडी कांबीनं झोडपायला सुरुवात केली. आधी तर माझे वडील त्या प्रहारांनी अर्धमेले होऊन अंगाचं मुटकुळं करून बसले. नंतर ते कोलमडून पडले. एखाद्या जीर्ण वाळलेल्या झाडावर वीज कोसळून ते उन्मळून पडावं, तसे ते कोसळले.

हा सगळा प्रकार मी निश्चलपणे बघत होतो. मी गप्प राहिलो. खरं म्हणजे, मला स्वत:लाही मार बसू न देता वडिलांना कसं बाजूला काढावं, याचा विचार मी करत होतो. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, मला त्यावेळी इडेकचा राग आला नाही. मला राग आला, तो माझ्या वडिलांचा! इडेकच्या संतापाचा उद्रेक कसा टाळायचा, हे त्यांना माहीत नसल्याबद्दल मी त्यांच्यावरच रागावलो होतो. त्या तुरुंगातल्या आयुष्याने मला असं घडवलं होतं!

फ्रॅनेकचं एक दिवस माझ्या सोन्याच्या दाताकडे लक्ष गेलं.

''मुला, हा तुझा दात मला दे.''

मी त्याला सांगितले, की ते अशक्य आहे. कारण त्या दाताशिवाय मला जेवताच येणार नाही.

''तुम्हाला काय देतात जेवणात?''त्यानं विचारलं.

त्याच्या त्या प्रश्नाला उत्तर न देता मी मला सुचलं, ते वेगळंच सांगितलं. मी त्याला म्हटलं, की वैद्यकीय तपासणीत त्यांनी हा माझा दात यादीत लिहून घेतला आहे व तो तुला दिला, तर आपल्या दोघांनाही विनाकारण त्रास होईल.

''तू जर मला तो दात दिला नाहीस, तर त्याची फार मोठी किंमत तुला मोजावी लागेल.'' फ्रॅनेक रागावून म्हणाला.



एकाएकी त्याचं रुप पालटलं. तो आता बुद्धिमान, सहृदय तरुण नव्हता. त्याच्या डोळ्यात मला लालसा दिसायला लागली होती. दोन भिन्न व्यक्ती असाव्यात, इतकं त्याचं रूप बदललं. त्याच्या डोळ्यातली लालसा पाहून मी म्हटलं,

''माझ्या वडिलांना विचारून सांगतो.''

''विचार तुझ्या वडिलांना, पण मला उद्यापर्यंत तुझं उत्तर मिळायला हवं.''

मी जेव्हा माझ्या वडिलांशी त्याबद्दल बोललो, तेव्हा ते एकदम निस्तेज झाले. काही वेळ गप्प बसले. मग ते म्हणाले,

''तू दात मुळीच देऊ नकोस.''

''तो काढून घेईल. त्याची हिंमत तेवढी होणार नाही.''

पण दुर्दैव असं, की फ्रॅनेकला माझा कच्चा दुवा माहीत होता. मला नेमकं कुठं चाचपायचं, ते त्याला ठाऊक होतं. घडलं, ते असं.

माझ्या वडिलांनी कधी लष्करात नोकरी केली नसल्यानं तालावर अचूक पावलं टाकून संचलन करणं त्यांना जमत नसे. इथं मात्र आम्ही कोणत्याही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कडक तालावरच जात असू. माणसांचे आकृतिबंधच पुढं सरकत असत. माझ्या वडिलांना ते जमत नसल्याने त्यांना रोज छळायची, मारझोड करायची आयतीच संधी फ्रॅनेकला मिळाली.

लेफ्ट राईट: काठीचा जोरदार तडाखा. लेफ्ट राइट: आणखी एक ठोसा.

चुकलं, पुन्हा घाव!

मी स्वत:च माझ्या वडिलांना धडे द्यायचं ठरवलं. तालात पावलं कशी टाकायची, कशी बदलायची, आम्ही आमच्या बराकीसमोरच सराव करायला लागलो. मी आज्ञा देत असे.

लेफ्ट....राईट

माझे वडील त्याप्रमाणे तालीम करत असत. इतर कैदी आम्हाला हसत.

''बघा! हा लहान अधिकारी म्हाताऱ्याला शिकवतोय्, वा, रे जनरल! तुला हा म्हातारा मोबदल्यात किती पाव देतो?''

मी लोकांकडे दुर्लक्ष केलं. पण माझ्या वडिलांची अजूनही म्हणावी तशी प्रगती होत नव्हती. रोज त्यांना मार मिळायचं काही चुकत नव्हतं. अर्थात फ्रॅनेकनं त्यांना मारायचंच ठरवलं असेल, तर ते नीट चालूनही तो मारणारच होता.

''मूर्ख, आळशी म्हाताऱ्या! तुला धड तालावर चालताही येत नाही.''

फ्रॅनेकची सरबत्ती.

हा प्रकार दोन आठवडे चालला. शेवटी आमची सहनशक्ती संपली. आम्ही सपशेल माघार घेतली. फ्रॅनेकला शरण जाऊन मी त्याला दात द्यायचं ठरवलं. ते ऐकून दुष्ट हास्याचा गडगडाट करत तो म्हणाला,

''मला माहीत होतं. मीच जिंकणार, याची मला खात्रीच होती. चला, कधीच नाहीपेक्षा उशिरा का होईना, तू दात देणार, तर! पण लक्षात ठेव. तू मला इतकी वाट पाहायला लावलीस. याची शिक्षा म्हणून तुझा पाव बंद: ही तुझ्या चुकीची किंमत. हा तुझा पाव माझ्या एका डॉक्टर मित्रासाठी. हा दातांचा डॉक्टरही वॉर्साचाच आहे. तो तुझा दात काढील. त्याच्या बदली त्याला पाव.''

''काय? माझा सोन्याचा दात तुम्हाला मिळणार आणि वर माझा पावही द्यायचा?''

फ्रॅनेक दात विचकून हसला. म्हणाला,



''मग तुझं काय म्हणणं आहे? मुठीच्या प्रहारानं मीच तुझा दात पाडू, म्हणतोस?''

त्याच संध्यकाळी संडासात त्या वॉर्साच्या दाताच्या डॉक्टरानं एका गंजलेल्या चमच्यानं माझा सोनं भरलेला दात उपटला.

फ्रॅनेक आता बराच नरम झाला होता. काही वेळा तो मला जास्तीचं सूपही द्यायचा. पण हे काही फार दिवस टिकलं नाही. कारण त्यानंतर पंधरा दिवसांनी पोलंडमधून आलेल्या सगळ्यांची बदली दुसऱ्या छावणीत झाली...

एवढा सोन्याचा दात गमावूनही माझ्या पदरात काहीच पडलं नाही.

पोलंडनिवासी दुसरीकडे हलवण्याच्या काही दिवस आधी मला एक नवाच अनुभव आला.

ती रविवारची सकाळ होती, आमच्या तुकडीत त्या दिवशी कामावर जायची खरं तर, आवश्यकता नव्हती. पण इडेकला ते पटलं नसतं. आम्ही बराकीत आरामात बसून आहोत, हे त्याला सहन झालंच नसतं. त्यामुळे आम्हाला गुदामात जावंच लागलं.

गुदामात गेल्यावर इडेकनं आम्हाला फ्रॅनेकच्या ताब्यात दिलं आणि तो म्हणाला,

''तुम्हाला जे आवडेल, ते करा. पण काहीतरी काम करा. काम केलं नाही तर माझ्याशी गाठ आहे.''

– आणि तो निघून गेला.

काय करावं, आम्हाला कळेना, उकिडवं बसून पाय दुखून आले, म्हणून आम्ही आळीपाळीनं गुदामातून एक चक्कर मारून आलो. एखाद्या नागरी अधिकाऱ्यानं जेवताना थोडासा पावाचा तुकडा टाकून दिलेला असेल, तर तो कुठं मिळतो का, ते पाहिलं.

मी इमारतीच्या मागच्या बाजूला आलो. पलीकडच्या लहानशा खोलीतून मला काहीतरी आवाज ऐकू आला. मी तिथवर जाऊन आत डोकावून पाहिलं. गादीवर इडेक एका अर्धनग्न पोलिश मुलीबरोबर होता. त्यानं आम्हाला छावणीतच का राहू दिलं नाही, त्याचं कारण मला कळलं. एका मुलीबरोबर चाळे करायला मिळावेत, म्हणून त्यानं शंभर कैद्यांना तुरुंगातून बाहेर काढलं होतं. मला ते इतकं विचित्र वाटलं, की जोरात हसूच फुटलं.

इडेक उडी मारून उठून बसला. गर्रकन वळला. त्यानं मला पाहिलं. त्या मुलीनं तिचं वक्षस्थळ झाकून घेतलं. मला पळावंसं वाटलं, पण माझे पाय जमिनीला खिळून बसले होते. इडेकनं माझा गळा पकडला,

दबलेल्या आवाजात तो म्हणाला,

''अरे धिटुकल्या, याचा परिणाम काय होतो, ते बघच तू आता काम सोडून इथवर आल्याची काय किंमत मोजावी लागते, ते लवकरच कळेल तुला. तुझ्या गुन्ह्यांची भारी किंमत तुला मोजावी लागेल. आणि आता.. आपापल्या कामाच्या जागी परत जा.''

काम नेहमी ज्यावेळी संपतं, त्याच्या अर्धा तास आधी इडेकने सगळ्या तुकडीला एकत्र केलं. हजेरी घेतली. काय झालं, ते कोणालाच कळेना. हजेरी आणि यावेळी? इथं? पण ते मला माहीत होतं.

इडेकनं लहानसं भाषण दिलं.

''दुसऱ्यांच्या नसत्या उठाठेवी करायच्या कोणत्याही सामान्य कैद्याला अधिकार नाही. तुमच्यापैकी एकाला हे कळलेलं दिसत नाही. म्हणून त्याला एकदाच आणि कायमचं लक्षात राहील, अशी अद्दल घडवण्याचं काम माझ्याकडं आलं आहे.. आणि हे मी माझं भाग्य समजतो.''



माझ्या पाठीवरून घाम ओघळत गेल्याचं मला जाणवलं. त्यानं पुकारलं,

''A-7713''

मी पुढं झालो. ''लाकडाची पेटी आणा.'' त्यानं हुकूम सोडला.

त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला पेटी आणून दिली.

''झोप त्याच्यावर. पोटावर झोप.''

मी त्याप्रमाणे केलं. त्यानंतर मला फक्त एकाच गोष्टीची जाणीव होत होती. चाबकाचे पाठीवर उठणारे आसूड, सतत फटके.

''एक...दोन..''तो मोजत होता.

प्रत्येक दोन फटक्यांच्यामध्ये तो थांबत होता. पहिल्या काही फटक्यांनी मी खरोखर घायाळ झालो. मला त्याचं मोजणं ऐकू येतं होतं.

''दहा..अकरा..''

त्याचा आवाज शांत होता आणि एखाद्या जाड भिंतीआडून यावा, तसा माझ्यापर्यंत पोहोचत होता.

''तेवीस...''

आता फक्त दोन उरले, हा विचार मनात येत असतानाच मी अर्धवट बेशुद्ध झालो.

''चोवीस, पंचवीस!''

अखेर ते मरणप्राय आसूड संपले. मला ते नंतर काही जाणवलंच नाही. कारण मी बेशुद्ध झालो होतो. कोणीतरी माझ्या अंगावर थंडगार पाण्याची बादली ओतली, तेव्हा जरा मी सावध झालो. आजूबाजूला सगळं ओलं झालं आहे, हे मला अंधूक अंधूक कळत होतं. मग कोणीतरी जोरात ओरडून बोललेलं ऐकू आलं. तो इडेकच

असला पाहिजे. तो ओरडून जे काही बोलत होता, त्यातले शब्द थोडे थोडे कळत होते.

"ऊठ!"

कदाचित उठण्यासाठी मी काही हालचाल केली असावी. कारण मी पुन्हा पुन्हा खाली पडतोय, हे मला पुसटसं कळत होतं. खरंच, मला उठायची इच्छा होती!

"ऊठ!" तो आणखीनचं कर्कशपणे किंचाळला.

मला त्याला सांगावासं वाटत होतं.

मला उठावंसं वाटतंय.

धडपड करूनही मला उठता येईना. मी जागचा हालूसुद्धा शकत नव्हतो.

इडेकच्या हुकूमावरून दोघा कैद्यांनी मला उचललं आणि धरून त्यांच्यासमोर नेलं.

"माझ्या डोळ्यांकडे बघ!"

मी त्याच्याकडे बघितलं. पण मला तो दिसला नाही. माझ्या मनात वडिलांचा विचार आला, माझ्यापेक्षा अधिक दुःख त्यांना झालं असेल.

"हरामखोरा! नीट ऐक." इडेक भोचक थंडपणाने म्हणाला, "हे तुझ्या फालतू जिज्ञासेचं फळ! तू जे पाहिलंस, ते कोणाला सांगायचं धाडस केलंस, तर याच्यापेक्षा पाचपट शिक्षा मिळेल, कळलं?"

मी मान हलवली. एकदा, दहादा. मी सारखी मान हालवतच राहिलो. जणू काही अजिबात न थांबता 'हो' म्हणायचं माझ्या डोक्यानं ठरवलं होतं.

एका रविवारी आमच्यापैकी निम्मे लोक कामावर गेले होते.



त्यांच्यात माझे वडील होते. बाकीचे बराकीत होते. त्यात मीही होतो. सकाळी उशीरापर्यंत अंथरुणात निजून राहायची सोन्यासारखी संधी आम्हाला मिळाली होती.

दहा वाजायच्या सुमाराला आकाशात घुसलेले भोंगे एकाएकी कर्कशपणे वाजायला लागले. सावधानतेचा इशारा. एकेका विभागाचे प्रमुख आम्हाला आत एकत्र जमविण्यासाठी धावले. नाझी पोलीस अधिकाऱ्यांनी सुरक्षित जागी आश्रय घेतला. अशा इशाऱ्याच्या वेळी पळून जाणं त्या मानानं सोपं असल्यानं (कारण पहारेकऱ्यांनी आपापल्या टेहाळणी चौक्या सोडल्या होत्या; आणि काटेरी तारांच्या कुंपणामधला विजेचा प्रवाह खंडित केला गेला होता.) अशा वेळी कोणीही आपापल्या इमारतीबाहेर आढळल्यास त्याला तात्काळ ठार मारण्याचा हुकूम पोलीस अधिकाऱ्यांना मिळाला होता.

काही क्षणातच सगळा तुरुंग, ती छावणी एखाद्या ओसाड जहाजासारखी झाली. रस्त्यावर एकही मनुष्यप्राणी नव्हता. स्वयंपाक खोलीजवळ वाफाळणारं गरम सूप अर्धवट भरलेल्या कढया तशाच पडल्या होत्या. रस्त्याच्या अगदी मधोमध गरमागरम सूप असलेल्या कढया आणि त्यांची राखण करायला कोणीही नाही! उघड्यावर पडलेली राजाची मेजवानी, केवढं मोठं प्रलोभन! शेकडो डोळे त्या कढयांवर रोखले होते. डोळ्यांमध्ये आपल्यालाही सूप मिळावं, या इच्छेची चमक. दोन कोकरं आणि त्याचा फडशा पाडायला टपलेले. शंभर कोल्हे, राखण करायला मेंढपाळ नाही, अशी दोन कोकरं! केवढी मोठी भेट! पण कोण हिंमत करणार? भुकेपेक्षा भीती वरचढ होती.

एकाएकी ३७ क्रमांकाच्या इमारतीचं दार किलकिलं झालेलं आम्हाला दिसलं. एक माणूस हळूहळू बाहेर आला. किड्यासारखा सरपटत तो त्या कढयांजवळ गेला. शेकडो डोळे त्याच्या हालचाली

बघत होते. हृदयांची धडधड वाढली होती. तो यशस्वी झाला, आमच्या मनात मत्सर जागा झाला. एखाद्या वाळक्या काटकीप्रमाणे आम्ही मत्सराग्नीत जळू लागलो. आमच्या पोटात भुकेची आग भडकली होती. त्या माणसाचं त्याच्या धाडसाबद्दल कौतुक करावं, असं क्षणभरही त्यावेळी आम्हाला वाटलं नाही. बिचारा शूरवीर! एक वेळचं सूप मिळावं, म्हणून तो मरणही ओढवून घ्यायला तयार झाला होता. मनातल्या मनात आम्ही त्याला मारूनही टाकलं!

सरपटत कढईजवळ येऊन तो आता तिच्या काठापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होता. अशक्तपणामुळे म्हणा, किंवा भीतीमुळं म्हणा, तो त्या अवस्थेत काही वेळ राहिला. तो स्वत:ला त्या कढईच्या काठापर्यंत उचलण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता. सर्व शक्ती पणाला लावत होता. अखेर तो त्यातही यशस्वी झाला. भल्या मोठ्या कढईत क्षणभर स्वत:कडेच बघत राहिला. त्या द्रवात पडलेल्या स्वत:च्या भुतासारख्या प्रतिबिंबाकडे तो डोळे फाडून बघत होता. नंतर काहीही विशेष कारण नसताना तो भयानक चित्कारला. असा चित्कार मी पूर्वी कधीही ऐकला नव्हता. नंतर तोंड उघडून त्यानं ते स्थिर वाफाळणाऱ्या द्रवात खुपसलं. स्फोट झाल्याप्रमाणे आम्ही जागी हादरलो. तो माणूस उभ्याउभ्याच पाठीकडून जमिनीवर कोसळला. त्याचं तोंड गरम सूपानं भाजलं होतं. सगळं सूप तोंडाला माखलं होतं.जमिनीवर कढईच्या बुडापाशी त्यानं अखेरची थोडी वळवळ केली आणि तो निश्चेष्ट पडला!

नंतर आम्हाला विमानाचे आवाज ऐकू आले. एकाच वेळी सगळ्या बराकी हादरायला लागल्या.

''बुनावर बॉम्ब टाकणार आहेत.''कोणीतरी ओरडलं.

माझ्या मनात वडिलांचाच विचार आला. पण त्याचबरोबर एका गोष्टीचा आनंद झाला, की सगळी छावणी एकाच वेळी बेचिराख



होणार होती. सूडाचा आनंद! जर्मनांचा विविध आघाड्यांवर पराभव होत असल्याच्या गोष्टी आम्ही ऐकल्या होत्या. पण त्यावर कितपत विश्वास ठेवावा, ते आम्हाला कळत नव्हतं. आज मात्र ते समोर घडत होतं, ते खरं होतं! आम्हाला मुळीच भीती वाटली नाही. आमच्या तुरुंगावर एखादा बॉम्ब पडला असता, तर एकाच वेळी शेकडो हजारो माणसं मेली असती. आम्हाला कोणत्याही प्रकारच्या मृत्यूचं भय वाटलं नव्हतं. स्फोट होणारा प्रत्येक बॉम्ब आमच्या मनात आनंदाचा उद्रेक घडवून आणत होता. आम्हाला आयुष्यात नवा आत्मविश्वास देत होता.

तो हल्ला तासापेक्षा जास्त वेळ टिकला. तो आणखी दसपट टिकायला हवा होता, दहा तास!

मग हळूहळू पुन्हा सारं शांत झालं. शेवटच्या अमेरिकन विमानांचा आवाज वाऱ्यावर विरून गेला. आम्ही पुन्हा एकदा एका दफनभूमीवर उभे होतो. क्षितिजावर काळ्या धुराचा प्रचंड लोळ उठताना दिसत होता. पुन्हा सायरन्स वाजले. दक्षतेचा काळ संपल्याची ती सूचना होती. हल्ला संपला होता.

प्रत्येक जण आपापल्या इमारतीच्या बाहेर आला. आम्ही आग आणि धुरानं भरलेली हवा फुफ्फुसांमध्ये ओढून घेतली. आमचे डोळे आशेनं चमकले. छावणीच्या मधोमध बॉम्ब पडला होता. सगळ्यांना एकत्र जमण्याच्या जागीच तो न फुटलेला बॉम्ब होता. आम्हाला तो छावणीच्या बाहेर नेऊन टाकावा लागला.

तुरुंगाचा प्रमुख त्याच्या सहकाऱ्यांबरोबर आणि मुख्य कापोबरोबर तुरुंगाच्या रस्त्यांवरून पाहणी करून आला. अद्यापही त्यांच्या चेहऱ्यावर हल्ल्याच्या भीतीच्या छटा रेंगाळत होत्या.

तुरुंगाच्या मधोमध सूप प्यायचा प्रयत्न करणाऱ्या त्या माणसाचं प्रेत पडलं होतं. चेहऱ्यावर उकळत्या द्रवाचे डाग. एकमेव

बळी! कढया परत स्वयंपाक खोलीत नेण्यात आल्या.

नाझी पोलीस पुन्हा त्यांच्या निरीक्षण चौक्यावर परतले व आपापल्या मशीनगन्सच्या मागे जाऊन बसले, मध्यांतर संपला होता!

तासाभरानंतर आम्हाला कामावर गेलेल्या कैद्यांच्या तुकड्या परत येताना दिसल्या. त्याच तालावर माझे वडील मला दिसले. आनंदाच्या भरातच ते मला म्हणाले,

''अनेक इमारती सरळ जमीनदोस्त झाल्या. पण गुदामाला काही झालं नाही.''

दुपारी आम्ही आनंदाने विध्वंसानंतरचे भग्नावशेष साफ करायला गेलो.

या घटनेला एक आठवडा उलटला.एक दिवस आम्ही कामावरून परतत असता तुरुंगाच्या मध्यभागी एकत्र जमायच्या जागी आम्हाला काळे वधस्तंभ उभारलेले दिसले.

कामानंतरची हजेरी घेतल्याशिवाय सूप मिळणार नाही, असं आम्हाला सांगण्यात आलं. या कामाला रोजच्यापेक्षा बराच वेळ लागला. नेहमीपेक्षा आज दिल्या जाणाऱ्या आज्ञा अधिकच कर्कश स्वरात होत्या. वातावरणात एक प्रकारचा विचित्र ताण जाणवत होता.

''डोक्यांवरच्या टोप्या काढा!'

दहा हजार टोप्या एकाच वेळी निघाल्या.

''पुन्हा घाल्या त्या टोप्या!''

दहा हजार टोप्या झटकन डोक्यांवर जाऊन बसल्या. वीज चमकावी, इतक्या वेगानं.

तुरुंगाचं दार उघडलं गेलं. नाझी पोलिसांची एक तुकडी आत आली. आम्हाला घेरून उभी राहिली. दर तीन पावलांवर एकेक पोलीस होता. निरीक्षण-चौक्यांवरच्या मशीनगन्स आत आमच्या



दिशेला वळवून रोखल्या होत्या.

ज्युलीक कुजबुजला,

''नाझींना कोणत्याही तऱ्हेचा त्रास नको. त्याची त्यांना भीती वाटते.''

दोन पोलीस बराकींमध्ये गेले. ते बाहेर आले, तेव्हा त्या दोघांच्यामध्ये अपराधी मनुष्य होता. तो वॉर्साचा तरुण होता. त्यानं छळछावणीत तीन वर्षं घालवली होती. तो चांगला दणकट व मजबूत बांध्याचा मुलगा होता. माझ्या तुलनेत अवाढव्यच.

त्याची पाठ वधस्तंभाकडे होती. त्याचा चेहरा न्यायाधीशाकडे वळलेला. न्यायाधीश म्हणजे तुरुंगाचा प्रमुख. तो तरुण फिकट दिसत होता. मला तो घाबरलेला वाटला नाही. हेलावून गेलेला दिसला. हातकड्या अडकवलेले त्याचे हात कापत नव्हते. तो शेकडो नाझी पोलिसांकडे थंडपणे बघत होता. सभोवती असणाऱ्या हजारो कैद्यांवरून त्यांची थंड दृष्टी फिरत होती. तुरुंगप्रमुखानं त्यांच्यावरचं आरोपपत्र वाचायला सुरुवात केली. प्रत्येक शब्दावर आघात देत तो वाचत होता.

''हिटरलच्या आज्ञेवरून...कैदी नंबर..सावधगिरीचा इशारा देणारे सायरन्स वाजल्यानंतर त्या वेळात यानं चोरी केली... कायद्याच्या कलमानुसार याला देहदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. ही इतर कैद्यांना एक प्रकारची ताकीदच आहे. त्यांनीही ध्यानात ठेवावं. त्यांचीही हीच गत होईल.''

सगळे तटस्थ उभे होते.

मला माझ्या हृदयाचे वाढलेले ठोके स्पष्टपणे ऐकू येत होते. ऑशवित्झ आणि बर्कनी इथं दररोज जे हजारो लोक स्मशानाच्या भट्टीत मरत होते, त्यांच्या दुःखद विचारांचा इतका त्रास होत नव्हता.

पण हे एक माझ्या डोळ्यांसमोर घडत असलेलं मरण..

तो तरुण वधस्तंभाला टेकून उभा होता. त्यांच्या विचारांनी माझ्या मनाचा ताबा घेतला.

"हा कार्यक्रम लवकर संपेल, असं तुला वाटतं का? मला फार भूक लागली आहे.''ज्युलीक माझ्या मनात कुजबुजला

तुरुंगप्रमुखाच्या इशाऱ्यासरशी कापो पुढं झाला. तरुणाजवळ गेला. दोन कैद्यांच्या मदतीनं त्या तरुणला दोन वाडागे भरून सूप दिलं. कापोला त्या तरुणाचे डोळे बांधायचे होते, पण तरुणानं नकार दिला.

प्रतीक्षेच्या दीर्घ क्षणानंतर फाशी देणाऱ्यानं त्याच्या मानेभोवती दोर टाकला त्या तरुणाच्या पायाखालची खुर्ची काढून घेण्यासाठी फाशी देणाऱ्या दोन मदतनीसांना इशारा करणार, इतक्यात तो तरुण ओरडला,

"स्वतंत्रतेचा विजय असो! स्वातंत्र्य चिरायु होवो! जर्मनीचा सत्यानाश होवो. जर्मनीचा सत्या... जर्मनीचा..जर्म..''

फाशी देणाऱ्यानं त्याचं काम पूर्ण केलं. तलवारीचा सपकन वार व्हावा, तसा एक हुकूम हवेवर उठला.

"टोप्या काढा!''

दहा हजार कैद्यांनी त्या तरुणाला श्रद्धांजली वाहिली.

"टोप्या घाला...''

मघाशी याचीच रंगीत तालीम झाली होती.

नंतर सगळ्या कैद्यांना गटागटानं संचलन करत त्या लोंबकळणाऱ्या मृतदेहाजवळ जावं लागलं. त्याच्या बाहेर लोंबणाऱ्या जिभेकडे आणि निष्प्राण डोळ्यांकडे टक लावून बघावं लागलं. कापोंनी त्या बळीचा चेहरा नीट निरखून पाहायची आमच्यावर सक्ती केली.



या संचलनानंतर आम्हाला आपापल्या बराकींमध्ये जेवण्यासाठी जायची परवानगी मिळाली.

त्या दिवशी सूप फारच चविष्ट लागलं!

मी अनेक फाशी पाहिल्या. त्यांच्यापैकी कोणीही मला कधी रडताना दिसलं नाही. अनेक वर्षं छळात काढल्यानंतर त्यांची वाळलेली शरीरं अश्रूंची खारट चव विसरून गेली होती.

अपवाद फक्त एकच. बावन्नाव्या केबल युनिटचा मुख्य कापो डच होता. सहा फुटांपेक्षाही जास्त उंच. बलाढ्य शरीराचा. त्याच्या अधिकाराखाली सातशे कैदी काम करत होते. सगळ्यांचं त्या कापोवर भावासारखं प्रेम होतं. त्याच्या हातचा मार कधी कोणाला खावा लागला नव्हता. की त्याच्या तोंडून कोणाविषयी कधी अपमानकारक शब्द बाहेर पडले नव्हते.

त्याच्या हाताखाली एक कोवळा तरुण मुलगा होता. अशा मुलांना पिपेल म्हणत. त्याचा चेहरा अतिशय सुंदर आणि सतेज होता. असं सौंदर्य तुरुंगात कोणी कधी पाहिलं नव्हतं.

(बुना इथं अशा पिपेल लोकांचा सर्वांनाच कमालीचा तिटकारा होता. हे लोक प्रौढांपेक्षाही क्रूर असत. एकदा मी तेरा वर्षांच्या मुलाला त्यांच्या वडिलांना मारताना पाहिलं. कारण काय, तर त्याच्या वडिलांनी त्यांचा बिछाना नीट घातला नव्हता. म्हातारा बिचारा मुळूमुळू रडत होता. मुलगा मात्र ओरडत होता, 'तुम्ही जर ताबडतोब रडणं थांबवलं नाही, तर मी तुमच्यासाठी कधीही ब्रेड आणणार नाही, कळलं?')

पण हा जो डच माणसाचा मुलगेला नोकर होता, तो सर्वांनाच आवडायचा. त्याचा चेहरा एखाद्या दुःखी देवदूतासारखा होता.

एक दिवस बुना इथलं विद्युत केंद्र उद्‌ध्वस्त झालं. जर्मन

गुप्तहेर त्याजागी लगेच जमा झाले. त्यांना घातपाताचा संशय आला. त्यांनी संशयितांचा माग काढला. पुरावे त्या डच कापोकडे बोट दाखवत होते. बराच शोध घेतल्यानंतर गुप्तहेरांना त्याच्याजवळ शस्त्रसाठा सापडला.

त्या डच कापोला ताबडतोब अटक करण्यात आली. एक आठवडाभर त्याचा नाना प्रकारे छळ कण्यात आला. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. त्यानं कोणाचंही नाव सांगितलं नाही. त्याची बदली ऑशवित्झला करण्यात आली. त्यांच्याबद्दल नंतर आम्हाला काहीच कळलं नाही.

पण त्याचा लहानसा नोकर मात्र त्याच्या मागे तुरुंगात कैदी म्हणून राहिला. त्याचेही अनन्वित हाल करण्यात आले. पण त्यानं तोंडातून ब्र काढला नाही. नंतर नाझी पोलिसांनी त्याला फाशीची शिक्षा सुनावली. इतर दोन कैद्यांजवळ शस्त्र सापडलं. त्यांनाही त्या मुलाबरोबर फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.

एक दिवस आम्ही कामावरून परतत होतो. तुरुंगांत मधल्या मोकळ्या जागेत तीन वधस्तंभ उभारलेले दिसले. तीन काळ कावळे.

पुन्हा तीच सगळी तालीम. सर्वांची हजेरी. टोप्या काढणं, घालणं, आम्हाला घेरून उभे असलेले नाझी पोलीस. आमच्याकडे वळलेल्या मशीनगन्स तोच कार्यक्रम, तोच उपचार. एकाच वेळी तीन बळी. त्यांच्यातला लहान मुलगा. दु:खी डोळ्यांचा देवदूत.

नाझी पोलीस नेहमीपेक्षा जास्त अस्वस्थ व विचारमग्न दिसले. हजारो प्रेक्षकांच्या समोर एक कोवळ्या मुलाला फाशी देणं म्हणजे काही चेष्टा नव्हती. तुरुंगप्रमुखानं आरोप वाचून दाखवले. सगळ्यांचे डोळे त्या मुलावर रोखले होते.तो निस्तेज झाला होता. त्याचा चेहरा शिशासारखा काळसर पडला होता. तो जवळजवळ शांतच होता.



दातांनी ओठ चावत होता. वधस्तंभाच्या सावल्या त्याच्यावर पडल्या होत्या.

यावेळी कापोंनी फाशी द्यायचं काम नाकारलं. तीन नाझी पोलीस त्यांच्या जागी त्या कामासाठी आले.

तीनही आरोपी एकदमच खुर्च्यांवर चढले. तिघांच्याही गळ्यात फास एकदमच अडकवला गेला.

''स्वातंत्र्य चिरायु होवो!''दोन प्रौढ कैदी ओरडले.

पण तो लहान मुलगा गप्पच होता.

''कुठं आहे देव? कुठं आहे देव?''माझ्यामागून कुणीतरी विचारलं.

तुरुंगप्रमुखाच्या इशाऱ्यासरशी तिन्ही खुर्च्या ओढल्या गेल्या.

सगळीकडे भयाण शांतता पसरली.

क्षितिजावर सूर्य अस्ताला जात होता.

''टोप्या काढा!''तुरुंगप्रमुखाचा कर्कश स्वर शांत वातावरणाला चिरत उठला. त्याचा आवाज घोगरा झाला होता.

आम्ही सगळे रडत होतो. ''टोप्या घाला!''

मग संचलन सुरू झालं.

दोन प्रौढ गुन्हेगार मेले होते. त्यांच्या जिभा सुजल्या होत्या. जिभांवर निळसर छटा आली होती. पण त्या मुलाचं काहीच वजन नसल्यामुळे तो तिसरा दोर मात्र अजूनही हलतच होता. तो मुलगा अद्यापही जिवंत होता,

अर्ध्या तासापेक्षाही जास्त वेळ तो त्या ठिकाणी लोंबकळल्या अवस्थेत होता. जीवन आणि मरण या दोहोंच्या मध्ये तडफडत होता.

आमच्या डोळ्यादेखत तो असह्य यातना सोसत हळूहळू

मृत्यूच्या स्वाधीन झाला; आणि आम्हाला त्याच्याकडे न्याहाळून बघावं लागलं. प्राण जाणारा त्याचा चेहरा..

मी त्याच्या समोरून गेलो, तेव्हा तो जिवंत होता. त्याची जीभ अद्यापही लाल होती. त्याचे डोळे अद्याप विझले नव्हते.

माझ्यामागे असलेला तोच माणूस विचारत होता,

''कुठं आहे देव?''

मी माझ्याही नकळत त्याला उत्तर दिलं,

''कुठं आहे? तो इथं आहे! या वधस्तंभावर लटकलेला आहे तो...''

त्या रात्री सुपाला प्रेतांचा वास आला!

■ ■ ■



# पाच

उन्हाळा संपत आला होता. ज्यूंचं वर्ष जवळ जवळ संपलं होतं.

'रोश हशाना' च्या आदल्या दिवशीची संध्याकाळ. या शापित वर्षाचा तो शेवटचा दिवस होता. सगळ्या छावणीत एक प्रकारचा ताण होता. तो ताण आमच्या सगळ्यांच्या मनावर आला होता. बाकी काहीही असलं, तरी हा दिवस इतर दिवसांपेक्षा वेगळा होता. वर्षाचा शेवटचा दिवस. 'शेवटचा' हा शब्द ऐकायला फार विचित्र वाटत होता.

खरोखरच तो तिथला शेवटचा दिवस असता, तर?

आम्हाला संध्याकाळचं जेवण मिळालं. अतिशय दाट सूप. पण कोणीही त्याला स्पर्श केला नाही. संध्याकाळची प्रार्थना झाल्याशिवाय आम्ही जेवणार नव्हतो. प्रार्थना होईपर्यंत थांबायची आमची इच्छा होती. मोकळ्या जागेत हजारो ज्यू जमले. त्या पटांगणाच्या चहूबाजूंनी विजेचा प्रवाह खेळवलेलं काटेरी तारांचं कुंपणं होतं. सगळे ज्यू शांत होते. त्यांचे चेहरे भयग्रस्त होते.

रात्र व्हायला लागली. इतर सगळे कैदी प्रत्येक इमारतीतले,

प्रत्येक विभागातले कैदी त्या जागी गर्दी करायला लागले. अचानक त्यांच्यांत काळ आणि अवकाश यांना जिंकायचं बळ आलं होतं. दोहोंनाही आपल्या इच्छेपुढं नमवायचं धैर्य त्यांना मिळालं होतं!

रागानं मी विचार करत होतो,

''देवा!इतका अपरंपार त्रास आणि छळ सहन करणाऱ्या या जमावाच्या, या दोन समुदायाच्या तुलनेत तू कोण आहेस? या गर्दीतला प्रत्येक जण तुझ्यापुढं आपापल्या श्रद्धेचा, क्रोधाचा, क्रांतिकारी भावनेचा उद्घोष करत आहे. हे विश्वाच्या कर्मा! या सर्व गरीब, दुबळ्या लोकांच्या पुढं तुझ्या मोठेपणाला काय अर्थ? हा सर्वनाश, हे असं सडणं, कुजणं हीच का तुझी थोरवी? तू अजूनही त्यांच्या रंजलेल्या, दुर्बल, हळव्या मनाला आणि गांजलेल्या पीडित, शोषित शरीरांना का त्रास देतोस?''

दहा हजारांचा समुदाय मूक प्रार्थनेसाठी जमला होता. त्या मृत्यूची यंत्रणा राबवणारे सगळे विभागप्रमुख कापोही होते.

''परमेश्वरा! आमच्यावर कृपा कर!''

आमच्या प्रमुखाचा आवाज जेमतेम ऐकू येईल, असा होता. प्रथम मला वाटलं,तो वाऱ्याचाच आवाज आहे.

''परमेश्वरा! आमच्यावर कृपा कर!''

हजारो माणसांनी ते शब्द पुन्हा म्हटले. वादळात झाडं कोसळून पडावीत, त्याप्रमाणे हजारो माणसांनी खाली लोटांगण घालून त्या विधात्याला प्रणिपात केला.

का? पण का म्हणून मी त्याला प्रणिपात करू?

माझा अणुरेणू बंड करून उठला.

त्याची लाखो निरपराध लेकरं 'त्यांच्या'खड्ड्यात जाळली जात आहोत, म्हणून मी त्याला वंदन करू? त्यानं त्याच्या सहा



स्मशानभूमी अहोरात्र चालू ठेवल्या आहेत, म्हणून? त्या सर्वशक्तिमान ईश्वरानं, त्याच्या सर्व शक्तीनिशी ऑशवित्झ, बुना, बर्कनी, बुशेनवाल्ड असे अनेक मरणाचे कारखाने तयार केले, म्हणून? मी त्याला कसं म्हणू की, 'हे विश्वाच्या स्वामी! हे विधात्या! तुला वंदन असो.'ज्या विधात्यानं संपूर्ण मानवजातीतून फक्त आमचीच जात छळासाठी निवडली, रात्रंदिवस आम्हाला मरणयातना भोगवल्या आणि आमचे आईबाप, भाऊ-बहिणींचा स्माशानभूमीत शेवट होताना बघायला लावलं, त्याला मी माझ्या सदिच्छा का देऊ? ज्यांना आमच्या अमानुष कत्तलीतून आमचे बळी मिळविण्यासाठीच स्वत:ची वेदी निर्माण केली, त्या ईश्वराच्या पवित्र नावाची मी का स्तुती करू?

प्रमुखाचा आवाज चढला होता. त्याचा आवाज भरदार होता. पण त्याच वेळी प्रचंड जमावाचे हुंदके, अश्रू आणि उसासे यामुळे त्याचा आवाज कापरा होऊन ऐकू येत होता.

''हे संपूर्ण विश्व, हे ब्रह्मांड, ही पृथ्वी, देवा, तुझीच आहे.''

तो प्रत्येक शब्दागणिक थांबत होता. जणू त्या शब्दांमागचा सुप्त अर्थ शोधण्याची शक्ती त्याच्याठायी नव्हती. त्या शब्दांमधलं उदात्त माधुर्य जाणवून त्याचा कंठ रूद्ध होत होता.

- आणि मी?मी स्वत:च त्यावेळी सुन्न होऊन गेलो होतो. मी विचार करत होतो.

होय, मनुष्य फार शक्तिमान आहे. तो ईश्वरापेक्षाही थोर आहे. जेव्हा आदम आणि ईव्हनं त्याचा आज्ञाभंग केला, तेव्हा त्यानं दोघांना नंदनवनाबाहेर हाकललं. जेव्हा नोआच्या पिढीनं ईश्वराचा रोष ओढवून घेतला, तेव्हा त्यानं पूर आणला. जेव्हा सोदोमला ईश्वराच्या डोळ्यात कृपा दिसली नाही, म्हणून त्यानं

अर्चना सोडून दिली, तेव्हा ईश्वरानं आकाशातून अग्नि आणि विषाचा वर्षाव केला. पण हे बिचारे मानव ज्यांना देवानं फसवलं, ज्यांच्यावर सूड उगवला, ज्यांना त्यानं छळासाठीच निर्माण केलं, लाखो जीवांना जाळण्यासाठी, कत्तल करून घेण्यासाठी, विषारी वायूनं गुदमरून मरण्यासाठीच जन्माला घातलं, ते बिचारे दीनदुबळे इथं काय करताहेत? तर त्या ईश्वराची प्रार्थना करताहेत! त्याची स्तुती करताहेत!

''सगळे जीवमात्र, प्राणिजात ईश्वराच्या महिम्याचे साक्षीदार आहेत.''

एकेकाळी नववर्ष-दिनानं माझ्या आयुष्यावर फार प्रभाव टाकला होता. मला वाटत होतं, मी अतिशय पापी आहे. माझ्या पापांमुळे तो करुणामय परमेश्वर कष्टी झाला आहे. त्याच्या दयेची याचना करत मी घळाघळा अश्रू ढाळले होते. एकेकाळी माझा माझ्या एकांतातल्या उदात्त कृत्यावर प्रगाढ विश्वास होता. मला वाटत होतं, माझ्या अशा एकांतातल्या क्षमायाचनेवर जगाचा मोक्ष अवलंबून आहे.

तुरुंगात त्या दिवसापासून मात्र मी अशी त्याच्या करुणेची भीक मागणं सोडून दिलं. याचना करणं सोडून दिलं. शोकं करणं मला यापुढं शक्य नव्हतं. उलट, मला आतून एक प्रकारचं बळ आलं. आता आरोप करणारा मी होतो आणि आरोपी होता ईश्वर!

माझे डोळे उघडले होते. मी एकटा होतो. विलक्षण एकटा. देवाशिवाय आणि माणसांशिवाय, प्रेमाविना आणि दयेविना, राखेखेरीज मी आणखी काहीच नव्हतो. तरीही मला वाटलं, मी त्या सर्वसमर्थ परमेश्वरापेक्षाही समर्थ आहे. माझं आयुष्य आजवर त्याच्याशी बांधलं गेलं होतं; आता ते मुक्त झालं आहे.



एकाग्रतेनं प्रार्थना करणाऱ्या अशा त्या जमावाच्या मध्ये मी उभा होतो. एखाद्या अनोळख्यासारखं मी त्या जमावाचं निरिक्षण करत होतो.

सर्वांनी 'कदिश'म्हटल्यावर प्रार्थना संपली. प्रत्येकानं स्वत:साठी, आईवडिलांसाठी, मुलांसाठी, भावांसाठी मनोभावे शुभचिंतन केलं.

त्या पटांगणात आम्ही बराच वेळ रेंगाळत होतो. सगळेजण भारावल्यासारखे स्तब्ध होते. त्या संमोहनावस्थेतून स्वत:ला बाहेर काढण्याची कोणाचीच हिंमत नव्हती.

मग निजायची वेळ झाली, तेव्हा सगळे कैदी हळूहळू आपापल्या बराकीकडे निघून गेले. लोक एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा देताना मी ऐकत होतो.

माझ्या वडिलांना भेटायला मी धावलो. पण त्या वेळी, माझा स्वत:ला मुळीच विश्वास नसतानाही ते भेटल्यावर मला त्यांना नववर्षाच्या शुभेच्छा द्याव्या लागतील, या विचारानं मी घाबरलोदेखील.

ते एका भिंतीपाशी उभे होते. खाली वाकलेले, जणू प्रचंड ओझ्याखाली दबल्यासारखे त्यांचे खांदे झुकले होते.

मी त्यांच्याजवळ गेलो. त्यांचा हात हातात घेतला; आणि त्या हाताचं चुंबनं घेतलं. अश्रू त्यांच्या हातावर पडले.

कोणचे अश्रू होते ते? माझे, की त्यांचे?

मी काहीच बोललो नाही. तेही काही बोलले नाहीत. पण त्यावेळी आम्ही एकमेकांना कधी नव्हे इतकं चांगलं समजून घेतलं.

घंटीच्या आवाजासरशी दचकल्यामुळं आम्हाला वास्तवाचं भान आलं. आता झोपायला जायलाच हवं होतं.

माझ्यावर झुकलेल्या माझ्या वडिलांच्या चेहऱ्याकडे बघण्यासाठी म्हणून मी डोळे वर केले. माझे डोळे त्या वृद्ध, शुष्क व थकलेल्या चेहऱ्यावर स्मित किंवा तत्सम एखादी भावना शोधण्याचा प्रयत्न करत होते. पण तिथं तसं काहीच नव्हतं. कोणत्याच भावनेची छटा तिथं नव्हती. पराभूत, जीवनाची चपराक खाल्लेला एक वृद्ध चेहरा.

योम किप्पूर, प्रायश्चित्ताचा दिवस.

आम्ही उपवास करायचा का? या प्रश्नावर गरमागरम वाद झाला. उपवास करणं म्हणजे मरण अधिक निश्चित करणं. आता येतोय, त्यापेक्षा अधिक झपाट्यानं मृत्यू जवळ येईल. वर्षभर आम्ही इथं उपाशीच होतो. संपूर्ण वर्षच 'योम किप्पूर'होतं! पण काही जण म्हणाले, की आपण उपवास केलाच पाहिजे; कारण उपवास न करणं धोक्याचं आहे. आपण देवाला दाखवून दिलं पाहिजे, की इथं, या नरकातसुद्धा आमच्या अंगी त्याची प्रार्थना करण्याची क्षमता आहे! दु:खातही आम्ही त्याची स्तुतीच करतो.

मी उपवास केला नाही. केवळ माझ्या वडिलांना संतुष्ट करण्यासाठी म्हणून उपाशी रहावं, असं मला वाटत नव्हतं. त्यांनी मला खाण्यापासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला.

पुढं माझ्या आयुष्यात मी उपवास करावा, असं कारणच उरलं नाही. कारण मी ईश्वर या कल्पनेचाच त्याग केला होता. माझा देवावर विश्वास राहिला नव्हता. मी वाडगा भरून सूप तोंडाला लावलं, तेव्हा मी ईश्वराचा निषेध केला. त्या माझ्या कृत्यात मी स्वत:चीच बंडखोर भावना पाहिली.

– आणि मी मला मिळालेला पाव चघळत बसलो.

खोल हृदयात मला मोकळं मोकळं वाटलं.

नाझी पोलिसांनी आम्हाला नववर्षाची एक भेट दिली.



आम्ही नुकतेच कामावरून परतलो होतो. तुरुंगाच्या दारातून आत जात असतानाच आम्हाला वातावरणात भयंकर घटनेचा वास जाणवला. नक्कीच काहीतरी वेगळं घडणार होतं. हजेरीला रोजच्या इतका वेळ लागला नाही. संध्याकाळच सूप घाईघाईनं वाटण्यात आलं. आम्ही ते चिंताक्रांत मनानं एका दमात गिळलं.

मी माझ्या वडिलांच्या विभागात कामाला नव्हतो. माझी बदली दुसऱ्या विभागात करण्यात आली होती. हा बांधकाम विभाग होता. इथं मला मोठाले दगड दिवसातले बारा तास इकडून तिकडे वाहून नेण्याचं काम होतं. माझ्या विभागाचा प्रमुख जर्मन ज्यू होता. चणीनं लहान, डोळे अतिशय तीक्ष्ण. त्या संध्याकाळी त्यानं आम्हाला सांगितलं, की सूप पिणं झाल्यावर कोणालाही बाहेर जाऊ दिलं जाणार नाही; आणि पाठोपाठ एक भयंकर शब्द सगळ्यांच्या तोंडी फिरला,

''निवड!''

याचा अर्थ आम्हाला माहीत होता. नाझी पोलिस आमची तपासणी करणार. आमच्यातला जो कोणी अशक्त असेल, त्याचा नंबर ते लिहून घेणार–

हा माणूस जगायला लायक नाही, दफन करायला चांगला आहे.

सूप पिऊन आम्ही आमच्या बिछान्याच्या भोवती एकत्र जमलो. काही अनुभवी कैदी म्हणाले,

''तुम्ही फार भाग्यवान आहात. तुम्हाला इतक्या उशिरा या तुरुंगात आणलं. आज हा तुरुंग तर आम्हाला नंदनवन वाटतो. दोन वर्षांपूर्वी तर बुनाचा हा तुरुंग म्हणजे नरक होता, नरक! त्यावेळी आम्हाला पाणी नव्हतं, पांघरायला ब्लँकेट नव्हतं. आता मिळतं,

त्याहीपेक्षा कमी सूप आणि ब्रेड मिळत असे. रात्री आम्ही जवळ जवळ नग्न झोपत असू आणि त्यावेळी तपमान शून्याच्याही खाली तीस अंश गेलेलं असे. रात्री थंडीनं गारठून मेलेल्यांची शेकडो प्रेतं रोज सकाळी गोळा केली जायची. सध्यापेक्षा काम अतिशय कष्टांचं होतं. आज तर हे लहानसं नंदनवनच झालं आहे. त्या काळी कापोंना रोज ठराविक कैद्यांना ठार करण्याचा हुकूम असे, आणि दर आठवड्याला अशक्त व्यक्तींची मृत्यूसाठी निवड. त्याबाबत काहीही दयामाया दाखवली जात नसे. खरंच, तुम्ही फार नशीबवान आहात.''

''पुरे करा! चूप बसा!'' मी कळवळून ओरडलो, ''तुम्ही या सगळ्या गोष्टी उद्या सांगा, किंवा नंतर केव्हातरी.''

ते अनुभवी कैदी खूप मोठ्यांदा हसले. त्यांचा अनुभव व्यर्थ नव्हता.

''तुला भीती वाटते? आम्हालाही अशीच भीती वाटत होती. त्या काळात भीती वाटावी, अशा अनेक गोष्टी होत्या.''

ते वृद्ध कैदी त्यांच्या कोपऱ्यात बसून राहिले. स्तब्ध, दुखावलेले, मूक, त्यांच्यापैकी काही प्रार्थना करत होते.

एका तासाचा अवधी. एका तासात आम्हाला निकाल कळणार होता. मृत्यू किंवा तात्पुरती सुटका.

– आणि माझे वडील? अचानक मला त्यांची आठवण आली. या निवडीच्या दिव्यातून ते कसे पार पडणार? त्यांना जगायला कोण योग्य ठरवणार? आधीच त्यांचं वय इतकं झालेलं...

आमच्या विभागाचा प्रमुख १९३३ पासून निरनिराळ्या तुरुंगामध्येच होता. तो तुरुंगाच्या बाहेर कधी गेलाच नव्हता. त्यानं कधीपासून त्या कत्तलखान्यांमधून, मरणाच्या या सगळ्या



कारखान्यांमधून काम केलं होतं.

नऊ वाजण्याच्या सुमाराला तो आमच्यामध्ये योग्य जागी उभा राहिला.

''सावधान!''

क्षणार्धात नि:शब्द शांतता पसरली.

''मी आता काय सांगणार आहे, ते नीट लक्ष देऊन ऐक. काही क्षणांतच निवड सुरू होईल. तुम्ही सर्वांनी सगळे कपडे काढायचे आहेत. नंतर एकामागून एक डॉक्टरांच्या पुढं जायचं. तुमची जगण्यासाठी निवड होईल, असं वाटतं. तुम्हाला या निवडीत यश मिळो. पण त्यासाठी तुम्ही स्वत:च या संधीचा फायदा घ्या. तुम्ही दुसऱ्या खोलीत जाण्यापूर्वी डॉक्टरांच्या समोर जरा ऐटीत चालत जा. चेहरा प्रफुल्लित ठेवा. ताठ रहा. वाकून, हळूहळू, मरगळ्यासारखं चालू नका. पळत जा. चपळाईनं. त्यामुळं डॉक्टरांची खात्री पटेल, की या माणसामध्ये अद्याप शक्ती शिल्लक आहे. तुमच्या मागे एखादा राक्षस लागला आहे, असं समजून पळा, जोर, उत्साह दाखवा. डॉक्टरांकडे बघूही नका. सरळ त्यांच्या समोरून पळत जा.''

आज प्रथमच मी त्याचा आवाज कापरा झालेला ऐकत होतो. तो क्षणभर थांबला. मग म्हणाला,

''आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट, म्हणजे घाबरू नका.''

त्याचा उपदेश मोलाचा होता. त्याप्रमाणे वागायचं आम्ही ठरवलं.

मी सगळे कपडे काढले. पलंगावर ठेवले. या संध्याकाळी ते कोणीही चोरण्याचा धोका नव्हता.

तिबी आणि योत्सी या दोघांनाही माझ्याप्रमाणे नुकतंच बांधकाम विभागात काम देण्यात आलं होतं. ते माझ्याजवळ येऊन

म्हणाले,

''आपण एकत्रच राहू या. त्यामुळं आपल्याला बळ येईल.''

योत्सी तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटत होता. तो बहुधा प्रार्थना करत असावा. तिबी शांत होता. तो फार फिकट पडला होता. बराकींमध्ये सगळे कैदी आपापल्या बिछान्यांच्या मागे विवस्त्र होऊन उभे होते. ईश्वरासमोर शेवटच्या न्यायदानाच्या वेळी असंच दृश्य दिसत असेल! मानव असेच उभे राहत असतील.

''ते येताहेत.''कुणीतरी म्हणालं.

तीन नाझी जर्मन डॉक्टर्स आणि कुप्रसिद्ध डॉक्टर मेंगेल आले. हेच ते डॉक्टर, जे बर्कनौ इथं आम्हाला सामोरे आले होते. आमच्या विभागप्रमुखानं हसण्याचा प्रयत्न करत विचारलं,

''तयार आहात?''

आम्ही तयार होतोच. जर्मन डॉक्टर्सही तयार होते. डॉक्टर मेंगेलच्या हातात एक यादी होती. आमचे नंबर्स. त्यांनी आमच्या विभागप्रमुखाला खूण केली,

''आपण सुरू करू या.''

जणू काही एखादा खेळच सुरू होणार होता.

डॉक्टरांच्या समोर जायची पाळी आधी आमच्या विभागाच्या 'अधिकाऱ्यांची' होती.

कापोज्, फोरमन वगैरे. त्यांची शारीरिक क्षमता अर्थातच उत्तम होती. नंतर पाळी होती सामान्य कैद्यांची. डॉक्टर मेंगेलनी सगळ्यांना डोक्यापासून पायापर्यंत नीट न्याहाळलं. पुन्हा पुन्हा नंबर लिहून घेतले. माझं मन एकाच विचारानं व्यापलं होतं- माझा नंबर लिहिला जाऊ नये. माझा डावा हात त्यांनी बघू नये!

माझ्यापुढं फक्त तिबी आणि योत्सी होते. त्यांची तपासणी



झाली. ते सुटले. त्यांचे नंबर डॉक्टरांनी लिहून घेतले नाहीत, ते कळण्याइतपत वेळ मला मिळाला. कोणीतरी मागून मला ढकललं. आता माझी पाळी होती. मागे वळूनही न बघता मी पळत सुटलो. माझा मेंदू चक्रावून गेला होता. मनात विचारांचा कल्लोळ-

तू फार अशक्त आहेस, तू फार बारीक आहेस, तू फार हडकुळा आहेस; तू भट्टीत घालायच्याच लायकीचा आहेस.

मी पळत होतो. ती शर्यत कधी न संपणारी वाटली. मला वाटलं, अनेक वर्षांपासून मी पळतोच आहे...

तू फार अशक्त आहेस, तू रोगट आहेस.

शेवटी थकून मी परत आलो. जरा श्वास घ्यायला उसंत मिळाल्यावर मी योत्सी आणि तिबीला विचारलं,

''माझा नंबर त्यांनी लिहून घेतला का?''

''नाही.''योत्सी म्हणाला. त्यानं हसत पुस्ती जोडली,''कोणत्याही परिस्थितीत ते तुझा नंबर लिहू शकलेच नसते. तू इतक्या जोरात पळत होतास!''

मी हसायला लागलो. मला फार आनंद झाला. मला योत्सीचं चुंबन घ्यावंसं वाटलं. त्याक्षणी मला इतरांची पर्वा नव्हती. माझा नंबर लिहिला गेला नव्हता, बस्स!

ज्यांचे नंबर कागदांवर लिहिले गेले, ते वेगळे उभे राहिले. सगळ्या जगानं बहिष्कृत केल्यासारखे. त्यामुळे काही जण मूक अश्रू ढाळत होते.

नाझी डॉक्टर्स निघून गेले. विभागप्रमुख समोर आला. त्याच्या चेहऱ्यावर एकूण थकवा दिसत होता.

''सगळं काही ठीक झालं. कोणाला काही होणार नाही. कोणीही काळजी करू नका.''

त्यानं पुन्हा हसण्याचा प्रयत्न केला.

एका गरीब, दीनवाण्या, सुकलेल्या ज्यूनं आशाळभूतपणे थरथरत्या स्वरात म्हटलं,

''पण...पण त्यांनी तर माझा नंबर कागदावर लिहून घेतला.''

विभागप्रमुख एकदम चिडला. त्याच्या सांगण्यावर तो ज्यू अविश्वास दाखवतो, म्हणजे काय?

''मी सांगतो, ते खोटं आहे का? मी एकदाच आणि शेवटचं सांगतो. तुम्हाला काहीही होणार नाही. कोणालाच. मूर्खांनो! तुम्ही स्वत:च निराशेच्या चिखलात लोळत आहात.''

घंटा वाजली. संपूर्ण छावणीतली 'निवड'पूर्ण झाली असल्याची ती खूण होती.

मी सर्व शक्ती पणाला लावून ३६ क्रमांकाच्या इमारतीकडे धाव घेतली. माझे वडील मला वाटेतच भेटले. ते माझ्याजवळ आले.

''तू सुटलास?''

''होय. आणि तुम्ही''

''मी पण.''

आम्ही सुटकेचा केवढा नि:श्वास टाकला! माझ्या वडिलांनी माझ्यासाठी बक्षीस आणलं होतं. पावाचा अर्धा वाटा. त्यांना गुदामापाशी बुटाच्या तळाला बसवायचा रबराचा तुकडा सापडला होता. त्याच्या बदल्यात त्यांनी तो पाव मिळवला होता.

घंटा, आता आम्हाला एकमेकांपासून दूर होऊन झोपायला जायलाच हवं होतं. प्रत्येक गोष्ट घंटेनं नियंत्रित केलेली. ती घंटा मला आज्ञा देत होती; आणि मी त्या आज्ञा आपोआप मुकाट्यानं पाळत होतो. मला तिचा तिटकारा होता. जेव्हा जेव्हा मी सुंदर



जगाची स्वप्न बघत असे, तेव्हा तेव्हा माझ्या कल्पनेत घंटा नसलेलं जग असे!

अनेक दिवस निघून गेले. आमच्या मनातले त्या निवडीचे विचारही फिकट होत गेले. म्हणून नेहमीप्रमाणे कामाला जायचो. रेल्वे वॅगन्समध्ये अवजड दगड भरायचो. आम्हाला मिळणारं रोजचं प्रमाणित जेवण आणखी कमी झालं होतं. एवढाच काय तो बदल झाला होता.

त्या दिवशी रोजच्याप्रमाणेच आम्ही पहाटे सूर्योदयापूर्वी उठलो होतो. आम्हाला काळी कॉफी आणि पाव मिळाला होता. आम्ही तो खाऊन नेहमीप्रमाणे रेल्वेच्या आवाराकडे निघायच्या तयारीतच होतो. आमचा विभागप्रमुख धावतच आला.

''सगळे शांत व्हा! माझ्याजवळ ही नंबरांची यादी आहे. मी ते तुम्हाला वाचून दाखवतो. ज्यांचे नंबर पुकारेन, त्यांनी आज कामाला जायचं नाही. इथं बराकीत राहायचं आहे.''

मृदु आवाजात त्यानं दहा नंबर वाचून दाखवले. आम्हाला समजून चुकलं.

त्या दिवशी निवडीच्या वेळी बाजूला काढलेले हेच ते नंबर होते. डॉक्टर मेंगेलना त्यांचा विसर पडला नव्हता.

विभागप्रमुख परत जायला निघाला. दहाही कैद्यांनी त्याला घेराव घातला. त्यांच्या कपड्यांना बिलगत ते म्हणाले,

''आम्हाला वाचवा. तुम्ही आम्हाला वचन दिलं होतं. आम्हाला आवारात कामाला जायचं आहे. आम्ही काम करू शकतो. आम्ही इतके सशक्त आहोत. आम्ही चांगले कामगार आहोत. आम्ही काम करू शकतो... आम्ही करू..''

त्यानं कैद्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. पुन्हा त्यांच्या

नशिबाचा हवाला दिला. त्यांना तुरुंगातच थांबायला सांगितलं, याचा अर्थ काहीतरी भयंकर घडणार आहे, असा नाही, या गोष्टीचं पुन्हा पुन्हा स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. विशेष काही झालं नाही, नशिबावर विश्वास ठेवा, असं सांगून त्यानं त्या हादरलेल्या दहा जणांना दिलासा दिला.

''मीही स्वत: रोज इथंच राहतो.'' तो म्हणाला.

पण तो काहीसा दुबळा युक्तिवाद होता. त्यालाही ते जाणवलं.

पुढं एक शब्दही न उच्चारता तो त्याच्या खोलीत गेला आणि त्यानं खोली बंद करून घेतली.

घंटा नुकतीच झाली होती.

हुकूम सुटला,

''रांगा करा!''

आवारातलं काम कष्टाचं होतं, या गोष्टीची आता आम्हाला तमा नव्हती. या बराकीपासून शक्यतो लवकर जास्तीत जास्त दूर जाणं महत्त्वाचं वाटत होतं. ती बराक म्हणजे नरकाचं केंद्र होतं, मृत्यूची मूस होती!

माझे वडील माझ्याकडे धावत येताना मला दिसले. माझ्या पोटात अचानक भीतीचा गोळा उठला.

''काय झालं?''

त्यांना धड श्वासही घेता येत नव्हता. भयंकर ते धापा टाकत होते. त्यांना तोंडही उघडता येत नव्हतं. कसेबसे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले.

''म.... मलाही...मला सुद्धा... त्यांनी छावणीतच थांबायला सांगितलं.''

त्या नाझी डॉक्टरांनी त्यांचा नंबर त्यांच्या नकळत लिहून



घेतला होता.

''आता काय होईल?'' ते विचारताना माझ्या मनाला अनंत वेदना झाल्या.

पण उलट त्यांनीच मला धीर देण्याचा प्रयत्न केला.

''अजून काही निश्चित नाही. अद्यापही सुटकेची संधी आहे. ते आज पुन्हा दुसऱ्यांदा निवड करणार आहेत. निर्णायक निवड.''

मी गप्प होतो.

त्यांना वाटलं, त्यांच्यापाशी आता वेळ फार थोडा आहे. ते घाईघाईनं बोलले. त्यांना अनेक गोष्टी सांगायच्या होत्या, त्यांचा आवाज गहिरवरून आला. बोलणं समजेनासं झालं. त्यांना माहीत होतं, की काही क्षणातच मला कामावर जावं लागणारं आहे. त्यांना एकट्यालाच मागे राहावं लागणार आहे. अगदी पूर्णपणे एकटे!

''हे बघ, ही सुरी घे.'' ते मला म्हणाले, ''आत यापुढे मला तिची गरज नाही. ती तुझ्याच उपयोगी पडेल. हा चमचाही घे. या वस्तू विकू नकोस. घे, पटकन. मी तुला देतोय, ते घे.''

असा मिळालेला वारसा!

''असं बोलू नका...'' ( मला वाटलं, मला आता अनावर हुंदके फुटणार)

''तुमचं असं बोलणं मला ऐकवत नाही. चमचा आणि सुरी तुमच्याजवळ ठेवा. माझ्याइतकीच या वस्तूंची तुम्हालाही गरज आहे. आपण आज संध्याकाळी काम संपल्यावर पुन्हा एकमेकांना भेटू.''

त्यांनी थकलेल्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहिलं. त्या डोळ्यांमध्ये आत्यांतिक निराशा दाटून आली होती. ते बोलत राहिले,

"मी तुला सांगतो, तू हे घे. मी सांगतो, तसं कर; माझ्या पोरा! आपल्याला वेळ नाही, तेव्हा वडिलांच्या म्हणण्याप्रमाणे कर."

आम्ही कामावर निघावं, अशी आमच्या कोपानं गर्जना केली.

आमची तुकडी छावणीच्या दाराकडे निघाली. लेफ्ट राइट!

मी माझे ओठ चावले.

माझे वडील मागे राहिले होते. इमारतीजवळ भिंतीला टेकून उभे होते.

नंतर त्यांनी आम्हाला गाठण्यासाठी धावायला सुरुवात केली. कदाचित मघाशी मला काहीतरी सांगायला ते विसरले असावेत. ते सांगण्यासाठी धावत येत होते. पण आम्ही फार वेगाने संचलन करत पुढं जात होतो लेफ्ट राईट!

आम्ही छावणीच्या दारापाशी पोहोचलो. त्यांनी आमची मोजणी केली. तीही लष्करी संगीताच्या कोलाहलात. आम्ही दारातून बाहेर पडलो.

संपूर्ण दिवसभर, जणू झोपेत चालत असल्यासारखा मी वावरत होतो. वरचेवर योत्सी आणि तिबी माझ्याशी एखादा प्रेमाचा शब्द बोलत होते. कोपानं सुद्धा मला धीर द्यायचा प्रयत्न केला. त्यानं त्या दिवशी मला सोपं काम दिलं. माझं हृदय वडिलांसाठी कळवळत होतं. मला आजारल्यासारखं वाटत होतं. ते सगळे मला किती चांगलं वागवत होते! अनाथ मुलासारखं! माझ्या मनात विचार आला, अजूनही या घडीपर्यंत माझे वडील मला मदत करत आहेत. मला ही चांगली वागणूक मिळायला तेच कारण आहेत!

त्या दिवशी दिवस लवकर संपावा, की संपू नये, मला नेमकं काय वाटत होतं, ते माझं मलाच कळत नव्हतं. त्या रात्री मी सर्वार्थानं



एकटाच असेन,या विचाराचाच माझ्या मनानं धसका घेतला होता. मी इथंच मरून गेलो, तर किती बरं होईल?

शेवटी संध्याकाळ झाली.काम संपलं.. छावणीकडे परतीची वेळ. माझं मन पळायला अधीर झालं होतं!

लष्करी संचलन, छावणीचं दार, छावणी, इमारत.

मी ३६ क्रमांकाच्या इमारतीकडे धाव घेतली.

या जगात अजूनही चमत्कार घडतात?

माझे वडील अद्यापही चक्क जिवंत होते! दुसऱ्या निवडीतून त्यांची 'सुटका'झाली होती. आपण अजूनही उपयुक्त वस्तू आहोत, हे ते सिद्ध करू शकले होते..

मी त्यांची सुरी आणि चमचा त्यांना परत दिला.

ड्रम वाजवणारा अकिबा आम्हाला सोडून गेला. या निवडीचाच बळी. शेवटी शेवटी आमच्यात वावरताना त्याचे डोळे विझलेले दिसत होते. जणू ते प्रत्येकाला त्याच्या अशक्तपणाबद्दल सांगत होते.

"मी आता जगू शकत नाही.. सारं संपलं आहे."

त्याचं खचलेलं धैर्य त्याला परत मिळवून देणं अशक्यच होतं. आमच्या बोलण्याकडे त्याचं लक्षही नव्हतं. तो पुन्हा पुन्हा एकच एक म्हणत होता, की आता यापुढं तो जगण्यासाठी झगडू शकणार नाही, त्याच्यात आता गाणंच उरलेलं नाही. कशावर श्रद्धाही नाही.

एकाएकी त्याचे डोळे निर्विकार व्हायचे–

फक्त दोन उघड्या जखमा, भीतीचे दोन खळगे!

या निवडीच्या दिवसात जीवनावरची श्रद्धा गमावणारा तो फक्त एकटाच नव्हता. पोलंडमधल्या एका लहानशा गावातला एक धर्मगुरू माझ्या ओळखीचा होता. तोही या छावणीत आला होता.

एक वाकलेला म्हातारा माणूस. त्याचे ओठ नेहमी थरथरत असायचे.सदासर्वकाळ तो प्रार्थना करत असायचा. कुठंही असो- छावणीत, कामाच्या ठिकाणी. रांगेत संचलन करत असताना, 'तालमुड'ची पानंच्या पानं त्याला पाठ होती. ती आठवून तो सतत म्हणत असायचा. स्वत:शीच युक्तिवाद करायचा, स्वत:लाच प्रश्न करायचा आणि स्वत:च उत्तर द्यायचा.

एक दिवस तो म्हणाला,

''बस्स, संपलं! आता आमच्या पाठीशी देव कधीच असणार नाही.''

– आणि जणू काही हे बोलल्याचा पश्चात्ताप झाल्याप्रमाणे देवाविषयी असे थंड आणि तोडून टाकणारे शब्द उच्चारल्याबद्दल खेद वाटल्याप्रमाणे तो क्षीण आवाजात पुढं बोलला,

''मला माहीत आहे. असं बोलण्याचा कोणालाही अधिकार नाही. माणूस फार लहान आहे. देवाचे गूढ हेतू आणि मार्ग जाणून घ्यायला, शोधायला तो फार खुजा, असमर्थ आणि नगण्य आहे. पण मी तरी काय करू? मी काही साधू संत नाही. किंवा कुणी तत्त्वज्ञही नाही. मी एक सामान्य मनुष्य आहे. रक्तामांसाचा बनलेला आहे, मला डोळे आहेत आणि इथं जे काही चाललं आहे, ते मला दिसत आहे. कुठं आहे देवाची दया? कुठं आहे ईश्वर? मी कसा विश्वास ठेवू? कोणी त्या दयाळू ईश्वरावर कसा विश्वास ठेवावा?''

बिचारा अकिबा! जणू काही तो देवावर विश्वास ठेवत राहिला असता, या सुळांच्या गर्दीत त्याला देव असल्याचा पुरावा मिळाला असता, तर त्याची मृत्यूसाठी निवड झाली नसती! पण ज्या क्षणी आपल्या श्रद्धेला तडे जाताहेत, हे त्याच्या प्रथम लक्षात आलं, त्या



क्षणी जगण्यासाठी धडपड करण्याचं त्याचं कारण संपलं आणि त्याच्या मरणाला प्रारंभ झाला.

निवड झाल्यानंतर अंमलबजावणी झाली, तेव्हा त्याला सर्वात आधी शिक्षा फर्मावण्यात आली. त्यानं स्वत:ची मान शिरच्छेद करणाऱ्याच्या ताब्यात दिली. तो आम्हाला फक्त इतकंच म्हणाला,

''तीन दिवसांनी मी या जगात नसेन. माझ्यासाठी कदिशचं पठन करा.''

आम्ही त्याला तसं वचन दिलं – तो इथून गेल्या तीन दिवसात जेव्हा जेव्हा धुरांड्यातून धूर बाहेर येताना दिसेल, तेव्हा आम्हाला त्याची आठवण येईल. आमच्यापैकी दहा जण एकत्र जमून दरवेळी देवाची विशेष प्रार्थना करू. त्याचे सर्व मित्र 'कदिश' म्हणतील.

नंतर तो हॉस्पिटलच्या दिशेनं गेला. त्याची पावलं स्थिर होती. त्यानं मागे वळूनही पाहिलं नाही. त्याला बर्कनौला नेण्यासाठी ॲम्ब्युलन्स तयार होती.

ते फार भयंकर दिवस होते. आम्हाला अन्नापेक्षा मारहाणच जास्त मिळत होती. कामाच्या ओझ्याखाली आम्ही चिरडून जात होतो; आणि तो गेल्यावर तीन दिवसांनी आम्ही 'कदिश'म्हणायचं विसरून गेलो!

हिवाळा सुरू झाला होता. दिवस लहान होते आणि रात्री अतिशय असह्य झाल्या होत्या. पहाटेच्या पहिल्या प्रहरी हिमगार वारे आम्हाला अक्षरश: चाबकासारखे फटकारत होते. आम्हाला हिवाळी कपडे देण्यात आले. किंचित जाड असे पट्ट्यांचे शर्टस्. अनुभवी बुजुर्गांना त्यात एक नव्याच क्रूर चेष्टेचा वास आला.

''आता तुम्हाला या यातना-छावणीची खरी चव कळणार!''

आम्ही नित्याप्रमाणे कामावर निघालो. आमची शरीर थंडीनं गोठली होती. आम्हाला उचलावे लागणारे दगड इतके थंडगार होते, की असं वाटायचं, आम्ही त्यांना स्पर्श करताच आमचे हात सरसाप्रमाणे दगडांना घट्ट चिकटून बसतील. पण शेवटी कोणत्याही गोष्टीची सवय होतच असते.

ख्रिसमस आणि नववर्षदिनी आम्हाला काम नव्हतं.

त्या दिवशी आम्हाला जरा घट्ट सूप देण्यात आलं.

जानेवारीच्या मध्याच्या सुमारास माझा उजवा पाय थंडीमुळं सुजायला लागला. मला तो जमिनीवर टेकवणंही शक्य नव्हतं. मी तपासून घ्यायला डॉक्टरांकडे गेलो. डॉक्टर ज्यूच होता. आमच्यासारखाच तोही एक कैदी. पण मोठा थोर डॉक्टर! त्याच्या तपासणीचा निष्कर्ष ठाम होता. मला ऑपरेशन करावं लागणार! जर मी विलंब लावला, तर पायाचा चवडा-आणि कदाचित पूर्ण पायदेखील कापून टाकावा लागेल.

आता हे अगदी निर्वाणीला आलं होतं. माझ्यासमोर पर्यायच नव्हता. डॉक्टरांनी ऑपरेशन ठरवलं होतं आणि त्यावर चर्चा अजिबात होत नव्हती. तरीही त्या डॉक्टरांनीच ऑपरेशनचा निर्णय घेतला, यामुळे मी आनंदात होतो.

पांढऱ्या चादरी घातलेल्या बिछान्यावर त्यांनी मला झोपवलं. लोक चादरींवर झोपतात, हे मी विसरूनच गेलो होतो.

हॉस्पिटल मुळीच वाईट नव्हतं. आम्हाला चांगल्या प्रतीचा पाव आणि दाट सूप मिळालं. तिथं कोणतीही घंटा नव्हती! हजेरी नव्हती. कष्टाचं कामं नव्हतं. वरचेवर माझ्या पावातला एक तुकडा मी माझ्या वडिलांना पाठवू शकत होतो.

माझ्या शेजारी हंगेरियन ज्यू निजला होता. त्य.ला हगवणीचा



भयंकर त्रास होत होता. तो जणू निष्प्राण होऊन पडला होता. त्याच्या शरीरात फक्त त्वचा आणि हाडंच शिल्लक उरली होती. त्याचे मृतप्राय डोळे, मला फक्त त्याचा क्षीण आवाज ऐकू येत होता. त्याच्या जिवंतपणाचं तेवढंच एक लक्षण होतं. त्याला बोलायला तरी शक्ती कुठून मिळत होती?

''मुला, तू इतक्या लवकर आनंदानं तरंगायला लागू नकोस. इथंही 'निवड' असते. बाहेरच्यापेक्षा अधिक वेळा. जर्मनीला आजारी ज्यूंची गरज नाही. जर्मनीला माझी गरज नाही. ज्यूंना भरून घेऊन दुसरी गाडी येईल आणि इथं तुझ्याशेजारी माझ्याऐवजी आणखी कुणी असेल, म्हणून म्हणतो, माझं ऐक. पुढची निवड व्हायच्या आतच या हॉस्पिटलच्या बाहेर पड.''

त्याचे ते शब्द खोल जमिनीतून आल्यासारखे वाटले. एक बिनचेहऱ्याच्या मानवी आकृतीतून आलेल्या त्या शब्दांसरशी माझं मन भीतीनं व्यापून गेलं. हॉस्पिटल खरोखरच फार लहान होतं. येत्या काही दिवसात नवे रुग्ण दाखल झाले, तर त्यांना जागा करून द्यायलाच हवी होती.

माझ्या शेजारी त्या बिनचेहऱ्याच्या माणसाला भीती वाटत होती, की पुन्हा निवड झाली किंवा नवे रुग्ण आले, तर पहिला बळी त्याचा जाईल. त्याला फक्त मला इथून बाहेर काढायचं होतं; म्हणजे माझा बिछाना मोकळा झाला, की त्याला जगायची संधी मिळेल! कदाचित मला फक्त घाबरवून सोडायचा त्याचा विचार असेल. तरीही निवडीबाबतचं त्याचंच म्हणणं खरं ठरलं, तर काय होईल? मी काय काय घडतं, त्याची वाट बघायचं ठरवलं.

डॉक्टरांनी मला येऊन सांगितलं, की उद्या माझ्या पायाचं ऑपरेशन करायचं ठरलं आहे.

''घाबरू नकोस. सगळं काही ठीक होईल.''डॉक्टर म्हणाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता त्यांनी मला ऑपरेशन रूममध्ये नेलं. जोवर ते डॉक्टर माझ्याजवळ आहेत, तोवर माझं काही वाईट होणार नाही, असं मला मनोमन वाटलं. त्यांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द मला वेदनाहारी मलमासारखा वाटला; आणि त्यांनी माझ्याकडे टाकलेला प्रत्येक दृष्टीक्षेप मला आशेचा संदेश देत होता.

''तुला किंचित दुखेल; पण ती वेदना लवकरच नाहीशी होईल. तुझे ओठ घट्ट मिटून घे.''

ऑपरेशन एक तासभर चाललं. त्यांनी मला बेशुद्ध केलं नव्हतं. मी माझे डोळे डॉक्टरांवर खिळवून ठेवले होते. नंतर वेदनेची एक कळ तीव्रपणे मस्तकात घुसली व मला भोवळ आल्यासारखं झालं. मी खोल खोल जात होतो...

जेव्हा मी सावध झालो आणि डोळे उघडून पाहिलं, तेव्हा मला सर्वत्र पांढरा रंगच तेवढा दिसला. पांढरेपणाचा एक विस्तार...माझी चादर, भिंती, नंतर माझ्यावर वाकलेला डॉक्टरांचा चेहरा दिसला. ते म्हणत होते,

''सगळं काही व्यवस्थित झालं. तू शूर आहेस. माझ्या मुला! तू आता इथं दोन आठवडे राहणार आहेस. आराम कर. कसलीही काळजी करू नकोस. तू लकवरच बरा होशील. भरपूर खा आणि तुझ्या शरीराला विश्रांती दे.''

मला फक्त त्यांच्या ओठांच्या हालचाली कळत होत्या. ते काय बोलत होते, ते माझ्या लक्षातच येत नव्हतं. पण त्यांचं ते हळू आवाजात पुटपुटणं मला खूप बरं वाटलं.

अचानक माझ्या कपाळावर थंडगार घामाचे थेंब डवरून



आले. मला माझ्या पायाची जाणीवच झाली नाही. त्यांनी खरंच माझा पाय कापला?

''डॉक्टर..''मी अडखळलो.

''काय झालं, बाळा?''

त्यांना तो प्रश्न विचारायचं धाडस मला झालं नाही.

''डॉक्टर, मला तहान लागली आहे.''

त्यांनी माझ्यासाठी पाणी आणलं. ते हसत होते. इतर रुग्णांना बघायला जाण्यासाठी तयार होत होते.

''डॉक्टर!''

''काय?''

''माझा पाय... मी अजूनही चालू शकेन ना?''

डॉक्टरांच्या चेहऱ्यावरचं हसू मावळलं. मला भीती वाटली. ते म्हणाले,

''तुझा माझ्यावर विश्वास आहे ना?''

''अगदी पूर्ण विश्वास आहे, डॉक्टर''

''ऐक तर मग. तू पंधरवड्यात पूर्णपणे बरा होशील. इतरांप्रमाणेच तूही चालू शकशील. तुझ्या तळपायात संपूर्ण पू भरला होता. आम्हाला ती सूज कापून काढावी लागली. तुझा पाय आम्ही कापलेला नाही. तुला दिसेलच तो. लवकरच तू हिंडाफिरायला लागशील.''

आता पंधरा दिवस प्रतीक्षा करणंच फक्त माझ्या हाती होतं.

माझ्या ऑपरेशननंतर दोन दिवसांनी तुरुंगात अफवा पसरली, की युद्धाची आघाडी आणखी जवळ सरकली आहे. लोक एकमेकांना सांगत होते, की रशियाची रेड आर्मी बुनाच्या दिशेनं कूच करत आहे आणि आता फक्त काही तासांचाच अवधी आहे.

आम्हाला अशा प्रकारच्या अफवांची सवय झाली होती. एखाद्या छोट्या प्रेषितानं पृथ्वीवरच्या शांततेचं भविष्य सांगण्याची ती काही पहिलीच वेळ नव्हती. आमच्या सुटकेसाठी रेड क्रॉसशी चाललेल्या वाटाघाटी...आणखी इतरही बऱ्याच अफवा. दरवेळी आम्ही या अफवांवर विश्वास ठेवला आणि आमच्या सुटकेसाठी स्वप्नं पाहिली. त्या अफवा म्हणजे आमच्यासाठी मॉर्फिनचं इंजेक्शन होतं.

पण यावेळी त्या कुणा अज्ञात प्रेषिताचं म्हणणं बरंच खरं असावं, असं वाटत होतं. कारण गेल्या काही रात्रींच्या नीरव वेळी आम्हाला त्या शांततेत बंदुकांचे-तोफांचे आवाज नेहमीपेक्षा जवळ ऐकू येत होते.

माझा बिन चेहऱ्याचा शेजारी म्हणाला,

"तू भलताच भ्रमात राहण्याचा वेडेपणा करू नकोस. हिटलरनं अगदी स्पष्ट सांगितलं आहे, की घड्याळात बाराचे ठोके पडण्यापूर्वी, ज्यूंनी शेवटचा ठोका ऐकण्यापूर्वीच तो सर्व ज्यूंचं शिरकाण करणार आहे."

मी कमालीचा भडकलो.

"तुम्हाला काय करायचं आहे त्याच्याशी? हिटलरला आपण अगदी प्रेषित मानलंच पाहिजे का?"

त्यानं विझलेल्या निस्तेज डोळ्यांनी माझ्याकडे पाहिलं. शेवटी तो थकलेल्या आवाजात म्हणाला,

"माझा इतर कोणाहीपेक्षा हिटरलच्या बोलण्यावर जास्त विश्वास आहे. तो एकच असा मनुष्य आहे, ज्यानं ज्यूंच्या बाबतीतली वचनं पाळली. स्वतःचे सगळे दिलेले शब्द पाळले."

त्याच दिवशी दुपारी चार वाजता नेहमीप्रमाणे घंटा वाजली



आणि तिचा हुकूम पाळून तुरुंगाचे सगळे विभागप्रमुख एकत्र जमले.

ते परत आले, ते उद्ध्वस्त होऊनच. त्यांच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता. 'छावणी लगेच रिकामी करायची आहे.' हे सांगायलाही त्याचं तोंड उघडत नव्हतं. सर्वांना ही जागा सोडून जायचे आदेश मिळाले होते. आम्हाला आघाडीपासून आणखी बरंच मागे पाठवण्यात येणार होते.

कुठं? दुसऱ्या कुठल्या तरी तुरुंगात. जर्मनीच्या आत अगदी गाभ्यापर्यंत कुठंतरी. जर्मनीत असलेल्या तुरुंगांना तोटा नव्हता.

"केव्हा?"

"उद्या संध्याकाळी."

"कदाचित रशियन सैन्य त्याआधी येईल."

"कदाचित."

पण आम्हाला पक्क ठाऊक होतं. रशियन सैन्य येणार नाही.

संपूर्ण छावणीत वेगानं हालचाली सुरू झाल्या. छावणी म्हणजे जणू मधमाश्यांचं पोळं बनलं होतं. लोक एकमेकांवर ओरडत इकडेतिकडे पळत होते. प्रत्येक इमारतीत, बराकीत पुढच्या प्रवासाची तयारी सुरू झाली होती. मी माझा दुखरा पाय विसरून गेलो होतो.

एक डॉक्टर खोलीत आले आणि त्यांनी जाहीर केलं,

"उद्या रात्र झाल्याबरोबर सगळी छावणी हलवली जाईल. एकामागून एक विभाग रिकामे होतील. रुग्णांनी मात्र इस्पितळातच थांबायचं आहे. त्यांना हलवण्यात येणार नाही."

या बातमीमुळं आम्ही विचारात पडलो. शेकडो कैद्यांना हॉस्पिटलच्या इमारतीत खुरडत खुरडत इकडून तिकडे चालण्यासाठी आणि सुटकेची व्यर्थ वाट बघत बसण्यासाठी नाझी अधिकारी सोडून

देणार होते का? की सगळ्या ज्यूंना ते बाराच्या ठोक्याच्या शेवटचा आवाज ऐकायला लावणार होते?

तो जर्जर रुग्ण म्हणाला,

"सगळ्या रोग्यांना एकदमच मारून टाकतील...आणि शेवटच्या तुकडीबरोबर दफनभूमीवर पाठवतील."

दुसरा रुग्ण म्हणाला,

"या छावणीत बॉम्ब पेरले असतील. ज्या क्षणी सगळी छावणी रिकामी होईल, त्या क्षणी ती बॉम्बनं उडवून दिली जाईल."

माझ्यापुरतं बोलायचं, तर मी मृत्यूचा विचार करत नव्हतो. माझ्या वडिलांपासून मी दूर जाऊ नये, एवढा एकच विचार त्यावेळी माझ्या मनात होता. आम्ही आधीच इतकं सोसलं होतं, इतकं दुःख पचवलं होतं, की ही वेळ आता दूर होण्याची नव्हती.

मी माझ्या वडिलांना शोधायला बाहेर पळालो.

बर्फ घट्ट जमला होता. इमारतींच्या खिडक्यांवर धुक्याचे जाड पडदे पडले होते.

मी एकाच पायात बूट घातला होता. ऑपरेशन झालेल्या उजव्या पायात बूट घालणं शक्यच नव्हतं. म्हणून मी तो हातात घेऊन पळत होतो. मला थंडी, वेदना कशाचीच जाणीव नव्हती.

"आपण काय करायचं?"मी विचारलं.

माझ्या वडिलांनी उत्तर दिलं नाही.

मी पुन्हा तोच प्रश्न विचारला.

ते विचारात गढून गेले होते. निर्णय आम्हाला घ्यायचा होता. आम्हीच आमचं नशीब ठरवणार होतो. आम्ही दोघंही हॉस्पिटलमध्ये राहू शकत होतो. तिथं त्या सज्जन डॉक्टरांच्या उपकारानं मी वडिलांना रुग्ण म्हणून किंवा परिचारक म्हणून प्रवेश मिळवून देऊ शकत होतो.



दुसरा पर्याय म्हणजे, तुरुंगातल्या सर्वांच्या बरोबर आम्हीही जायचं.

"सांगा ना, काय करायचं?"

तरी ते गप्पच होते.

"आपणही इतरांबरोबर जावं, हा तुरुंग सोडावा. हेच ठीक होईल, नाही का?" मीच त्यांना विचारलं.

त्यांनी माझ्या पायाकडे पाहिलं

"तुला वाटतं, तू चालू शकशील?"

"हो, चालू शकेन."

"एलीझर, आपल्या निर्णयाचा आपल्याला पश्चात्ताप होणार नाही, अशी आशा बाळगू या."

हॉस्पिटलमध्ये मागे राहिलेल्याचं काय झालं, ते मला युद्ध संपल्यावर कळलं. ते सुदैवी ठरले. छावणी रिकामी झाल्यावर रशियन सैन्यांनी त्यांची अलगद मुक्तता केली होती.

मी हॉस्पिटलमध्ये परत गेलो नाही. मी माझ्या बराकीत परतलो. माझी जखम उघडी होती आणि तिच्यातून रक्त वहात होतं. मी जिथून लंगडत चाललो, तिथला बर्फ लाल झाला होता.

विभागप्रमुखानं आम्हाला प्रवासासाठी पाव आणि मार्गारिनचे दुप्पट वाटे दिले. स्टोअरमधून आम्ही कितीही शर्टस् आणि इतर कपडे घेऊ शकत होतो.

भयंकर थंडी होती. आम्ही अंथरुणात शिरलो.

बुना इथली शेवटची रात्र. आणखी एक शेवटची रात्र! घरातली शेवटची रात्र, घेटोमधली, गाडीतली शेवटची रात्र.;.. आणि आता बुनाच्या छावणीतली शेवटची रात्र. आमची आयुष्यं अशी एका शेवटच्या रात्रीकडून दुसऱ्या शेवटच्या रात्रीकडे किती काळ खेचली जाणार आहेत?

मला मुळीच झोप लागली नाही. खिडक्यांच्या चौकटीतून येणारे लाल प्रकाशाचे विस्फोट दिसत होते. धडाधडा सुटणारे तोफगोळे रात्रीच्या शांततेला तडा पाडत होते. रशियन सैन्य किती जवळ आलं होतं! त्यांच्या आणि आमच्यामध्ये एक रात्र. आमची शेवटची रात्र. एका बिछान्यावरून दुसऱ्या बिछान्याकडे एकच कुजबुज पसरत होती– आपलं दैव जोरावर असावं. आणि छावणी रिकामी व्हायच्या आतच रशियन सैन्य इथं येऊन पोहोचावं. एकच आशा पुन्हा पुन्हा व्यक्त होत होती.

कोणीतरी ओरडलं,

"झोपायचा प्रयत्न करा. पुढच्या प्रवासासाठी तुमची शक्ती राखून ठेवा."

आम्ही घेटोत असताना आईनं हेच उपदेशाचे शेवटचे शब्द उच्चारले होते. त्यांची मला आठवण झाली.

पण मी झोपू शकलो नाही. माझा पाय जणू आग लागल्यासारखा ठणकत होता.

सकाळी छावणीचा चेहरामोहराच बदलून गेला होता. सगळीकडे निघायची घाई, गडबड, गोंधळ, प्रत्येकाने अंगावर चित्रवचित्र कपडे चढवले होते. जणू सगळे कैदी एखाद्या नृत्यासाठी तयार झाले होते. थंडीपासून बचाव व्हावा, म्हणून सगळ्यांनी एकावर एक असे अनेक पोशाख चढवले होते. बिचारे कैदी, उंचीपेक्षा त्यांचा आडवा आकार वाढला होता. ते जिवंत असल्यापेक्षा मेलेलेच जास्त वाटत होते. विदूषक! कैद्यांच्या कपड्यांच्या ढिगामधून दिसणारे त्यांचे भुतांसारखे चेहरे खरे विदूषक!

माझ्या मापापेक्षा बराच मोठा बूट शोधण्याचा मी प्रयत्न केला पण नाही मिळाला. मी ब्लँकेट फाडलं आणि माझ्या जखमी



पायाभोवती गुंडाळलं. नंतर मी छावणीत एक चक्कर टाकून आलो. कुठं जास्तीचा पाव आणि थोडे बटाटे मिळतात का, ते बघायला.

काही जण म्हणाले,

आम्हाला झेकोस्लोवाकियाला नेणार आहेत.

नाही, ग्रॉस रोझेनला नाही, ग्लीवित्झला.

नाही... ला. दुपारचे दोन वाजले. अद्यापही हिमवृष्टी चांगली जोरात होत होती. आता वेळ कसा भराभर जात होता.

संध्याकाळ झाली. करड्या रंगाच्या विविध छटांमध्ये दिवस लुप्त होत होता.

आमच्या विभागप्रमुखाच्या एकाएकी लक्षात आलं, की तो इमारत स्वच्छ करायला विसरला आहे. त्यानं चार कैद्यांना लाकडी तळभाग धुऊन काढायला सांगितलं. छावणी सोडायच्या एक तास आधी ही स्वच्छता कशासाठी? कोणासाठी?

"मुक्तिसैन्यासाठी." तो ओरडला, "त्यामुळं त्यांची खात्री पटेल, की इथं माणसंच राहत होती, डुकरं नव्हेत!"

म्हणजे आम्ही माणसं होतो?

सगळी इमारत तळापर्यंत स्वच्छ धुण्यात आली. कोनाकोपऱ्यातून आम्ही ती धुतली.

सहा वाजताच घंटा वाजली. मृत्युघंटा! दफन.

आमची तुकडी संचलन करीत निघायच्या तयारीत.

"रांगा करा, लवकर!"

काही क्षणातच आम्ही सगळे गटवार रांगा करून उभे राहिलो. रात्र झाली होती. आधीच आखलेल्या योजनेप्रमाणे सर्व काही व्यवस्थित सुरू होतं.

सर्चलाइट फिरायला लागले. अंधारातून शेकडो सहस्त्र नाझी

सैनिक उठले. त्यांच्याबरोबर अनेक प्रशिक्षित कुत्री होती. बर्फ पडणं थांबतच नव्हतं.

तुरुंगाचे दरवाजे उघडले गेले. त्यावेळी मला वाटलं, त्या दरवाज्यांच्या बाहेर याहीपेक्षा काळीकुट्ट काळरात्र आमची वाट बघत थांबली आहे.

सुरुवातीचे गट संचलन करत चालायला लागले. आम्ही थांबलो होतो. आमच्या पुढं छप्पन्न तुकड्या होत्या आणि त्या सगळ्या जाईपर्यंत आम्हाला थांबण भाग होतं.

मरणाची थंडी पडली होती. माझ्या खिशात पावाचे दोन तुकडे होते. एरव्ही किती आनंदानं मी ते खाल्ले असते! पण आता मला ते खायला परवानगी नव्हती. निदान यावेळी तरी नाही.

आमची पाळी येत होती. गट नं. ५३..

गट नं. ५५..

गट नं. ५७, पुढं सरका.

बर्फवृष्टी सतत चालूच होती.

■■■



# सहा

बर्फाळ वारे तुफान वेगानं वाहात होते. त्यांच्यात वादळी विध्वंस भरला होता. पण आम्ही न थांबता संचलन करत पुढं जातच होतो.

नाझी सैनिक आम्हाला चालण्याचा वेग वाढवायला लावत होते.

''जरा वेगानं चाला,डुकरांनो! कुत्र्याची गलिच्छ अवलाद!''

आम्ही आणखी भरभर पावलं उचलत होतो. त्या जलद हालचालींमुळे आमच्या शरीरात थोडी ऊब आली. आमच्या नसांमधून रक्त अधिक मोकळेपणानं वाहायला लागलं. आम्हाला वाटत होतं, आम्ही स्वत:ला पुन्हा जिवंत करत आहोत.

''कुत्र्यांची मठ्ठ अवलाद! जरा भराभर चालायला काय घ्याल?''

आम्ही आता संचलन करत नव्हतोच. आम्ही पळतच होतो. जणू आपोआप चालणारी मनुष्यांसारखी यत्रंच!

नाझी सैनिकही आमच्याबरोबर धावत होते. त्यांची शस्त्र त्यांच्या हातात होती. त्यांच्यापुढून आम्ही जणू पळ काढत आहोत,

असं ते दृष्य दिसत होतं.

मिट्ट अंधार. रात्रीच्या अंधारात वरचेवर होणारा बंदुकीचा गोळीबार. जो कैदी सर्वांच्या बरोबर चालू शकणार नाही, त्याला गोळी घालण्याचे हुकूम नाझी सैनिकांना मिळाले होते. त्यामुळं त्यांची बोटं बंदुकीच्या चापांवर तयार! एवढ्या मोठ्या आनंदापासून स्वत:ला वंचित करायची त्यांची तयारी नव्हती! आमच्यापैकी एखादा जरी क्षणभरही थांबला, तरी बंदुकीतून सणाणत येणारी गोळी त्या कुत्र्याच्या संतानाला ताबडतोब खतम करत असे.

मी यांत्रिकपणे पावलापुढं दुसरं पाऊल टाकत होतो. मी माझ्याबरोबर माझ्या अस्थिपंजर शरीराला खेचून फरफटत घेऊन चाललो होतो. आता त्या शरीराचं वजनही असं कितीसं उरलं होतं? पण मला सारखं वाटत होतं, या शरीरापासून सुटका मिळाली, तर किती बरं होईल! सर्व दु:खाचं मूळ हे शरीरच आहे. मी त्या शरीराचा विचारच करायचा नाही, असं कितीही ठरवलं, तरी माझं अस्तित्व मला उघड उघड दोन वस्तूंमध्ये जाणवायला लागलं. शरीर आणि मी. मला तिरस्कार वाटायला लागला.

मी वारंवार स्वत:ला बजावत होतो.

विचार करू नकोस, थांबू नकोस, पळ.

माझ्या मागे-पुढं, आजूबाजूला बंदुकीच्या गोळ्यांनी घाणेरड्या बर्फात माणसं पटापट कोसळून पडत होती.

माझ्या बाजूनं एक लहान पोलिश मुलगा पळत होता. त्याचं नाव झॅमलन. तो बुना इथं विद्युत गोदामात काम करत होता. तिथं लोक त्याला हसायचे. कारण तो नेहमी प्रार्थना करत असायचा किंवा 'तालमुड'च्या एखाद्या समस्येचं चिंतन करत असायचा. कठोर वास्तवापासून दूर जाण्याचा त्याचा तो मार्ग होता. मिळणारा मार सुसह्य



करण्याचा मार्ग....

त्याच्या पोटात एकाएकी तीव्र कळा यायला लागल्या. 'माझ्या पोटात फार दुखतंय्!'तो माझ्या कानाशी कुजबुजला. त्याला चालणं अशक्य झालं. त्याला क्षणभर थांबावं लागलं. मी त्याला कळवळून म्हणालो,

''थोडी कळ सोस, झॅमलन. थांबू नकोस आपण लवकरच मुक्कामाला पोहोचू. आपण काही जगाच्या अंतापर्यंत असंच पळणार नाही आहोत.''

तो पळायला तर लागला, पण त्यानं बटनं काढायला सुरूवात केली. रडत रडत तो म्हणाला,

''मी आता मुळीच, एक पाऊलही चालू शकत नाही. माझं पोट वेदनांनी फुटेल, असं वाटतं.''

''प्रयत्न कर, झॅमलन, थोडे श्रम घे.''

तो अतीव विव्हळत म्हणाला,

''मी नाही चालू शकत.''

त्यानं त्याची पॅन्ट खाली केली आणि तो खाली बसला. बसला, कसला जवळ जवळ कोसळलाच.

ते त्याचं शेवटचं दर्शन. माझ्या स्मृतीत त्याचं ते शेवटचं चित्र आहे. मला वाटत नाही, नाझी सैनिकांच्या बंदुकींनी त्याला टिपलं असेल. मागाहून येणाऱ्या हजारो कैद्यांच्या वेगवान पायांखाली तो तुडवला जाऊनच मेला असेल!

मी झटकन त्याचा विचार मनातून काढून टाकला. मी पुन्हा स्वत:चा विचार करायला लागलो. माझा पाय कमालीचा ठणकत होता. प्रत्येक पावलागणिक एक जीवघेणी कळ माझ्या मस्तकात भिनत होती.

"आणखी थोडंसंच अंतर.." मी विचार केला, "अजून थोडं अंतर मी चालू शकेन आणि मग माझी शक्ती पूर्ण संपेल. मी खाली कोसळेन. मग कुठूनतरी बंदुकीची गोळी येईल. लाल ज्वाळेचा उद्रेक!"

माझा जीव गुदमरून जाईपर्यंत मृत्यू आपले पाश माझ्याभोवती घट्ट आवळत होता. तो मला चिकटूनच बसला होता. मला वाटलं, मी मृत्यूला सहज स्पर्श करू शकतोय. मरणाची कल्पना. काही वेळानंतर आपण जिवंत नसण्याचा विचार मला आकर्षित करायला लागला. काही क्षणातच आपलं अस्तित्व संपणार. मग या पायाच्या असह्य, भयंकर वेदनाही संपून जातील. त्या जाणवणारही नाहीत. कशाचीच जाणीव उरणार नाही. थकवा, गारठा, कशाचीच नाही. बस्स, रांग मोडून बाहेर यायचं आणि रस्त्याच्या कडेला पडायचं..पुढचं सगळं आपोआप घडेल..

पण हे सगळं करण्यापासून मला परावृत्त करत होतं माझ्या वडिलांचं सान्निध्य. ते माझ्या बाजूनंच धावत होते. असेल-नसेल, तेवढं बळ पणाला लावून. त्यांची शक्ती संपायला आली होती. त्यांना श्वासही घेता येत नव्हता. ते धापा टाकत होते. त्यांचं सगळं धैर्य, सगळं मनोबळ संपल होतं. मला स्वत:ला मरू द्यायचा मला काहीही अधिकार नव्हता. निदान माझ्या वडिलांसाठी तरी. मी मेलो, तर माझ्याशिवाय ते काय करतील? कसे जगतील? मीच त्यांचा एकमेव आधार होतो.

मी विचारांमध्ये किंचित वेळ निघून गेला. अवधी, अवकाश, काळ यांचा अति लहानसा तुकडा. या काळात माझं पळणं सुरूच होतं. पण माझ्या ठणकणाऱ्या पायाची जाणीव नष्ट झाली होती. किंबहुना मी पळतोय, याचीही जाणीव मला नव्हती. हजारो इतर कैद्यांच्या बरोबरीनं घौडदौड करणारं एक शरीर माझ्याजवळ आहे,



यांचीही जाण माझ्या मनातून निघून गेली होती.

पण मला जेव्हा परत माझं भान आलं, तेव्हा मी माझी गती कमी करण्याचा प्रयत्न केला. पण ते करणं शक्यच नव्हतं. कारण मागून येणाऱ्या, पुढं पुढं धावणाऱ्या माणसांच्या प्रचंड भरतीच्या लाटाखाली मी मुंगीसारखा चिरडून गेलो असतो.

मी फक्त झोपेत चालत होतो. मी माझे डोळे मिटले आणि झोपेत असल्यासारखा पळायला लागलो. वरचेवर मागून कोणीतरी मला जोरात धक्का मारत होतं आणि मला जाग येत होती. मागचा ओरडायचा.

"जोरात पळ, तू पळू शकत नसशील, तर मागच्यांना पुढं जाऊ दे."

मग मी फक्त डोळे क्षणभर बंद करून घ्यायचो आणि माझ्या समोरून संपूर्ण जग तिथून जाताना बघायचो. संपूर्ण आयुष्याचं स्वप्न बघायचो.

न संपणारा रस्ता. मोठ्या समुदायाकडून पुढं पुढं ढकललं जाणं. अंध नियतीकडून कुठंतरी खेचत नेलं जाणं. नाझी सैनिक जेव्हा थकले, तेव्हा त्यांच्या जागी दुसरे आले. पण आम्हाला कोणीही बदललं नाही! आम्ही तेच होतो. आमचे अवयव थंडीमुळं बधिर झालेले, त्यात पुन्हा पळणं, आमचे घसे तहानेनं कोरडे झालेले, भुकेनं व्याकूळ झालेलं, श्वासही घेणं अशक्य झालेलं. आम्ही पुढं जातच होतो.

आम्ही निसर्गाचे, जगाचे स्वामी होतो, आम्ही सर्व काही विसरलो होतो. मृत्यू, थकवा, आमच्या नैसर्गिक गरजा-सारं काही. थंडी आणि भुकेपेक्षाही शक्तिवान, बंदुकीच्या गोळ्या आणि मृत्यूच्या इच्छेपेक्षाही बलवान, आम्ही! सगळ्यांनी धिक्कारलेले आणि सतत भटकणारे, केवळ नंबर! संपूर्ण पृथ्वीवर अशी माणसं फक्त आम्हीच

होतो.

शेवटी आकाशात पहाटवारा उगवला. क्षितिजावर कळत न कळत प्रकाशाची किरणं उगवली. आम्ही फार थकून गेलो होतो. आमच्यातली शक्ती नष्ट झाली होती. आता आम्ही कोणत्याही भ्रमात नव्हतो.

सेनाधिपतीन घोषित केलं, की रात्री निघाल्यापासून आम्ही बेचाळीस मैल अंतर कापलं होतं. थकव्याची परिसीमाही आम्ही केव्हाच ओलांडली होती! आमचे पाय यंत्रवत रस्ता कापत होते. आमच्याशिवाय आमच्यासह!

आम्ही एक निर्जन खेड्यातून गेलो. एकही जिवंत व्यक्ती नाही, कुत्र्याचं भुंकणंसुद्धा नाही. खिडक्या सताड उघड्या असलेली घरं. त्या रिकाम्या घरांमध्ये लपण्याचा प्रयत्न करण्यासाठी काहीजण रांगेतून हळूच बाहेर सटकले.

आणखी एक तास संचलन केल्यावर आम्हाला विश्रांती घेण्याचा आदेश देण्यात आला.

आम्ही सगळ्यांनी एकदमच बर्फात बसकण मारली. आमची ती कृती इतकी एकाच वेळी झाली, की हजारो माणसं बसूनही वाटलं, एकच महाकाय माणूस बसला!

माझ्या वडिलांनी मला हलवलं,

''इथं नको, उठं थोडं पुढं जाऊ. तिथं निवारा आहे. चल.''

माझ्यात उठायची ताकदही नव्हती अन् इच्छाही नव्हती. तथापि, मी त्यांचं म्हणणं ऐकलं. पण तो निवारा नव्हता. तो एक विटांचा कारखाना होता. खोदून काढलेलं छप्पर आणि मोडलेल्या खिडक्या. भिंती धुरकटून काळ्या पडलेल्या. आत प्रवेश मिळवणं सोपं नव्हतं. कारण आत जाण्यासाठी शेकडो कैद्यांची दाराशी एकच



झुंबड उडाली होती.

शेवटी आत घुसण्यात आम्हाला यश मिळालं. आतही घट्ट बर्फ साचला होता. मी तिथंच धडपडत बसलो. खरोखर त्यावेळी मात्र मला थकवा जाणवला. बर्फ मला एखाद्या गालिच्याप्रमाणे वाटला, अतिशय मुलायम, उबदार, मी झोपी गेलो.

मी किती वेळ झोपलो, कुणास ठाऊक. काही क्षण, की काही तास? मला जाग आली, तेव्हा माझ्या गालांना बर्फासारख्या गारठलेल्या हाताचा स्पर्श जाणवला. मी मोठ्या कष्टानं माझे डोळे उघडले. ते माझे वडील होते.

एका रात्रीतच परवाच्या रात्रीपेक्षा ते किती म्हातारे झाले होते! त्यांचं शरीर पूर्णपणे वाकडं झालं होतं. थंडीमुळं अतिशय कोरडं पडून त्यावर वळ्या पडल्या होत्या. त्यांचे डोळे गोठून दगडासारखे निर्जीव झाले होते. त्यांचे ओठ वाळून, शुष्क होऊन जागोजाग उलले होते. त्यांच्या शरीराचा अणुरेणू कमालीच्या शिणवट्याची साक्ष देत होता. त्यांचा आवाज अश्रूंनी भिजला होता.

एलीझर, झोपेच्या इतका आहारी जाऊ नकोस. असं बर्फावर झोपणं धोक्याचं आहे. यापेक्षा चांगल्या अवस्थेत तू झोपू शकशील. उठ, बाळा, चल.

उठू? कसा ऊठू? या मऊ बिछान्यातून मी कसा बाहेर येऊ? माझे वडील काय बोलत होते, ते मला ऐकू येत होतं. पण मला त्याचा अर्थच कळत नव्हता. जणू काही त्यांनी मला उठायला सांगितलं, म्हणजे संपूर्ण इमारतच माझ्या हातावर उचलायला सांगितली होती!

''ऊठ बाळा, ऊठ''

मी उठलो. दात-ओठ आवळून मोठ्या कष्टानं उठलो. त्यांनी त्यांच्या बाहूंचा आधार मला दिला व ते मला बाहेर घेऊन गेले. ते महाकठीण

कर्म होतं. आत शिरणं जेवढं अवघड, तेवढंच बाहेर पडणंही अवघड होतं. आमच्या पायांखाली माणसं तुडवली जात होती. चिरडली जाऊन मरत होती. कोणालाही त्याचं भान नव्हतं.

एकदाचे आम्ही बाहेर आलो. बाहेर येताच बर्फगार वाऱ्याची माझ्या चेहऱ्याला जोरदार चपक बसली. माझे ओठ गोठून जाऊ नयेत, म्हणून मी सतत चावत होतो. माझ्या भोवताली प्रत्येक वस्तू मृत्यूचं नृत्य करत होती. ते पाहून माझं डोकं गरगरलं. मी एका दफनभूमीतून चाललो होतो. आजूबाजूला ताठ झालेली प्रेतं. जणू लाकडाचे ओंडकेच. कुठं निराशेचं रडणं नाही, की दु:खाचं आक्रंदन नाही. केवळ शांततेतली एक प्रचंड वेदना. कोणीही कोणाला मदत मागत नव्हतं. तुम्ही मेलात, कारण तुम्हाला मरणं भाग होतं. त्याविषयी वायफळ बडबड नव्हती.

प्रत्येक ताठ प्रेतात मी स्वत:ला पाहिलं.आणखी थोड्याच वेळानं तर मी त्यांना पाहूही शकणार नाही, मी त्यांच्यातलाच एक झालेला असेन. फक्त काही तासांचा प्रश्न होता.

''चला, आपण त्या निवाऱ्यातच परत जाऊ या.''

त्यांनी उत्तर दिलं नाही. ते मृतांकडे बघत नव्हते.

''चला तिकडेच. तिथं आपण आळीपाळीनं जरा पडू तरी शकतो. मी तुमच्याकडे लक्ष देईन, मग तुम्ही माझ्याकडे लक्ष द्या. आपण एकमेकांना एकाच वेळी झोपू देणार नाही. आपण एकमेकांची काळजी घेऊ.''

त्यांना ते पटलं. जिवंत आणि मेलेली शरीरं तुडवत आम्ही पुन्हा त्या जागी प्रवेश मिळवला. स्वत:ला खाली झोकून दिलं.

''घाबरू नकोस, बाळा तू झोप. तू झोपू शकतोस. मला झोपच येत नाही. मी स्वत: तुझ्यावर लक्ष ठेवेन. कोणी तुला तुडवणार



नाही.''

''नाही, आधी तुम्ही झोपा.''

त्यांनी नकार दिला. त्यांनी जबरदस्तीनं मला निजवायचा प्रयत्न केला. लहानशी डुलकी तरी यावी, म्हणून, पण व्यर्थ. काही क्षणांच्या निद्रेसाठी मी वाटेल ते करायला तयार झालो असतो. पण तरीही आत खोल कुठंतरी मला वाटत होतं, की आता झोपणं,म्हणजे मरण ओढवून घेणं. माझ्या आतलं काहीतरी अशा मरणाविरुद्ध बंड करून उठलं. माझ्या अवतीभोवती मृत्यू वावरत होता, तो हळूहळू शांतपणे पुढं सरकत होता. हिंसक क्लेश न देता. तो झोपलेल्या काही शरीराचा ताबा घेईल, त्या शरीरांमध्ये हळूच प्रवेश करील आणि ते शरीर कणाकणानं अचेतन, निष्प्राण करून टाकेल. माझ्या बाजूलाच एक जण शेजारच्याला उठवायचा प्रयत्न करत होता. कदाचित तो झोपलेला त्याचा भाऊ असेल, किंवा मित्र असेल. पण त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. शेवटी हताश होऊन तोही त्या प्रेताशेजारी लवंडला आणि झोपी गेला. त्याला उठवणार कोण होतं? माझा हात लांबून मी त्याला स्पर्श केला.

''ऊठ, जागा हो. तू इथं झोपू नकोस.''

त्यानं डोळे अर्धवट उघडले. क्षीण आवाजात तो म्हणाला,

''मला सल्ला नको आहे. मी फार थकलो आहे. मला एकट्यालाच पडू दे. एकट्यालाच.''

माझे वडीलही हलकीशी डुलकी घेत होते. मला त्यांचे डोळे दिसत नव्हते. त्यांची टोपी त्यांच्या चेहऱ्यावर आली होती.

''जागे व्हा.''मी त्यांच्या कानात कुजबुजलो.

ते दचकून जागे झाले. ते उठून बसले आणि आजूबाजूला बघायला लागले. त्यांची दृष्टी गोंधळलेली, भांबावलेली,

गुंगल्यासारखी आणि सर्वस्व हिरावल्यासारखी होती. त्यांनी गोलाकार मान फिरवून सगळीकडे पाहिलं. जणू एकाएकी त्यांनी या विश्वाचा शोध घ्यायचं ठरवलं होतं. आपण नक्की कुठं, का आणि कोणत्या जागी आहोत, हे त्यांना शोधायचं होतं, आणि ते मग ते हसले.

मी त्यांचं ते हसणं कधीही विसरणार नाही, ते हसू कोणत्या जगातून आलं होत?

बर्फ जाड जाड चकत्यांनी आजूबाजूला प्रेतांवर पडतच होता.

त्या जागेचं दार उघडलं गेलं. एक वृद्ध माणूस दारात उभा होता. त्यांच्या मिशांवर बर्फ साचला होता. त्याचे ओठ थंडीमुळे निळे पडले होते. ते इलियाहो धर्मगुरू होते. पोलंडच्या एका लहानशा जमातीचे धर्मगरू. ते फार चांगले होते. छावणीतल्या प्रत्येकाचं त्यांच्यावर प्रेम होतं. कापो आणि विभागप्रमुखही त्यांना मानायचे. अन्नवस्त्राविना आणि उपासमार सोसूनही त्यांचा चेहरा आत्मशुद्धीच्या तेजानं चमकत होता. ते एकच असे धर्मगुरू होते, की ज्यांना बुना इथं 'धर्मगुरू'असं म्हटलं जात होतं. लोकांना धीर द्यायला, लोकांचं सांत्वन करायला ते एखाद्या वृद्ध प्रेषिताप्रमाणे सदैव लोकांच्या मध्यभागी असत. आश्चर्य म्हणजे, त्यांच्या सांत्वनाच्या शब्दांमुळं बंडखोर कधीही चिथावले जात नसत, उलट, त्यांना खरोखर मन:शांती मिळत असे.

ते आत आले. त्यांचे डोळे नेहमीपेक्षा तेजस्वी होते. ते कोणाला तरी शोधत होते.

''कोणी माझ्या मुलाला पाहिलं का?''

गर्दीत त्यांचा मुलगा हरवला होता. मरायला टेकलेल्या लोकांमध्ये त्यांनी मुलाला शोधलं. नंतर त्यांनी प्रेतांवरचा बर्फ खरडून मुलाला शोधलं. पण काही हाती लागलं नाही.



तीन वर्षे ते दोघं एकमेकांना चिकटून होते. नेहमीच एकमेकांच्या जवळ. यातनांच्या प्रसंगी, मार खाताना, पावाचा वाटा घेताना, प्रार्थनेच्या वेळी. तीन वर्षे एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात, एका निवडीतून दुसऱ्या निवडीकडे..आणि आता जेव्हा या यातनामय कालखंडाचा शेवट जवळ आला होता, तेव्हा नशिबानं दोघांची ताटातूट केली होती.

माझ्याजवळ येत ते म्हणाले,

''रात्रीच्या प्रवासातच आमची चुकामूक झाली. मी चालता चालता जरा मागे पडलो. जोरात पळायची ताकद माझ्यात नव्हती आणि हे माझ्या मुलाच्या काही लक्षात आलं नाही. बस्स, मी मागे पडलो, एवढंच मला आठवतं. तो कुठं नाहीसा झाला? आता मी त्याला कुठं शोधू? तू कदाचित त्याला कुठंतरी पाहिलं असशील.''

''नाही, मला तो दिसला नाही.''

ते आले, तसे बाहेर निघून गेले. वाऱ्यानं वाहून नेलेल्या सावलीसारखे.

ते दारातून बाहेर पडले आणि अचानक मला आठवलं. काल रात्री त्यांचा मुलगा माझ्या शेजारूनच धावत होता. मी ते धर्मगुरूंना सांगितलं नाही. कारण मी ते विसरूनच गेलो होतो.

मग मला आणखी काही आठवलं. आपल्या वडिलांचा जमिनीचा आधार सुटतोय, ते लटपटताहेत, गर्दीच्या मागे पडताहेत, हे त्यानं पाहिलं होतं. पण त्यानं गर्दीच्या आघाडीवर राहून धावणं चालूच ठेवलं होतं. दोघांमधलं अंतर वाढू दिलं होतं.

एक भयंकर विचार माझ्या मनात तरारून आला. त्याला त्याच्या वडिलांपासून स्वत:ची सुटका करून घ्यायची होती! त्याला कळलं होतं, की त्याचे वडील अशक्त होत चालले आहेत. त्यांचा

शेवट जवळ आला आहे. त्यांच्या ओझ्यापासून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी त्यानं सहज घडून येणारी ताटातूट स्वीकारली. त्याची जिवंत राहण्याची संधी कमी करणारा तो वडिलांचा भार दूर करून त्याला स्वतःला त्यापासून मुक्त व्हायचं होतं.

मी त्याला विसरलो, हे चांगलंच झालं. धर्मगुरू इलियाहो यांनी असंच आपल्या लाडक्या मुलाला शोधत फिरावं, यातच मला आनंद होता.

माझ्याही नकळत माझ्या हृदयातून एक प्रार्थना ओठांवर आली. ज्या देवावर आता माझा विश्वास उरला नव्हता, त्या देवाला प्रार्थना!

"देवा! हे विश्वाच्या स्वामी! धर्मगुरू इलियाहोच्या मुलांनं जे केलं, ते माझ्या हातून कधीही घडू देऊ नकोस. तेवढं बळ मला दे."

बाहेर आवारात नाझी सैनिकांनी आरोळ्या ठोकल्या.

अंधार पडला होता.

त्यांनी आम्हाला पुन्हा रांगा करायचा हुकूम सोडला.

पुन्हा संचलन सुरू झालं. मेलेले लोक आवारातच बर्फाखाली पडून होते. हत्या झालेल्या निष्ठावंत रक्षकांप्रमाणे. दफनाशिवायच. त्या मृतांसाठी तिथं कुणीही प्रार्थना म्हटली नाही. पुत्रांनी पित्यांची कलेवरं एकही अश्रू न ढळता तिथंच टाकून दिली.

रस्ताभर अखंडपणे बर्फ आणि बर्फच पडत होतं. त्या बर्फ पडण्याला अंतच नव्हता. आम्ही यावेळी जरा सावकाश चालत होतो. नाझी सैनिक स्वतःच थकल्यासारखे दिसत होते. माझा जखमी पाय आता वेदनाही न जाणवण्याइतपत बधिर झाला होता. तो नक्कीच पूर्णपणे गोठून गेला असावा. जणू मला एक पाय नव्हताच. हरवला होता. एखाद्या गाडीच्या चाकाप्रमाणे माझ्या पायानं स्वतःला माझ्यापासून अलग करून



घेतलं होतं. फार वाईट. मी स्वतःशीच मान्य करून टाकलं, की मला यापुढं एकाच पायानं राहावं लागणार आहे. त्याविषयी विचार न करणंच योग्य होतं. निदान या क्षणी तरी पुढच्या काळासाठी विचार राखून ठेवायला हवेत.

यावेळी आमच्या संचलनाची सगळी शिस्त मोडून पडली होती. जसं वाटेल तसं, जसं जमेल तसं आम्ही पुढं सरकत होतो. आम्हाला आता बंदुकांचे आवाज ऐकू येत नव्हते. नाझी सैनिकही नक्कीच थकले असावेत. कारण त्यांची आम्हाला होणारी मारझोड, शिवीगाळ थांबली होती.

पण मृत्यूला त्यांच्या मदतीची गरज नव्हती. थंडी तिचं काम इमानेइतबारे करत होती. प्रत्येक पावलागणिक कोणीतरी कोसळून पडत होतं आणि त्याची छळातून सुटका होत होती.वेळोवेळी काही नाझी सैनिक मोटारसायकलवरून संपूर्ण रांग ओलांडून रांगेच्या शेवटच्या टोकापर्यंत जात होते आणि आम्हाला आमच्या वाढत्या शारीरिक-मानसिक ग्लानीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत होते.

"चालत राहा! आपण लवकरच आता तिथं पोहोचणार आहोत."

"आपण आता ग्लीवित्झच्या जवळ आलो आहोत."

हे प्रोत्साहनपर शब्द आमच्या मारेकऱ्यांच्या तोंडून बाहेर पडत होते, तरीही त्या शब्दांचा आमच्यावर चांगला परिणाम होत होता. आता चालणं सोडून द्यायची कोणाचीच इच्छा नव्हती. शेवट इतका दृष्टिपथात आला असताना, ध्येयाच्या इतकं जवळ आलं असताना! आमचे डोळे क्षितिजावर ग्लीवित्झ छावणीचं काटेरी ताराचं कुंपण शोधतं होते. तिथं लवकरात लवकर पोहोचावं, एवढी आमची एकच इच्छा होती.

रात्र आता बरीच चढली होती. बर्फ पडायचं थांबलं होतं. मुक्कामाला येण्यापूर्वी आम्ही अनेक तास चाललो होतो.

काही कापोजूनी आम्हाला भराभर बराकींमध्ये कोंबलं. आम्ही एकमेकांवर आदळलो, धडपडलो. जणू हा सर्वश्रेष्ठ, उच्चतम आश्रय होता. जीवनाचं महाद्वार! आम्ही वेदनांनी आधीच पिळवटणाऱ्या इतरांच्या शरीरावरून चालत गेलो. आम्ही जखमी चेहरे पायांनी तुडवले. रडणं नाही, फक्त काही विव्हळले. आत घुसणाऱ्या माणसांच्या वेगवान लोंढ्यामुळं  मी व माझे वडील जमिनीवर फेकले गेलो. आमच्या पायाखाली कोणीतरी जिवाच्या आकांतानं  कळवळलं.

''तुम्ही मला चिरडता आहात. माझ्यावर दया करा!''

हा आवाज माझ्या ओळखीचा होता.

''तुमच्या पायांखाली मी चिरडला जातोय.''

पुन्हा तो क्षीण आवाज. तेच घाईघाईनं बोलणं. हे पूर्वी कुठंतरी ऐकलं आहे. हा आवाज एक दिवस माझ्याशी बोलला होता. केव्हा? कुठं? अनेक वर्षांपूर्वी? नाही, नक्कीच मी हा आवाज छावणीतच ऐकला होता.

तो पुन्हा विव्हळला.

मी त्याला तुडवतोय, हे मला जाणवलं. माझ्या ओझ्यामुळे त्याला श्वास घेता येता नव्हता. मला उठावंसं वाटत होतं. मी धडपडत स्वतःला सोडवून उठण्याचा प्रयत्न केला. म्हणजे तरी त्याला श्वास घेता येईल. पण मी स्वतःच इतर शरीरांच्या ओझ्याखाली दबलो होतो. मलाही श्वास घेता येईना. मी माझ्यावरच्या चेहऱ्यांना नखांनी ओरबाडलं. जरा तरी मोकळी हवा मिळावी, म्हणून मी आजूबाजूला सगळीकडे ओरबाडत सुटलो. कोणीही रडलं-ओरडलं नाही.

अचानक मला आठवलं, माझ्या अंगाखालचा ज्युलीक तर



नसेल? वॉर्साहून आलेला मुलगा, बुनाच्या बँड पथकात व्हायोलिन वाजवणारा.

''ज्युलीकच आहेस ना, रे, तू?''

''एलीझर...''तो कसंबसं म्हणाला,

''हं, आठवलं मला. चाबकाचे पंचवीस फटके खाणारा.''

तो गप्प झाला. क्षणांची एक मालिका निघून गेली.

''ज्युलीक, माझं बोलणं तुला ऐकू येतं?''

''हो.''तो अतिशय खोल गेलेल्या आवाजात म्हणाला.

मला त्याच्या उत्तरापेक्षाही तो जिवंत आहे, तो बोलू शकतो, हेच जास्त महत्त्वाचं वाटत होतं.

''एलीझर, मला श्वास घ्यायला जराही हवा मिळत नाहीये. मी फार थकलो आहे. माझे पाय सुजले आहेत. विश्रांती घ्यावीशी वाटते. माझं व्हायोलिन कुठं आहे?''

मला वाटलं, त्याच्या मनावरचा ताबा सुटत होता. आता इथं त्याला व्हायोलिन  कशाला हवं?

''तुझं व्हायोलिन?''मी उगाचच विचारलं.

त्याला धाप लागली होती.

''मला भीती वाटते, लोक माझं व्हायोलिन तोडून टाकतील. मी ते इथं आणलं होतं.''

यावर मी काहीही बोललो नाही. कोणीतरी माझ्या तोंडावर पूर्णपणे आडवं पडलं होतं. मला श्वास घेणंही कठीण होतं. माझ्या कपाळावर घामाचे थेंब जमा झाले आणि त्याची धार मानेकडे ओघळली. बस्स, हाच शेवट होता. रस्त्याच्या शेवट. शांतपणे आलेला मृत्यू. गुदमरून गेलेला प्राण. रडायला, ओरडायला किंवा मदतीसाठी हाक मारायला मार्गच मोकळा नव्हता.

मी माझ्या अदृश्य मारेकऱ्यापासून सुटका करून घ्यायचा प्रयत्न केला. जगण्याची सगळी दुर्दम्य इच्छा माझ्या नखांमध्ये एकवटली. मी त्याला बोचकारल. घोटभर हवेसाठी मी अक्षरशः युद्ध पुकारलं. माझी नखं कुणाच्या तरी कुजणाऱ्या मांसात घुसली. तिथून काय प्रतिसाद मिळणार? माझ्या छातीवर पडलेल्या भयंकर ओझ्यापासून मी सुटका करून घेऊ शकलो नाही. मी ज्या माणसांशी संघर्ष करत होतो, तो मेलेला होता का? कुणास ठाऊक.

मला ते कधीच कळणार नाही. शेवटी मी जिंकलो, एवढंच मी सांगू शकेन. मरणाऱ्या माणसांच्या भिंतीला शेवटी मी एक छिद्र पाडू शकलो. ज्यातून जराशी हवा पिऊन घेता येईल, असं लहानसं छिद्र.

मला जरासं बोलता आल्याबरोबर मी ओरडून वडिलांना विचारलं,

''तुम्ही कसे आहात?''

त्या बराकीत माझे वडील आहेत, की नाहीत, असल्यास कुठं, मला काहीच माहीत नव्हतं. मी अंदाजानं आवाज दिला.

''ठीक आहे.''दुरून एका आवाजानं उत्तर दिलं. तो आवाज दुसऱ्याच जगातून आल्यासारखा वाटत होता.

मी झोपायचा प्रयत्न केला. वडिलांनीही झोपायचा प्रयत्न केला. आमचं या वेळी झोपणं योग्य होतं, की नव्हतं? अशा जागी अशा वेळी कोणी झोपू शकेल का? आमचा जागता पहारा, क्षणभरासाठी का होईना, काढून घेणं या वेळी धोक्याचं नव्हतं का? मृत्यू दबा धरून बसला असताना, तो कोणत्याही क्षणी आमच्यावर झडप घालायला टपला असताना झोपायचं?

मी हा विचार करत असतानाच माझ्या कानांवर व्हायोलिनचे



सूर आले. अशा अंधाऱ्या कोंदट जागी, जिथं जिवंत माणसांवर मेलेल्या माणसांचे ढीग पडले आहेत, तिथं व्हायोलिचे सूर? स्वतःच्या थडग्याच्या खड्ड्याच्या काठावर बसून कोण वेडा माणूस इथं व्हायोलिन वाजवतो आहे? की मलाच काही भ्रम होतोय?

तो ज्युलीकच असला पाहिजे.

त्यानं बीथोवनच्या रचनेचा एक तुकडा वाजवला. मी इतके शुद्ध सूर पूर्वी कधी ऐकले नव्हते. तेही अशा कमालीच्या शांततेत.

मिट्ट काळोख होता. मला फक्त व्हायोलिन ऐकू येत होतं. जणू ज्युलीकचा आत्माच बोलता झाला होता. त्यावर त्याच्या आयुष्याची धून वाजवत होता. त्याचं सगळं आयुष्य व्हायोलिनच्या तारांवरून घरंगळत जात होतं. त्याच्या हरवलेल्या आशा, जळून खाक झालेला भूतकाळ, त्याचा विझलेला भविष्यकाळ. यानंतर आपण पुन्हा कधीही विसरणार नाही, अशा तऱ्हेनंच तो वाजवत होता.

मी ज्युलीकला कधीही विसरणार नाही. त्यानं मृत आणि मरू घातलेल्या श्रोत्यांसमोर सादर केलेला तो संगीत जलसा मी कसा विसरू शकेन?

आजही कोणी बीथोवनची रचना वाजवताना मी ऐकलं, की माझे डोळे आपोआप मिटतात. डोळ्यांपुढच्या अंधारातून माझ्या त्या पोलिश मित्राचा दुःखी, फिकट चेहरा वर येतो. त्यानं मरणाऱ्या माणसांना त्याच्या व्हायोलिनवर शेवटचा निरोप दिला होता.

किती वेळ तो वाजवत होता, कोण जाणे. माझ्यावर गाढ निद्रेचा अंमल चढला.

जेव्हा मी उठलो, तेव्हा सकाळ झाली होती. त्या उजेडात मला माझ्या शेजारी ज्युलीक पडलेला दिसला. मेलेला. त्याच्याजवळ त्याचं व्हायोलिन पडलं होतं. त्या व्हायोलिनचा पार चेंदामेंदा झाला

होता. तेही एक विचित्र छोटंसं प्रेत.

आम्ही ग्लीवित्झला तीन दिवस राहिलो. तीन दिवसात आम्हाला जराही अन्नपाणी मिळालं नव्हतं. आम्हाला बराकीच्या बाहेर जायची परवानगी नव्हती. नाझी सैनिकांचा दाराबाहेर पहारा होता.

मला प्रचंड भूक आणि तहान लागली होती. इतरांकडे बघून मला कळलं होतं, की मी ही भयंकर अस्वच्छ आणि थकलेला दिसत असेन. बुनाहून आम्हा बरोबर आणलेला पाव आम्ही अधाशासारखा केव्हाच खाऊन टाकला होता. आता केव्हा खायला मिळेल, काहीच सांगता येत नव्हतं.

युद्धाची आघाडी आमच्या मागे मागेच येत होती इथूनही आता तोफांचे आवाज अगदी जवळ ऐकू येत होते. नाझींनी इथूनही आम्हाला काढून आणखी कुठं नेऊ नये, रशियनांनी लवकरच येऊन आमची सुटका करावी, नव्हे ते येतीलच, हा विचार कितीही आशादायक असला, तरी तसा विचार करण्याचं धैर्य आणि शक्ती आमच्याजवळ नव्हती.

आम्हाला जर्मनीच्या मध्यभागी नेलं जाणार आहे असं कानावर आलं.

तिसऱ्या दिवशी सकाळी आम्हाला बराकीच्या बाहेर काढण्यात आलं.

एका दारानं छावणीचे दोन भाग झालेले होते. आम्हाला त्या दाराकडे नेण्यात आलं. काही नाझी अधिकारी तिथं उभे होते. आमच्या रांगतेनू एक अफवा पसरत गेली-निवड!

नाझी अधिकाऱ्यांनी निवड केलीच; आणि त्यानुसार विभागणी. अशक्त माणसं डावीकडे. जे चांगले चालू शकतात, ते उजवीकडे.



माझ्या वडिलांना डाव्या बाजूला पाठवण्यात आलं. मी त्यांच्यामागे धावलो.

एक नाझी अधिकारी ओरडला,

''ए! इकडे ये.''

मी इतरांमध्ये सरकून उभा राहिलो. डावीकडून मला परत आणण्यासाठी अनेक नाझी अधिकारी धावले. त्यांच्यात पळापळ झाली. काही क्षण इतका गोंधळ माजला, की त्या गोंधळात डावीकडचे लोक उजवीकडे आणि उजवीकडचे डावीकडे सटकले. त्यात मी आणि माझे वडिलही होतो. शेवटी आम्ही एकमेकांच्या जवळ आलो! तेवढ्यात नाझी सैनिकांनी शिस्त आणण्यासाठी गोळीबार केलाच आणि काही लोक मेले.

आम्ही रांगेने छावणी सोडून निघालो.

अर्धा तास चालल्यानंतर आम्ही एका शेतात आलो. त्या शेताच्या मधून रेल्वेचे रूळ गेलेले होते. आम्ही गाडीची वाट बघत थांबलो.

दाट बर्फ पडत होता. आम्हाला बसायलाच काय, जराही हालचाल करायला परवानगी नव्हती.

आमच्या अंगावरच्या ब्लँकेटस्वर बर्फाचे दाट थर जमत होते. नाझींनी आमच्यासाठी पाव आणि थोडंसं खाणं आणलं. आम्ही अक्षरशः त्यावर तुटून पडलो. भूक लागली, पण तहान तशीच होती. एकानं कल्पना काढली, की तहान शमवण्यासाठी बर्फ खावा. कल्पना चांगली होती, पण आम्हाला वाकायची किंवा हालचाल करायची परवानगी नव्हती. म्हणून आम्ही एक शक्कल लढवली. आम्ही चमच्यानं एकमेकांच्या खांद्यावर पाठीवर साचलेला बर्फ खाऊ लागलो. एक घास पावाचा, एक चमचा बर्फाचा. नाझी अधिकारी हे दृश्य

बघत होते. तेही हसले.

खूप तास निघून गेले. दूरवर क्षितिजाकडे गाडी दिसते का, ते पाहून पाहून आमचे डोळे दुखायला लागले होते. आम्हाला घेऊन जाणाऱ्या गाडीचा ठिपका दृष्टिपथात येतच नव्हता.

शेवटी संध्याकाळी खूप उशिरा गाडी आली. ती इतकी लांब गाडी होती, की गाडी संपणारच नाही, असं वाटलं. त्या गाडीला जनावरांचे उघडेच हबे होते. नाझी अधिकाऱ्यांनी आम्हाला त्या डब्यांमध्ये कोंबलं. एका डब्यात शंभर माणसं. आम्ही इतके बारीक होतो!

आम्हाला गाडीत चढवण्याचं काम पूर्ण झालं आणि आमचा भलामोठा तांडा पुढच्या अज्ञात प्रवासाला निघाला.

■ ■ ■



# सात

थंडीपासून बचाव व्हावा, म्हणून आम्ही एकमेकांना बिलगून बसलो होतो. आमची डोकी रिकामी आणि त्याच वेळी जडही झाली होती. मेंदू म्हणजे झपाट्यानं नष्ट होणाऱ्या आठवणींचा भोवरा झाला होता. इतकी उदासीनता आली होती, की आमच्यातलं चैतन्य मरून गेलं होतं.

इथं किंवा आखणी कुठंतरी–काय फरक पडणार आहे? आज मरायचं, उद्या, की त्यानंतर?

रात्र दीर्घ, न संपणारी होती.

अखेर क्षितिजावर रात्र संपल्याची सूचना देणारा प्रकाश फाकला. रात्रीचा दाट काळोख विरळ होऊन त्यात उजेड मिसळला. त्या धूसर प्रकाशात आमच्या डब्यातल्या माणसांच्या ढिगाचा आकार स्पष्ट झाला. एकाचं डोकं दुसऱ्याच्या खांद्यावर. गाठोड्यातून वस्तू एकत्र कोंबून बांधव्यात, तशी ही माणसं भीतीनं दबून बसलेली. पहाटेच्या पहिल्या उजेडात ती माणसं म्हणजे एखाद्या शेतात पडलेले, धुळीनं भरलेले थडग्यांचे दगडच वाटत होते. जे लोक अद्यापही जिवंत होते, त्यांना रात्रभरातून मरून गेलेल्यापासून वेगळं ओळखण्याचा मी प्रयत्न

करू लागलो. सगळेच झोपल्यासारखे दिसत होते. मला जिवंत व मेलेले यांच्यातला फरक कळू शकला नाही. एक माणूस शून्यात कुठंतरी पाहात उघड्या डोळ्यांनीच मरून गेला होता. माझी दृष्टी त्याच्या चेहऱ्यावर खिळून राहिली. त्याच्या निळ्या पडलेल्या चेहऱ्यावर धुक्याचे आणि बर्फाचे थर जमले होते.

माझे वडील माझ्या शेजारी कसेबसे कोंबल्यासारखे उभे होते. त्यांनी ब्लॅकेट अंगाभोवती गुंडाळले होतं. त्यांचे खांदे बर्फानं झाकून गेले होते.

तेही मेले होते का?

मी त्यांना हाक मारली.काही उत्तर आलं नाही. मला रडायला यायला लागलं. त्यांची काहीच हालचाल नव्हती.

माझ्या मनात अचानक विचार आला, आता जगण्याचं काहीच कारण नव्हतं... जगण्यासाठी संघर्ष करायचीही गरज नव्हती.

एका ओसाड शेतामध्ये गाडी थांबली. गाडी थांबताना तिला तो अचानक धक्का बसला, त्यामुळं झोपलेले काहीजण दचकून जागे झाले. सरळ ताठ बसून त्यांनी इकडेतिकडे घाबरून पाहिलं.

गाडीबाहेरून नाझी अधिकारी ओरडत गेले,

''सगळ्या मेलेल्यांना बाहेर फेका. सगळी प्रेतं बाहेर पडली पाहिजेत.''

जिवंत होते, त्यांना आनंद झाला. कारण त्यांना तेवढीच हातपाय पसरायला जास्त जागा मिळेल. स्वयंसेवक कामाला लागले. सगळे एकमेकांना सांगायला लागले,

''इथं एक आहे. हा बघा मेलेला आहे. त्याला उचला.''

त्यांनी मृत्यांच्या अंगावरचे कपडे काढले. तत्परतेनं कैद्यांनी मिळतील तेवढे कपडे ओरबाडून घेतले होते. नंतर दोन



दोन प्रेतवाहकांनी एकेकाला धरलं.

एकानं डोक्याकडून, एकानं पायाकडून. त्यांनी एकेकाला पिठाच्या पोत्याप्रमाणे गाडीच्या डब्याबाहेर ढकलून दिलं.

आणखी एक जण ओरडला,

''हा बघा, इथं एक माणूस मेलेला आहे. माझ्या शेजारचा. तो काहीच हालचाल करत नाहीये.''

प्रेतांना बाहेर फेकणारी ती दोन माणसं त्यांचं ऐकून माझ्या वडिलांच्या दिशेनं यायला लागली.ती माणसं जवळ आली, तेव्हा मी माझ्या सुन्न मनोऽवस्थेतून जागा झालो. मी माझ्या वडिलांच्या अंगावर आडवा पडलो. ते थंड पडले होते. मी त्यांच्या गालांवर चापट्या मारल्या. त्यांचे हात चोळले. मी रडत रडत म्हणालो,

''उठा, जागे व्हा. नाहीतर ते तुम्हाला डब्याच्या बाहेर फेकून देतील.''

त्यांचं शरीर तसंच निश्चल होतं. त्या दोन माणसांनी माझ्या शर्टाची कॉलर धरून मला पकडलं,

''सोड त्यांना, ते मेले आहेत.''

''नाही! ते मेले नाहीत. अजून तरी नाही.''

जेवढ्या जोरात मारता येतील तेवढ्या जोरात मी वडिलांना थापडा मारल्या.

काही क्षणानंतर माझ्या वडिलांच्या निस्तेज डोळ्यांवरची पापणी किंचित वर उचलली गेली. त्यांचा श्वास बंद चालू होता.

''बघा, जिवंत आहेत ते.''

ती दोन माणसं पुढं निघून गेली.

डब्यामधून वीस मृतदेह त्यांनी बाहेर टाकले. नंतर गाडी पुढच्या प्रवासाला निघाली. गाडीनं शेकडो नग्न मृत शरीरं मागे टाकली.

त्या देहांचं दफनही होऊ शकलं नाही. पोलंडच्या एका शेतात बर्फाच्या दाट थरांवर ते देह आडवे तिडवे फेकले होते.

आम्हाला खायला काहीही मिळालं नाही. बर्फ खाऊनच आम्ही जगत होतो. बर्फच आमचा पावाचा तुकडा होता.

दिवस रात्रींसारखे होत आणि रात्री त्यांच्या मिट्ट अंधाराचा गाळ आमच्या हृदयात ठेवून जात होत्या.

गाडी फार सावकाश चालली होती. ती वरचेवर तास न् तास कुठंतरी थांबत होती. पुन्हा सुरू होत होती. बर्फ सारखा पडतच होता. तो थांबतच नव्हता. या सगळ्या दिवस-रात्रींमध्ये आम्ही अंगाचं मुटकुळं करून दाटीवाटीनं जीव मुठीत धरून बसून होतो. एकमेकांच्या अंगावर कोलमडून पडत होतो. कोणी कोणाशी अक्षरही बोललो नाही. गोठलेली शरीरं यापलीकडे आम्हाला अस्तित्वच नव्हतं. आमचे डोळे मिटलेले. गाडी पुन्हा केव्हा थांबते, याचीच आम्ही वाट बघत होतो. आमच्यातले मेलेले गाडीतून वरचेवर फेकून कमी करायचे होते.

प्रवासाचे दहा दिवस आणि दहा रात्री. काही वेळा आमची गाडी जर्मन गावांमधून गेली. बहुधा ती वेळ भल्या पहाटेचीच असायची. कामगार कामावर जाताना दिसायचे. ते थांबून आमच्याकडे टक लावून बसायचे. पण त्यांच्या चेहऱ्यांवरून त्यांना आश्चर्य वाटलेलं दिसलं नाही.

एक दिवस आधीच गाडी थांबली होती. बाहेर उभ्या असलेल्या एका कामगारानं त्याच्या पिशवीतून पावाचा तुकडा काढला आणि आमच्या डब्यात फेकला. त्या तुकड्यासाठी अक्षरश: चेंगराचेंगरी झाली.उपासमार झालेले अनेक कैदी त्या पावाच्या एका तुकड्यासाठी मरणाच्या आकांतानं त्यावर तुटून पडले.

बाकीच्या जर्मन कामगारांनी हे दृश्य मोठ्या चवीनं पाहिलं.



पुढं काही वर्षांनी अशाच तऱ्हेचं दृश्य मी एडनला पाहिलं. आमच्या बोटीवरचे प्रवासी निग्रो लोकांकडे नाणी फेकत होते व त्यात त्यांना फार मजा वाटत होती. नाणं मिळविण्यासाठी निग्रो अटीतटीनं झुंजत होते. प्रवाशांमध्ये एक अतिशय सुंदर, श्रीमंत आणि उच्चकुलीन स्त्री होती. तिला तर हा खेळ विशेषच आवडत होता, असं दिसलं. तीनं फेकलेल्या नाण्यासाठी जेव्हा दोन निग्रो मुलांमध्ये एकमेकांना जीव घेण्याइतपत मारामारी जुंपली, तेव्हा मी त्या स्त्रीला म्हटलं,

''प्लीज! असे पैसे फेकू नका.''

''का नको? मला दानधर्म करायला आवडतं.''

आमच्या डब्यात जिथं पावाचा तुकडा पडला होता. तिथं खरोखरच युद्ध जुंपलं होतं. माणसं एकमेकांवर आदळत होती, चेंगरत होती, एकमेकांना फाडून टाकत होती. त्यांच्या डोळ्यात जंगली पशूंसारखा त्वेष संचारला होता. भक्ष्यावर तुटून पडताना त्यांच्यात अभूतपूर्व आवेश संचारला होता. त्यांचे दात आणि नखं धारदार झाली होती.

गाडीच्या भोवताली आता कामगारांबरोबरच इतरही बरेच उत्सुक प्रेक्षक जमले होते. त्यांनी बहुधा असला 'माल'भरलेली गाडी कधी बघितली नसावी. मग तो खेळ वाढतच होता. जवळ जवळ प्रत्येक डब्यात पावाचे तुकडे येऊन पडू लागले. प्रेक्षकांनी माणसांचे असले हाडांचे सांगाडे कधी पाहिले नसावेत. एका घासासाठी मरेपर्यंत झुंजणारे ते सापळे!

एक तुकडा आमच्याही डब्यात पडला. मी ठरवलं होतं, त्यासाठी जागचं हालायचंसुद्धा नाही. कारण मला माहीत होतं, की डझनभर रानटी माणसांशी सामना करण्याचं बळ माझ्यात नव्हतं. एक म्हातारा माणूस चौघांशी झटापटीतून स्वत:ला सोडवून माझ्यासमोर येऊन बसला. त्यानं

त्याचा एक हात छातीशी दाबून धरला होता. मला वाटलं, नक्कीच त्याला छातीवर ठोसा लागला असणार. नंतर मला कळलं, की त्याला पावाचा तुकडा मिळाला होता व तो त्याने शर्टाच्या आत छातीशी लपवून, घट्ट धरून ठेवला होता. त्यानं तो झटकन बाहेर काढला व तोंडात कोंबला. त्याचे डोळे आनंदानं चमकले. त्याचा प्रेतवत चेहरा उजळला. पण पण आनंद क्षणभरच टिकला. त्यांच्या चेहऱ्यावरचं स्मित मावळलं. कारण दुसऱ्या एका तरुण व्यक्तींन त्या वृद्धाला खाली पाडलं होतं व तो तरुण त्या वृद्धाला बडवत होता.

प्रचंड मार खाऊन कळवळून वृद्ध म्हणाला,

''अरे, मी मीर आहे. तू मला ओळखलं नाहीस? मी, तुझा बाप. तू वडिलांनांच ठार मारतो आहेस. माझ्याजवळ थोडा पाव आहे. मी तुझ्याचसाठी आणला आहे तो. तुलाही देणार आहे...''

तो वृद्ध खाली कोसळला. त्यानं पावाचा तुकडा अजूनही घट्ट मुठीत पकडून ठेवला होता. त्यानं पावाचा घास स्वत:च्या तोंडाकडे न्यायचा प्रयत्न केला. पण त्याच्या तरुण मुलानं त्याच्यावर झडप घालून तो पाव हिसकावून घेतला. वृद्ध माणूस काहीतरी पुटपुटला. त्याला मृत्यूपूर्वीची घरघर लागली. तो मेला, पण कुणालाच त्याचं काही वाटलं नाही. त्याच्या तरुण मुलानं मेलेल्या वडिलांचे खिसे वगैरे शोधले व पाव मिळवून तो बकाबका खायला लागला. दुसरी दोन माणसं हे बघत होती. ती दोघं त्याच्यावर तुटून पडली. इतरांनीही दोघांना साथ दिली. ही लढत संपली, तेव्हा माझ्यासमोरच दोन प्रेतं पडली होती. एक त्या वृद्धांच आणि दुसरं त्याच्या तरुण मुलांचं.

आमच्या या प्रवासाच्या शेवटच्या दिवशी भयंकर सोसाट्याचा वारा सुटला. बर्फ तर सतत पडतच होता, त्यात ते कापत सुटलेले बोचरे वारे. त्याच्यात वादळ भरलेलं होतं. आम्हाला वाटलं,



आता आमचा शेवट निश्चित आहे. खऱ्या अर्थानं शेवट. यातून आम्ही जिवंत राहणं शक्यच नाही. अशा बर्फाळ झोडपणाऱ्या वाऱ्यात आमच्यासारखी निस्त्राण माणसं, हाडांचे सापळे कसा तग धरणार?

कुणीतरी उभं राहून ओरडलं,

''अशा परिस्थितीत आपण बसून राहणं योग्य नाही. अशानं तर आपण गोठून मरून जाऊ. आपण सगळे उभे राहू आणि डब्यातल्या डब्यात इकडे तिकडे फिरू.''

आम्ही सगळे उभे राहिलो. आमची ओलसर दमट झालेली ब्लँकेट्स आम्ही अंगाभोवती घट्ट गुंडाळून घेतली. पाऊलही पडत नव्हतं. पण आम्ही कसंबसं चार पावलं चाललो. तसं करताना आम्ही स्वत:च्या शरीरावर, अत्याचारच करत होतो. आम्ही जागच्या जागी गोलगोल फिरायला लागलो.

एकाएकी डब्यातलं कोणीतरी मोठ्यानं रडायला लागलं. कोणीतरी नुकतचं मेलं होतं. आमच्या सगळ्यांच्या मनात भयंकर भीती दाटून आली. आम्हीही आता काही क्षणातच मरणार, या विचारानं आम्ही सगळेच रडायला लागलो. प्रत्येकाचं रडणं, थडग्याच्या पलीकडे आल्यासारखं वाटत होतं. एकच आक्रोश दाटला. अतीव शोकानं करूण दिसणारी ती माणसं. त्या कठीण परिस्थितीतील आमचं असहाय्य रडणं वेगवान माऱ्यात आणि बर्फात मिसळून गेलं.

गाडीतल्या सगळ्यांची दु:खं सारखीच असल्यानं रडण्याचं लोण एका डब्यातून दुसऱ्या डब्यात सहज पसरत गेलं. एकाच वेळी हजारो लोकांचा आक्रोश सुरू झाला. एकाचं रडणं बघून दुसरा सहजच रडत होता.

आम्ही का रडतोय, हेही कळत नव्हतं. जणू एका प्रचंड

मोठ्या मानवसमूहाला स्वत:चा मृत्यू समोर दिसत होता; आणि ते रडणं म्हणजे मृत्यूपूर्वीची घरघर होती. या गाडीतच आम्ही मरणार होतो. आमची जगण्याची सगळी धडपड संपली होती. सगळ्या मर्यादा ओलांडून झाल्या होत्या. कष्टांचा, छळाच्या, सहनशक्तीच्या, उपाशी राहण्याच्या, आता कोणातही यत्किंचितही शक्ती उरली नव्हती; आणि पुन्हा रात्र फार मोठी असणार होती.

कुणीतरी म्हणालं,

''त्यापेक्षा ते लोक आपल्याला एकदमच गोळ्या का घालत नाहीत?''

त्याच संध्याकाळी आम्ही आमच्या मुक्कामाला पोहोचलो.

रात्री बऱ्याच उशिरा पहारेकरी आले आणि त्यांनी आम्हाला डब्यांच्या बाहेर काढलं.

मेलेल्यांना गाडीतच सोडून दिलं. ज्यांच्यात अद्यापही उभं रहाण्याचं त्राण होतं, तेच गाडीतून खाली उतरू शकले.

शेवटचा दिवस सर्वात जास्त विनाशक ठरला. तोपर्यंत तग धरणारे फार थोडे होते. आम्ही गाडीत चढलो होतो, ते हजारोंच्या संख्येनं. इथं खाली उतरलो, तेव्हा फक्त काही शंभरात मोजण्याइतके शिल्लक उरलो होतो. त्यांच्यापैकीच होतो, मी आणि माझे वडील.

आम्ही बुशेनवाल्डला पोहोचलो होतो.



# आठ

तुरुंगाच्या दारापाशीच नाझी पोलीस अधिकारी आमची वाट बघत होते. त्यांनी आमची मोजणी केली. मग आम्हाला एका सभेच्या जागी नेण्यात आलं. लाऊडस्पीकरवरून आम्हाला आज्ञा देण्यात आली.

''पाचांच्या रांगा करा. शंभराचे गट करा! पाच पावलं पुढं सरका!''

मी माझ्या वडिलांचा हात धरला. तीच जुनी परिचित भीती त्यांच्यापासून दूर जावं लागू नये.

आमचा उजव्या बाजूला अगदी लागूनच स्मशानाचं उंच धुरांडं वर उठून आकाशात घुसलं होतं. आता आम्ही असल्या गोष्टींचा परिणाम होण्यापलीकडे गेलो होतो. त्यामुळं तिकडे फार काळ आमचं लक्ष गेलं नाही.

तिथल्या एका अनुभवी कैद्यानं सांगितलं, की प्रथम प्रथम गरम शॉवरखाली आंघोळ करावी लागेल. मगच आम्हाला आत बराकींमध्ये जाऊ देतील.

गरम पाण्याची आंघोळ आणि तीही इतक्या दिवसांनंतर! या कल्पनेनंच मी सुखावलो.

माझे वडील शांत होते. ते माझ्याजवळ मोठ्या कष्टानं जड श्वास घेत उभे होते.

मी त्यांना धीर दिला.

''आता फक्त थोडेच क्षण. मग आपण विश्रांती घेऊ शकू. बिछान्यात निजू शकू.''

त्यांनी उत्तरं दिलं नाही. मीही इतका थकलो होतो, की त्यांच्या गप्प बसण्यानं मी वैतागून त्यांच्या दु:खाविषयी उदासीन झालो. आंघोळ लवकरात लवकर करून बिछान्यावर अंग टाकायला मी कमालीचा आसुसलो होतो. त्याक्षणी माझी तेवढीच एक इच्छा होती.

पण शॉवरपर्यंत पोहोचणं सोपं नव्हतं. तिथं शेकडो कैद्यांनी गर्दी केली होती. रक्षकांना व्यवस्था ठेवणं कठीण जात होतं. ते उगाचच हातातली छडी इकडून तिकडे फिरवून तिचा प्रसाद कैद्यांना देत होते. पण त्याचा काहीही उपयोग होत नव्हता. ज्या कैद्यांमध्ये उभं रहायची किंवा पुढं सरकायचीही शक्ती नव्हती, ते तिथं खाली बर्फावर बसले. माझ्या वडिलांचीही बसायची इच्छा होती. ते विव्हळत कण्हत होते.

''मी आता एक पाऊलही पुढं टाकू शकत नाही. बस्स, आता इथंच माझा शेवट होणार. मी इथंच मरणार.''

ते मला बर्फाच्या एका टोकाकडे घेऊन गेले. ते खाली बसले. तिथून आम्हांला तुरुंगाच्या दारातले, ब्लॅकेटच्या लक्तरांमध्ये गुंडाळलेले मानवी आकार दिसत होते.

''मला इथंच सोडून दे. मी आता चालू शकत नाही. माझ्यावर दया कर. आपल्याला बाथरुममध्ये प्रवेश मिळेपर्यंत मी इथंच वाट



बघत पडतो. तू पुढं जा. आपला नंबर आला, की ये आणि मला घेऊन जा.''

त्यावेळी मला ओक्साबोक्शी धाय मोकलून रडावंसं वाटलं. इतका काळ एकत्र राहिल्यावर, इतकं सगळं मिळून सहन केल्यावर, इतक्या दिव्यांमधून पार पडल्यावर मी आता माझ्या वडिलांना मरायला एकट कसं सोडू शकत होतो? तेही अशा वेळी, की आंघोळ करून आम्ही दोघंही विश्रांती घेऊ शकत असताना? विश्रांतीचा क्षण जवळ आला असताना? एकत्र झोपू शकत असताना?

अचानक मी किंचाळलो,

''इथून उठा आधी तुम्ही! ताबडतोब उठा! तुम्ही स्वत:च स्वत:ला मारून टाकत आहात!''

वडिलांचं विव्हळणं सुरूच होतं. मी त्यांच्या दंडाला घट्ट धरलं.

''ओरडू नकोस, बाळ... तुझ्या या म्हाताऱ्या बापावर दया कर. मला विश्रांती घेत इथंच पडू दे. थोडा वेळ. मी फार थकलो. माझी सगळी शक्ती संपली आहे.''

ते लहान मुलासारखे झाले होते. कमकुवत, अशक्त, दुबळे, भित्रे.

''तुम्ही इथं राहू नका... इथं...''

मी त्यांना आजूबाजूला पडलेली प्रेतं दाखवली. त्या मेलेल्या लोकांनाही विश्रांती घ्यायची इच्छा होती. त्याचं काय झालं, ते दाखवलं.

''मला दिसतंय सगळं, बाळा, नीट दिसतंय्. त्यांना झोपू दे. बऱ्याच काळानं त्यांना डोळे मिटायला मिळालेले आहेत. ते फार थकले आहेत...थकले...''

वडिलांचा आवाज क्षीण झाला.

भणभणत्या वाऱ्यात मी पुन्हा किंचाळलो,

''तुम्ही समजता, तसं नाहीये. हे इथं पडलेले लोक पुन्हा कधीच जागे होणार नाहीयेत. कधीच! कळतंय का तुम्हाला? ते मेलेले आहेत.''

वडील बराच वेळ माझ्याशी वाद घालत बसले. मला वाटलं, मी वडिलांशी नव्हे, तर साक्षात मृत्यूशी वाद घालतोय. त्यांनी आधीच निवडलेल्या मृत्यूशी माझा युक्तिवाद सुरू होता.

सायरन कर्कशपणे वाजायला लागले. दक्षतेचा इशारा. सगळ्या छावणीतले दिवे भराभर बंद केले गेले. रक्षकांनी आम्हाला बराकींमध्ये ढकललं. क्षणार्धात त्या जमावाच्या जागी चिटपाखरू देखील राहिलं नाही. बाहेरच्या झोंबणाऱ्या बर्फाळ थंडगार वाऱ्यात आम्हाला उभं रहावं लागलं नाही, याचाच जास्त आनंद झाला. आम्ही आनंदानं स्वत:ला लाकडी फळ्यांच्या पलंगावर झोकून दिलं. हे पलंग अरुंद व एकावर एक असे अनेक स्तरांवर होते. बराकींच्या दाराशीच कढईत सूप उकळत होतं. पण त्या क्षणी त्याचाही कुणाला मोह पडत नाही. प्रत्यैकाला त्या क्षणी फक्त झोप हवी होती!

मी जागा झालो, तेव्हा दुपारचे बारा वाजून गेले होते! मग मला एकाएकी आठवण झाली, की मला वडील होते, ते माझ्याबरोबर आले होते! धोक्याचा इशारा झाला, त्यावेळी मीही गर्दीबरोबरच आत घुसलो होतो. वडिलांच्या विचारानं स्वत:ला त्रास करून घेतला नव्हता. मला माहीत होतं, की ते शेवटच्या घटका मोजत होते. ते मरणाच्या अगदी दारात होते आणि तरीही मी त्यांना एकटं सोडून दिलं होतं!

मी त्यांना शोधायला बाहेर पडलो.

पण त्याचवेळी माझ्या मनात विचार येत होते, की–



'ते मला सापडायलाच नकोत. जर मी त्यांच्या मरणासन्न ओझ्याखाली स्वत:ची सुटका करून घेऊ शकलो, तरच मी माझी सर्व शक्ती माझ्या स्वत:च्या जगण्यावर केंद्रित करू शकेन. वाचण्यासाठी धडपडू शकेन. मी फक्त माझीच काळजी करू शकेन.'

या विचारांसरशी माझी मलाच लाज वाटली. मी खजील झालो. आजही मला विचारांची शरम वाटते. एक अपराधीपणा.

मी कित्येक तास भटकलो. पण वडील कुठं दिसले नाहीत. नंतर मी बराकीकडे परत आलो. तिथं काळ्या कॉफीचं वाटप चाललं होतं. माणसं रांगा करून धक्काबुक्की करत कॉफीसाठी धडपडत होती.

माझ्या पाठीमागून अतिशय शोकाकूल याचना करणारा आवाज आला,

''एलीझर, माझ्या बाळा, माझ्यासाठी घोटभर कॉफी आण, रे.''

मी धावत त्यांच्याजवळ गेलो.

''मी तुम्हाला किती वेळापासून शोधतो आहे. तुम्ही कुठं गेला होतात? तुम्ही रात्री झोपलात? आता कसं वाटतंय तुम्हांला?''

त्यांचं अंग तापानं भाजून निघतं होतं. एखाद्या हिंस्र पशूप्रमाणे रेटारेटी करत वाट काढत मी कॉफीच्या मोठ्या भांड्यापाशी गेलो. कपभर कॉफी मिळवली. मी एक घोट घेतला. बाकीची वडिलांसाठी ठेवली. त्यांनी जेव्हा ती घटाघटा घशाखाली ओतली तेव्हा, त्याच्या डोळ्यांत आलेला कृतज्ञतेचा प्रकाश मी आयुष्यात, कधीही विसरणार नाही! प्राण्याची कृतज्ञता. माझ्या संपूर्ण बालपणात त्यांना दिलं नसेल, इतकं समाधान त्या गरम पाण्याच्या काही घोटांनी मी त्यांना त्या दिवशी दिलं.

वडील लाकडी पलंगावर पडून होत. त्यांची त्वचा निळी पडली होती. ओठ वाळून फिकट झाले होते. त्यांचं सगळं शरीर थरथर कापत होतं. मला त्यांच्या त्या अवस्थेकडे फार काळ थांबवलं नाही.

इतक्यात स्वच्छतेसाठी ती जागा रिकामी करण्याचा हुकूम सुटला. फक्त आजाऱ्यांना आत थांबायला परवानगी दिली.

आम्ही पाच तास बाहेर होतो. त्या अवधीत सूप वाटलं गेलं. आम्हाला आत बराकीत जायची परवानगी मिळताच मी वडिलांकडे धाव घेतली.

''तुम्ही सूप घेतलं? काही खाल्लं का?''

''नाही.''

''का?''

''त्यांनी आम्हाला काही दिलंच नाही. ते म्हणाले, आम्ही आजारी माणसांनी लवकर मेलेलंच बरं. आम्हाला अन्न देणं म्हणजे अन्नाचा अपव्यय. आता मी अधिक काळ जगणं शक्य नाही.''

माझ्या सुपातलं उरलेलं थोडं सूप मी त्यांना दिलं. पण ते देताना मला फार जड गेलं. मी माझ्या इच्छेविरुद्ध त्यांना देत आहे, हे मला जाणवलं.

धर्मगुरू इलियाहोच्या मुलात आणि माझ्यात काय फरक होता?

वडील दिवसेंदिवस अशक्त होत गेले; त्यांच्या चेहऱ्याचा रंग मेलेल्या पानाप्रमाणे झाला. त्यांची दृष्टी विझत चालली होती. बुशेनवाल्डला आल्यावर तिसऱ्या दिवशी प्रत्येकाला शॉवरखाली आंघोळ करायची सक्ती करण्यात आली. आजारी माणसंही त्यातून सुटली नाहीत. कदाचित ती वडिलांची शेवटची आंघोळ ठरणार होती.



आंघोळ करून परत आल्यावर आम्हाला बराकीबाहेर खूप वेळ थांबावं लागलं. स्वच्छतेचं काम चालू होतं.

वडील दुरून दिसताच मी त्यांना भेटायला पळत निघालो. ते माझ्याजवळून भुतासारखे पुढं निघून गेले. माझ्याकडे न पाहता. मी त्यांना हाक मारली. ते थांबले नाहीत, की मागे वळून पाहिलं नाही. मी त्यांच्यामागे धावलो.

''तुम्ही कुठं जाताहात?''

त्यांनी क्षणभर माझ्याकडे पाहिलं. पण ती दृष्टी परकेपणाची होती. भ्रमिष्टासारखी त्यांचा चेहरा अनोळखी वाटावा, असा. क्षणभर थांबून ते पुढं चालायला लागले.

दुसऱ्या दिवसापासून त्यांना जुलाबाचा भयंकर त्रास सुरू झाला. ते इतर पाच रोग्यांबरोबर बराकीतच पडून असायचे. मी त्यांच्याजवळ बसलो. त्यांच्याकडे बघत. ते मृत्यूच्या तावडीतून सुटतील, अशी आशा करायची सुद्धा हिंमत होत नव्हती. तथापि, त्यांना धीर यावा, म्हणून जेवढं करायचं, तेवढं मी केलं.

एकाएकी ते अंथरुणावर उठून बसले. तापामुळं गरम झालेले ओठ माझ्या कानाजवळ आणून ते म्हणाले,

''एलीझर, मी पैसे आणि सोनं कुठं पुरलं आहे, ते तुला सांगून टाकतो. आपल्या तळघरात...''

ते फार घाईनं बोलायला लागले. जणू काही यानंतर मुळीच वेळ मिळणार नाही, अशी त्यांना भीती वाटत होती.

मी त्यांना समजून सांगण्याचा खूप प्रयत्न केला, की ते अजूनही जगतील. मग आपण दोघं मिळून आपल्या घरी परत जाऊ.

पण त्यांनी माझ्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही,. त्यांना

लक्ष देणं शक्यही नव्हतं. ते फार थकले होते. त्यांच्या ओठांच्या कोपऱ्यातून रक्तमिश्रित लाळेचा ओघळ वहात होता. त्यांनी डोळे मिटून घेतले होते. त्यांचा श्वास धाप लागल्याप्रमाणे झटके देत सुरू होता. ते श्वास घेण्यासाठी धडपडत होते.

माझ्या वडिलांच्या बराकीतल्या एका कैद्याला मी माझ्या वाट्याचा पाव दिला आणि त्याच्या बदल्यात मी त्याच्या आणि माझ्या अंथरुणाची अदलाबदल केली. मी वडिलांजवळ आलो.

दुपारी तुरुंगात डॉक्टर आले. मी त्यांना भेटायला गेलो. वडील फार आजारी असल्याचं सांगितलं.

''त्यांना इकडे घेऊन ये.''

मी डॉक्टरांना परोपरीनं सांगितलं, की ते उठून उभे राहू शकत नाही. पण डॉक्टर काही ऐकून घ्यायला तयारच नव्हते. मी कसंबसं वडिलांना धरून डॉक्टरांजवळ नेलं. डॉक्टरांनी निरखून पाहिलं व तुच्छ आवाजात प्रश्न केला,

''काय हवंय तुला? काय काम आहे?''

''माझे वडील. फार आजारी आहेत... त्यांना हगवण....''

''हगवण? मग माझा त्याच्याशी काही संबंध नाही. मी सर्जन आहे. पुढं व्हा. मागच्यांसाठी जागा करा.''

मी खूप बोललो. निषेध केला. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

''मला उभं राहवत नाहीये. बाळा, मला माझ्या जागेवर परत ने.''

मी त्यांना परत नेलं आणि त्यांच्या अंथरुणावर निजवलं. ते थरथर कापत होते.

''थोडा झोपायचा प्रयत्न करा. झोपल्यानं तुम्हाला बरं



वाटेल.''मी त्यांना म्हणालो.

मोठ्या प्रयासानं ते श्वास घेत होते. त्यांनी डोळे मिटले होते. आता ते नक्कीच सगळं पाहू शकत असतील. सगळ्या नश्वर गोष्टीमागचं शाश्वत सत्य त्यांना दिसत असेल.

दुसरे एक डॉक्टर आले. पण वडील यावेळी मुळीच उठायला तयार नव्हते. त्यांना माहीत होतं, की यात काही अर्थ नाही.

शिवाय हे डॉक्टर तर आजाऱ्यांना जणू संपवायलाच आले होते. ते रुग्णांवर ओरडत होते, त्यांना शिव्या देत होते, आजार वगैरे सगळं ढोंग आहे. काम करायला नको, बिछान्यात पडून राहयला पाहिजे, सगळे आळशी आहेत वगैरे. मला त्यांच्या अंगावर झडप घालून त्यांचा गळा आवळावा, असं वाटलं. त्यांची मानगूट मुरगाळून टाकावीशी वाटली. पण माझ्याजवळ एवढं धैर्य नव्हतं अन् शक्तीही. एखादा खिळा ठोकून बसवावा, तसा मी माझ्या वडिलांच्या मृत्यूशय्येपाशी बसलो होतो. मी माझे हात हताशपणे इतक्या जोरात चोळत होतो, की शेवटी ते दुखायला लागले. मी काहीच करू शकत नव्हतो.

या सगळ्या डॉक्टरांच्या मुंड्या मुरगाळल्या पाहिजेत! सगळे माझ्या वडिलांचे खुनी आहेत. सगळ्या जगाला आग लावली पाहिजे!

माझ्या हृदयातला आकांत घशात अडकून पडला.

पावाचं वाटप सुरू झालं, म्हणून मी बाहेर गेलो. परत आलो, तर माझे वडील लहान मुलासारखे गळा काढून रडताना दिसले,

''बाळा! ते मला सारखे मारत होते.''

''कोण?''

मला वाटलं, चित्तभ्रम होऊन ते बेशुद्धावस्थेत बरळत असावेत.

"ते... हा फ्रेंच माणूस आणि तो पलीकडचा पोलिश. ते मला मारत होते."

हृदयाला झालेली आणखी एक जखम. वाट्याला आलेला आणखी एक तिरस्कार. जगू नये, असं वाटायला लावणारं. आणखी एक कारण.

"एलीझर...एलीझर... त्यांना सांग मला मारू नका. मी काहीही केलं नाही. ते मला का सारखे मारत राहतात?"

मी आसपासच्या माणसांना शिव्या द्यायला लागलो. ते हसायला लागले. मी त्यांना माझा पाव आणि सूप द्यायचं कबूल केलं. तरी ते हसतच होते. नंतर ते चिडले. ते म्हणाले,

"तुझे वडील आम्हाला इथं नको आहेत. ते शौचासाठी बाहेर जाऊ शकत नाहीत. गादीतच निजल्या निजल्या करतात. आम्हाला त्रास होतो. घाण येते."

दुसऱ्या दिवशी इतर रोग्यांनी वडिलांचा पाव हिरावून घेतल्याची त्यांनी तक्रार केली,

"केव्हा? तुम्ही झोपले असताना"

"मी झोपलोच नव्हतो. त्यांनी माझ्या अंगावर उड्या मारल्या आणि माझा पाव हिसकावून घेतला... आणि त्यांनी मला पुन्हा मारलं, मी आता उठून बसूही शकत नाही. मला थोडं पाणी पाजतोस?"

यावेळी त्यांनी पाणी पिणं योग्य नव्हतं. पाणी त्यांच्यासाठी विष होतं. पण त्यांनी इतका आग्रह धरला, की मला द्यावचं लागलं. मी तरी त्यांच्यासाठी दुसरं काय करू शकत होतो? आता ते पाणी प्यायले किंवा न प्यायले, तरी लवकरच सगळं संपणार होतं.

तुला तरी माझी दया आली, बाळा!



वडिलांवर दया! मी त्यांचा एकुलता एक मुलगा होतो.

एक आठवडा असाच गेला.

"हे तुझे वडील, नाही का?" विभागप्रमुखानं मला विचारलं.

"होय."

"ते फार आजारी दिसतात."

"हो. पण डॉक्टरांनी त्यांच्याकडे लक्षही दिलं नाही. काहीही केलं नाही त्यांच्यासाठी."

"डॉक्टर आता त्यांच्यासाठी काही करू शकत नाहीत... आणि तूही."

त्यानं त्याचा दणकट हात माझ्या खांद्यावर ठेवला. तो म्हणाला,

"मुला, माझं ऐक. तू छळछावणीत आहेस, हे विसरू नकोस. या ठिकाणी प्रत्येकाला स्वत:साठी झगडावं लागतं, दुसऱ्यासाठी नाही. स्वत: खेरीज दुसऱ्याचा विचारही करायचा नसतो. वडिलांचाही नाही. इथं कोणी कोणाचे वडील नाही, भाऊ नाही, मित्र नाही. प्रत्येक जण स्वत:साठीच जगतो आणि मरतो. मी तुला एक हिताचा सल्ला देतो. तू तुझा पाव आणि सूप तुझ्या म्हाताऱ्या वडिलांना देऊ नकोस. तसं केलंस, तर तू स्वत: मरशील. उलट, तूच त्यांना मिळणारा वाटा खा."

मी मध्ये काहीही न बोलता त्यांचं बोलणं ऐकून घेतलं.

त्याचंही बरोबर होतं. अगदी अंतर्मनात मला ते पटलंही. पण तसं कबूल करण्याचं माझ्यात धाडस नव्हतं. मी मनाशीच म्हणालो,

'तु तुझ्या म्हाताऱ्या वडिलांना वाचवू शकणार नाहीस. आता फार उशीर झाला आहे. त्यांच्याही वाटणीचं सूप आणि पाव तूच खा. तुला दुप्पट खायला मिळेल.'

एका निमिषार्धातच हे विचार माझ्या मनात येऊन गेले.

नंतर मला फार अपराधी वाटलं. माझ्या वडिलांसाठी थोडंसं सूप आणायला मी धावलो. मी सूप घेऊन आलो. पण वडिलांनी ते नको होतं. त्यांना फक्त पाणी हवं होतं.

''पाणी नका पिऊ. थोडं गरम सूप घ्या.''

''माझ्या पोटात आग भडकली आहे. मी जळतो आहे. मला पाणी दे.''

मी त्यांना थोडं पाणी पाजलं.

हजेरीसाठी आम्हाला बाहेर बोलावण्यात आलं, म्हणून मी बाहेर गेलो. पण मी लगेच परत आलो आणि वडिलांच्या वरती असलेल्या माझ्या बिछान्यावर पडून राहिलो. आजारी लोकांना हजेरीसाठी बाहेर जायची सक्ती नव्हती. मीही माझ्या वडिलांसाठी आजारी झालो. मला त्यांना सोडून जाववत नव्हतं.

हजेरीची वेळ सर्वत्र शांतता होती. फक्त रुग्णाचे कण्हण्याचे आवाज येत होते. आमच्या विभागाच्या बाहेर नाझी अधिकारी काही हुकूम देत होते. एक अधिकारी आमच्या बिछान्याजवळून जात होता. माझे वडील कळवळून मला म्हणाले,

''एलीझर, मला फार तहान लागली आहे. माझ्या पोटात फार आग होतेय. मला पाणी दे.''

''गप्प बसा! कोण ओरडतंय् तिकडं?''तो नाझी अधिकारी खेकसला.

पण तिकडे लक्ष न देता माझे वडील पाणी मागतच राहिले.

''थोडं पाणी दे रे! थोडं..पाणी...''

तो अधिकारी माझ्या वडिलांजवळ आला आणि तो त्यांच्या अंगावर जोरात ओरडला. वडिलांनी त्याच्याकडे लक्ष दिलं नाही. ते



माझ्या नावानं हाका मारतच राहिले. अधिकारी चिडला व त्यानं वडिलांच्या डोक्यावर बंदुकीच्या दस्त्यानं जोरात ठोसा मारला.

मी कळवळलो. पण जागचा हललो नाही. मला त्या अधिकाऱ्याची भीती वाटत होती. माझं शरीर त्याच्या माराला भीत होतं.

नंतर माझ्या वडिलांना अखेरची घरघर लागली. ते माझंच नाव सतत घेत होते. मला वरून दिसत होतं. ते श्वास घेत होते, पण अधून मधून. जोरात झटके आल्यासारखा. तरीही मी जागचा हाललो नाही.

हजेरी संपल्यावर मी माझ्या वरच्या बिछान्यावरून खाली उतरलो. वडिलांकडे बघत उभा राहिलो. त्यांचे ओठ थरथरत होते. काहीतरी पुटपुटत असल्यासारखे. त्यांच्यावर वाकून मी तासभर त्यांच्याकडे नुसता बघत उभा होतो. माझ्या डोळ्यांसमोर त्यांच्या रक्ताने माखलेल्या चेहऱ्याची आणि विछिन्न झालेल्या मेंदूची चित्रं तरळत होती. ती चित्रं माझ्या आत पक्की खोदली जात होती.

नंतर मी वर चढून माझ्या वरच्या बिछान्यावर गेलो. माझ्या वडिलांच्या वर माझं अंथरुण. खाली माझे वडील. अद्यापही जिवंत होते.

ती २८ जानेवारी १९४५ ची रात्र होती.

२९ जानेवारीच्या पहाटे मी जागा झालो. आधी वडिलांच्या बिछान्यात पाहिलं. ते तिथं नव्हते. त्यांच्या जागी दुसऱ्याच कुणा रुग्णाला आणून टाकलं होतं. पहाट व्हायच्या आधीच बहुधा त्यांनी वडिलांना तिथून उचललं असणार आणि स्मशानात नेलं असणार. स्मशानात नेत असतानाही त्यांचा श्वास

मंदपणे चालूच असणार.

त्यांच्या थंडग्यापाशी प्रार्थना म्हणायला कुणी नव्हतं. त्यांच्या आठवणीसाठी कुणी मेणबत्त्या लावल्या नव्हत्या. शेवटपर्यंत त्यांच्या ओठावर माझंच नाव होतं. त्यांचा अखेरचा शब्द 'एलीझर'हाच होता. मला निर्वाणीचं बोलवंत होते; पण या हाकेला मी प्रतिसाद दिला नव्हता.

मला रडू आलं नाही. मी रडलो नाही, याचंच मला विलक्षण दुःख झालं. पण माझ्या डोळ्यात अश्रूच उरले नव्हते. माझ्या हृदयाच्या खोल खोल कोपऱ्यात, माझ्या क्षीण झालेल्या विवेकबुद्धीच्या एक गुप्त कप्प्यात जर मी माझ्या भावनेचा शोध घेतलाच असता, तर कदाचित मला सापडलं असतं. ते असंच काहीतरी–

सुटलो एकदाचा! ■ ■ ■



# नऊ

मला अकरा एप्रिलपर्यंत बुशेनवाल्डच्या छावणीत राहावं लागलं. या काळातल्या माझ्या आयुष्याबद्दल सांगण्यासारखं माझ्याजवळ काहीच नाही. आता त्याचं काही महत्त्वही नव्हतं. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर मीही संपलेलाच होतो. माझ्यावर कशाचाच परिणाम होत नव्हता.

मला आता लहान मुलांच्या विभागात हलवण्यात आलं होतं. तिथं आम्ही सहाशे मुलं होतो.

युद्धाची आघाडी जवळजवळ येत होती.

मी पूर्ण आळसावलेल्या स्थितीत दिवस घालवले. मला फक्त एकच इच्छा होती–खाण्याची. पडून फक्त आराम करत होतो. वडिलांचा आणि आईचा विचारही माझ्या मनात येत नव्हता.

मला जास्तीचा पाव किंवा सूप कसं मिळेल,याचाच मी वेळोवेळी विचार करत होतो. तीच स्वप्नं बघत होतो.

पाच एप्रिलला इतिहासाची चक्रं एकदम उलटी फिरली.

दुपार टळून गेली होती. नाझी अधिकारी येऊन आमची

मोजणी करण्याची आम्ही वाट बघत होतो. त्यांना यायला उशीर होत होता.

बुशेनवाल्डच्या इतिहासाला असा उशीर तोपर्यंत ठाऊकच नव्हता. नक्कीच काहीतरी अघटित घडलं असावं.

दोन तासांनी लाऊडस्पीकरवरून आम्हाला विभागप्रमुखानं हुकूम दिला.

सर्व ज्यूंनी ताबडतोब पटांगणात एकत्र जमावं.

आम्हाला वाटलं,

बस्स! हा ज्यूंचा शेवट होता! हिटलर त्याचा शब्द पाळणार होता.

आम्ही मुलं त्या जागेकडे जायला निघालो. हुकूम पाळण्याखेरीज आम्ही दुसरं काहीही करू शकत नव्हतो. विभागप्रमुखांनं काठीनं आमच्या पायांवर प्रहार करून ही गोष्ट आणखी स्पष्ट केली.

वाटेत काही कैदी भेटले. त्यांनी हळू आवाजात सांगितलं,

''आपापल्या विभागात परत जा. नाहीतर जर्मन लोक तुम्हाला गोळ्या घालून ठार करतील. आपल्या बराकीच्या बाहेर पडू नका.''

आम्ही बराकीत परत आलो. परतत असताना आम्हाला कळलं, की आक्रमण शत्रूला तोंड देण्यासाठी असलेल्या तुरुंगाच्या खास राखीव लढाऊ संघटनेनं असं ठरवलं होतं, की छावणीतून ज्यूंना बाहेर काढून छावणी रिकामी करायची नाही.

छावणीत फार प्रचंड खळबळ माजली होती. हजेरी घ्यायला उशीर होत होता. असंख्य ज्यूंनी आपण ज्यू नाहीच आहोत, असं घोषित करून स्वत:ची सुटका करून घेतली.



छावणीप्रमुखानं ठरवलं, की सर्व विभागांची एकत्रित हजेरी घेण्याचं काम उद्या होईल. त्यासाठी सर्वांनी हजर रहायचं होतं.

त्याप्रमाणे हजेरी झाली. छावणीप्रमुखानं त्यावेळी जाहीर केलं, की बुशेनवाल्डचा सगळा तुरुंग रिकामा करायचा आहे. हद्दपार झालेल्यांचे रोज दहा दहा गट बाहेर काढले जातील. या क्षणापासून पाव आणि सूप वाटलं जाणार नाही.

– आणि छावणी रिकामी करण्याचं काम सुरू झालं. दर दिवशी हजारो कैदी त्या तुरुंगाच्या दारातून बाहेर पडले आणि कधीही परत आले नाहीत.

दहा एप्रिलला छावणीत आम्ही अद्यापही वीस हजार कैदी शिल्लक होतो. त्यात अनेक मुलं होती. अधिकाऱ्यांनी आम्हाला सगळ्यांना एकदमच बाहेर सोडायचं ठरवलं. त्यानंतर ते सगळा तुरुंग स्फोट करून उडवून देणार होते.

एका प्रचंड मोठ्या पटांगणात आम्ही सारे एकत्र जमलो. पाचांच्या रांगा करून. तुरुंगाचं दार उघडायची वाट बघत.

एकाएकी सायरन्स वाजायला लागले. दक्षतेचा इशारा. आम्ही परत आपापल्या विभागातल्या बराकींमध्ये परत गेलो. संध्याकाळ होऊन गेली. त्यामुळं त्यादिवशी इतक्या उशिरा आम्हाला बाहेर सोडणं शक्यच नव्हतं. ते काम दुसऱ्या दिवशीपर्यंत लांबणीवर पडलं.

आम्ही भुकेनं कासावीस झालो होतो. सहा दिवसांपासून आम्हाला खायला काहीच मिळालं नव्हतं. थोडंसं गवत आणि स्वयंपाकखोलीजवळ सापडलेली बटाट्याची सालं खाऊन आम्ही दिवस काढले.

दुसऱ्या दिवशी नाझी अधिकारी छावणीभर फिरले आणि

त्यांनी सगळ्यांना हुसकावून बाहेर काढलं व पटांगणावर नेलं. आम्ही शेवटचे बळी.

तुरुंगरक्षक सैन्याच्या खास लढाऊ भूमिगत संघटनेनं शत्रूच्या हल्ल्याला उत्तर द्यायला सुरुवात केली. शस्त्रधारी सैनिक सर्वत्र सज्ज झाले. बंदुकांच्या गोळ्यांचे आणि धडाडणाऱ्या तोफांचे कानठळ्या बसवणारे आवाज सुरू झाले. आगडोंब उसळला. स्फोट होत होते. आम्ही मुलं मैदानावरच आडवे पडून राहिलो.

ही लढाई फार काळ टिकली नाही. दुपारपर्यंत शांत झालं नाझी अधिकारी गेले आणि रक्षक तुकडीनं पुन्हा छावणीचा ताबा घेतला.

संध्याकाळी सहा वाजता बुशेनावाल्ड तुरुंगाच्या दारात पहिला अमेरिकन रणगाडा येऊन उभा राहिला!

मुक्त झालेली माणसं म्हणून पहिली कृती जर आम्ही कोणती केली असेल, तर ती खाद्यपदार्थांवर तुटून पडण्याची! आम्ही फक्त तेवढाच विचार केला. सूडाचा नाही,आमच्या आप्तांचा, कुटुंबाचा नाही. फक्त खाण्याचा!

आमची भूक पूर्ण शमल्यावरही कोणाच्याही मनात सूडाचा विचार आला नाही. भरल्यापोटी सुद्धा सुडाची भाषा करणारा तिथं कोणीच नव्हता!

दुसऱ्या दिवशी काही तरुण मुलांनी थोडे बटाटे आणि कपडे मागितले... आणि मुलींबरोबर झोपायला मागितलं! सूडाचं कुठं चिन्हही नव्हतं.

बुशेनवाल्ड तुरुंगातून मुक्तता झाल्यावर तीन दिवसांनी अन्नातल्या विषबाधेनं मी फार आजारी झालो. मला हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आलं. जीवन आणि मृत्यू यांच्यामध्ये हेलपाटत मी दोन आठवडे काढले.



एक दिवस माझी सर्व शक्ती एकवटून मी उठून बसलो. समोरच्या भिंतीवर टांगलेल्या आरशात मला स्वतःचा चेहरा बघायचा होता. वर्षांपूर्वी आमच्या गावाबाहेरच्या घेटोत आल्यापासून मी माझा चेहरा आरशात पाहिलाच नव्हता.

आरशातून खोल खोल पलीकडून एक प्रेत माझ्याकडे टक लावून बघत होतं!

त्या प्रेताचे माझ्यावर रोखलेले डोळे, त्या डोळ्यांमधली दृष्टी मला कधीच सोडून गेली नाही.

## -: टीप :-

१) **कब्बाला** – ज्यूंची गूढविद्या.

२) **तालमुड ग्रंथ**– धार्मिक नियमांविषयीचा ज्यूंचा एक धर्मग्रंथ.

३) **टेम्पल** – जेरुसलेममध्ये टेकडीवर बांधलेलं, सोन्याचा कळस असलेलं आद्य आणि एकमेव मंदिर. त्याचा विध्वसं झाला होता.

४) **मियामोनाइड्स** – ग्रंथ रचणारे.

५) **झोहर** – गूढविद्या सांगणारा ग्रंथ.

६) **झिओनिझम** – पॅलेस्टाइनमध्ये ज्यू जमातीला राष्ट्रीय दर्जा मिळावा, म्हणून ज्यूंनी हाती घेतलेली चळवळ. आपली भूमी, संस्कृती, आर्थिक सामाजिक विकास, ही उद्दिष्टे.

७) **पासोवर** – मेजवानीचे सात दिवस असणारा ज्यूंचा सण. देवानं पहिल्या इजिप्शियनचा पराभव करून इस्त्रायलींना घरांचा ताबा दिला होता. हा सण एप्रिल महिन्यात येतो.

८) **पेन्टेकॉस्ट** – पासोवरनंतर पन्नास दिवसांनी येणारा ज्यूंचा सण.

९) **घेटो** – ज्यूंना स्थानबद्ध करून जिथं ठेवलं,तो शहराचा भाग.

१०) **रब्बी** – कायदा शिकवणारा ज्यूंचा धर्मगुरू.

११) **योम किप्पूर** – ज्यूंचा उपवासाचा दिवस. देवासमोर प्रायश्चित्त घेण्याचा दिवस. सप्टेंबर महिन्यात येतो. चोवीस तास प्रार्थना करतात.

१२) **रोश हशाना** – ज्यूंचा नववर्ष दिन. सप्टेंबर महिन्यात येतो.

१३) **कद्दिश**– मृतांसाठी करावयाची प्रार्थना.

१४) **गेस्टापो** – जर्मन गुप्तहेर, क्रौर्यासाठी प्रसिद्ध.

१५) **एस.एस.** – नाझी पोलिसदल

१६) **कापो** – छळछावणीतल्या निरनिराळ्या विभागांचे प्रमुख. त्यांच्या हाताखाली कैदी काम करत.

# नाईट

दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या नाझी भस्मासुराने लक्षावधी ज्यूंचा क्रूर नरमेध केला. त्या क्रौर्याच्या कहाण्या आजही काळीज हेलावून टाकतात.

हिटलरच्या छळछावण्यांमध्ये आणि तुरुंगांमध्ये ज्या ज्यूंनी अमानुष छळ सोसला, आणि या मृत्यूच्या सापळ्यांमधूनही वाचून जे जिवंत राहिले, त्यांचे अनुभव म्हणजे वाहती जखम आहे.

अशीच एक भळभळती जखम म्हणजे 'नाईट'! डॉ. एली वायझल अगदी कोवळ्या वयात नाझींच्या तुरुंगात डांबले गेले. त्यांचे वडील, आई, लहान बहीण सर्वांनाच जर्मनांनी पकडून नेले. त्या तुरुंगामधल्या यमयातनांमधून फक्त डॉ. एली वायझलच वाचले. आपल्या प्राणप्रिय आई, वडील, बहीण यांचे मृत्यू त्यांना कोवळ्या वयात सोसावे लागले.

हा सगळा विदारक अनुभव त्यांनी या पुस्तकात कमालीच्या प्रत्ययकारी भाषेत मांडला आहे. हे पुस्तक म्हणजे सखोल जीवनचिंतन आहे.

त्या काळरात्रीचा अनुभव या पुस्तकाच्या पानोपानी भरून राहिला आहे.

BBH भारत बुक हाऊस